CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

धाराशिव | शुक्रवार, २० फेब्रुवारी २०२६ | वर्ष ३ रे अंक ३५१ | पाने १२ | किंमत रु. ६/- | ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com



# शिवनेरीवर शिवजन्मोत्सव सोहळा; राज्यभरात शिवजयंतीचा उत्साह

### सोलापूर शहर, जिल्ह्यात जल्लोषात मिरवणूका

सोलापूर शहरातील प्रमुख मार्गावरुन विविध शिवमंडळांनी जल्लोषात मिरवणूक काढल्या. या मिरवणुकीत शिवचरित्रावर आधारित विविध देखावे सादर करण्यात आले होते. लेझीम, झांज पथकाच्या निनादात तरुणाई थिरकली. शिवभक्तांच्या हातात भगवे झेंडे, 'जय भवानी, जय शिवाजी...'चा घोष यामुळे मिरवणुकीच्या मार्गावर नवचैतन्य पसरले होते. राज्याचे ग्रामीण विकास मंत्री तथा सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे, राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांची विशेष उपस्थिती होती.

(सविस्तर वृत्त पान ८, ९, १२)

### पारंपरिक पाळणा गात शिवरायांना अभिवादन; मुख्यमंत्र्यांसह दोन्ही उपमुख्यमंत्र्यांची उपस्थिती

**मुंबई, दि.१९ फेब्रुवारी-**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत आणि हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची आज ३९६ वी जयंती राज्यभरात अत्यंत उत्साहात आणि भक्तीभावात साजरी होत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान असलेल्या किल्ले शिवनेरीवर पहाटेपासूनच शिवभक्तांची मांदियाळी जमली असून 'जय भवानी, जय शिवाजी'च्या जयघोषाने आसमंत दुमदुमून गेला.

शिवनेरीवरील मुख्य शासकीय सोहळ्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार दाखल झाले आहेत. त्यांच्यासोबतच पर्यटनमंत्री शंभुराज देसाई, सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार आणि इतर अनेक मान्यवर महाराजांना अभिवादन करण्यासाठी शिवनेरीवर पोहोचले आहेत. शिवजयंतीचे औचित्य साधून किल्ले शिवनेरीवर आणि विशेषतः शिवजन्म स्थळाच्या आतील भागात आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली आहे. गडाला ऐतिहासिक वारसा जपून विद्युत रोषणाईने उजळवून टाकण्यात आले आहे. या मंगलमयी सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी आणि जन्मस्थळावर नतमस्तक होण्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून हजारो शिवभक्त गडावर दाखल झाले होते. कार्यक्रमास स्थानिक लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, अधिकारी व हजारो शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिवजन्मोत्सवाच्या निमित्ताने किल्ले शिवनेरी परिसरात उत्साह, अभिमान आणि ऐतिहासिक गौरवाचे वातावरण अनुभवास आले. मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शिवकालीन परंपरा, लेझीम, ढोल-ताशांच्या गजरात आणि पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या शिवप्रेमींमुळे संपूर्ण परिसर देशभक्तीच्या वातावरणाने दुमदुमून गेला.

### पुणे जिल्ह्यातील सर्व किल्ले अतिक्रमणमुक्त : देवेंद्र फडणवीस

अजितदादांना किल्ले शिवनेरीबद्दल विशेष जिव्हाळा होता. यापूर्वीच राज्य सरकारने छत्रपती शिवाजी महाराजांचे सर्व किल्ले अतिक्रमणमुक्त करण्याची घोषणा केली होती. त्या निर्णयानुसार काम सुरू असून पुणे जिल्ह्यातील सर्व किल्ले अतिक्रमणमुक्त करण्यात यश आले आहे. शिवरायांचा ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी आणि गड-किल्ल्यांचे संवर्धन करण्यासाठी सरकार कटिबध्द आहे.

### महाराजांच्या प्रेरणेतूनच देशाची वाटचाल : एकनाथ शिंदे

काळाच्या पुढे विचार करणारे युगपुरुष म्हणून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रेरणेतूनच आपला देश वाटचाल करत असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वप्नातील महाराष्ट्र साकार करण्यासाठी आपण त्यांच्या अंगातील एकतरी गुण अंगिकार करण्याची आवश्यकता असल्याचे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.

### ऐक्य, स्वाभिमान आणि संस्कारांची जपणूक : सुनेत्रा पवार

शिवनेरीच्या ऐतिहासिक महत्त्वावर प्रकाश टाकत, या पवित्र भूमीतून समाजात ऐक्य, स्वाभिमान आणि संस्कारांची जपणूक करण्याचे आवाहन त्यांनी केले. या वेळी अजित पवार यांच्या आठवणीमध्ये सुनेत्रा पवार भावूक झाल्या होत्या. शेतकरी आणि कष्टकरी जनतेला सुखी-समाधानी ठेव. शिवरायांनी दाखवलेल्या वाटेवर चालण्याचे बळ आम्हा सर्वांना दे, अशी प्रार्थना त्यांनी आई शिवाई देवीच्या चरणी केली.

# मोफत जेवण मिळाल्यावर लोक काम का करतील?

### सुप्रिम कोर्ट : मोफत वीज, पाणी दिल्याने कामाची सवयच संपेल, सरकारने लोकांना रोजगार द्यावा

**नवी दिल्ली, दि.१९ फेब्रुवारी-**

जर सरकार लोकांना मोफत अन्न, गॅस आणि वीज देत राहिले, तर लोक काम का करतील? असा सवाल सुप्रिम कोर्टाने उपस्थित केला. गरिबांना मदत करणे समजण्यासारखे आहे, परंतु कोणताही फरक न करता सर्वांना मोफत सुविधा देणे योग्य नाही. अशाने आपण कार्यसंस्कृती संपवत आहोत, असेही सुप्रिम कोर्टाने म्हटले आहे. सर्वोच्च न्यायालयाने ही टिप्पणी तामिळनाडू पॉवर डिस्ट्रीब्यूशन कॉर्पोरेशन लिमिटेडच्या याचिकेवर सुनावणी करताना केली. ज्यात ग्राहकांच्या आर्थिक स्थितीची पर्वा न करता सर्वांना मोफत वीज देण्याचा प्रस्ताव होता.



मुख्य न्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती विपुल एम पंचोली यांच्या खंडपीठाने म्हटले की, देशातील बहुतेक राज्ये महसुली तुटीत आहेत आणि तरीही ती विकासाकडे दुर्लक्ष करून अशा फ्रीबीज देत आहेत. कल्याणकारी योजनेअंतर्गत त्या लोकांना दिलासा द्या जे विजेचे बिल भरु शकत नाहीत. पण जे लोक पैसे भरण्यास सक्षम आहेत आणि जे नाहीत, त्यांच्यात कोणताही फरक न करता मोफत सुविधा देणे हे तुष्टीकरणाचे धोरण नाही का? असा सवालही उपस्थित केला. कंपनीने २०२४ च्या विद्युत सुधारणा नियमांमधील नियम २३ ला आव्हान दिले आहे. यात ग्राहकांच्या आर्थिक स्थितीची पर्वा न करता सर्वांना मोफत वीज देण्याचा प्रस्ताव आहे.

| देशात विजेसंबंधित मोफत वा अनुदान योजना | |
|---|---|
| दिल्ली | दरमहा सुमारे २०० युनिटपर्यंत मोफत वीज (६-७ लाख ग्राहकांना लाभ) |
| पंजाब | प्रत्येक घरासाठी ३०० युनिटपर्यंत मोफत वीज |
| झारखंड | दरमहा १२५ युनिटपर्यंत मोफत वीज |
| राजस्थान | निवडक कुटुंबांना ३०० युनिटपर्यंत मोफत वीज |
| हिमाचल प्रदेश | १२५ युनिटपर्यंत मोफत |
| बिहार | १२५ युनिटपर्यंत मोफत (नवीन घोषणा) |
| तेलंगणा, आंध्र, पंजाब | शेतीच्या वापरासाठी मोफत वीज |
| **इतर मोफत /सहाय्य योजना** | |
| दिल्ली | महिलांना मोफत बस प्रवास, पाणी मोफत वा अनुदान (स्थानिक योजना) |
| मध्य प्रदेश | लाडली बहना योजना: महिलांना दरमहा आर्थिक मदत, हुशार मुलींना मोफत स्कूटी |
| तामिळनाडू | महिलांना मासिक मदत, सार्वजनिक वाहतुकी मध्ये इतर सुविधा |
| छत्तीसगड | गरीब महिलांना गॅस सिलेंडरवर अनुदान |
| हरियाणा | महिलांना दरमहा आर्थिक मदत |




10 YEAR WARRANTY | BAJAJ SECURE • AMC • ROAD SIDE ASSISTANCE | 72198 21111 | SHRIRAM Finance | IDFC FIRST Bank ALWAYS YOU FIRST | BAJAJ AUTO CREDIT | L&T Finance | TATA CAPITAL Two Wheeler Loans

*नियम आणि अटी लागू. बचत 28 फेब्रुवारी 2026 पर्यंत उपलब्ध. दाखवलेली एकूण बचत ही कॅशबॅकची बचत, शून्य प्रोसेसिंग फी आणि 5 मोफत सर्व्हिसेस (3 स्टँडर्ड मोफत सर्व्हिसेस आणि 2 अतिरिक्त मोफत सर्व्हिसेस) यांची बेरिज आहे. मोफत सर्व्हिसेसची बचत शेड्यूल्ड लेबर शुल्कानुसार. लागू ऑफर्स मॉडेल्स/राज्यानुसार बदलू शकतात. शून्य पीएफवरील बचत फायनान्सर आधारावर स्थानांनुसार बदलू शकते. अर्थपुरवठा पूर्णपणे फायनान्सरच्या विवेकानुसार. साहसी दृश्ये एक्सपर्ट्सकडून, प्रोफेशनल सुपरवीजन अंतर्गत, नियंत्रित आणि बंद वातावरणात, सामान्य लोक किंवा सार्वजनिक रस्त्यांपासून दूर जागेत केली आहेत. या साहसी दृश्यांचं अनुकरण करू नये आणि नेहमी वाहतूक व सुरक्षिततेचे नियम पाळावे. पल्सार 125 ऑफर ही निऑन आणि कार्बन फायबर मॉडेल्सवर.

**Authorised Dealers For Bajaj Auto Ltd.: Solapur • Station Road** AHERKAR BAJAJ 9689899840 • **Hotgi Road** AHERKAR BAJAJ 8956069355 • **Akkalkot Road** AHERKAR BAJAJ 8956320060 • **Pandharpur** PANDURANG BAJAJ 8600024805 • **Jeur** SHIVRATNA BAJAJ 9922044676 • **Barshi** AHERKAR BAJAJ 8308004007.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# झेडपीनंतर आता ग्रामपंचायत निवडणुकांचा धुराळा

- इच्छुक गावपुढाऱ्यांकडून मोर्चेबांधणी सुरू
- जिल्ह्यातील ६५५ ग्रामपंचायतींसाठी लवकरच निवडणूक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**

राज्यातील ग्रामीण भागातील राजकीय हालचालींना आता वेग येणार आहे. नगरपालिका, महानगरपालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकानंतर आता ग्राम पंचायत निवडणुकांचा बिगुल वाजलं आहे. जानेवारी ते डिसेंबर २०२६ या कालावधीत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींसह, नव्याने स्थापन झालेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी राज्य शासनाने प्रभाग (वॉर्ड) रचनेचा अधिकृत कार्यक्रम घोषित केला आहे.

यानुसार, येत्या २० फेब्रुवारीपासून प्रभाग रचनेच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात होणार आहे. दरम्यान, सोलापुरातील ६५५ ग्रामपंचायतींची मुदतही लवकर संपणार असून, या गावच्या इच्छुक पुढाऱ्यांची सरपंच अन् सदस्यपदासाठी मोर्चेबांधणी आताच सुरू झाली आहे. ग्रामविकास विभागाच्या सहसचिव वर्षा भरोसे यांनी यासंदर्भातील आदेश जारी केले असून, संपूर्ण प्रक्रियेची जबाबदारी जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांच्यावर सोपवण्यात आली आहे. असा असेल प्रभाग रचनेचा 'थ्री-स्टेप' प्लॅन प्रभाग रचनेचे काम प्रामुख्याने तीन टप्प्यांत पार पडणार आहे. यामध्ये तंत्रज्ञानाचा वापर आणि प्रत्यक्ष पाहणीवर भर देण्यात आला आहे. यामध्ये प्रारंभी तहसीलदार 'गुगल अर्थ'च्या साहाय्याने २० फेब्रुवारीपर्यंत गावांचे नकाशे अंतिम करतील. यानंतर २७ फेब्रुवारीपर्यंत संबंधित तलाठी आणि ग्रामसेवक प्रत्यक्ष जमिनीवर जाऊन पाहणी करतील आणि प्रभागांच्या सीमा निश्चित करतील. जिल्हाधिकाऱ्यांच्या तपासणीनंतर २३ मार्चपर्यंत राज्य निवडणूक आयोग या प्रस्तावांना अंतिम मान्यता देईल. ७ एप्रिल रोजी प्रभाग रचनेचा मसुदा (प्रारूप) जाहीर केला जाईल. नागरिकांना ७ ते १३ एप्रिल या कालावधीत आपल्या हरकती नोंदवता येतील. प्राप्त हरकतींवर २१ एप्रिलपर्यंत उपविभागीय अधिकाऱ्यांकडे सुनावणी पार पडेल. तर ४ मे रोजी अंतिम घोषणा होणार आहे. सर्व हरकतींचा निपटारा केल्यानंतर आणि प्रस्तावांची पडताळणी पूर्ण झाल्यावर, जिल्हाधिकारी २८ एप्रिलपर्यंत अंतिम प्रभाग रचना राज्य निवडणूक आयोगाकडे सादर करतील.

### यावर्षी मुदत संपणाऱ्या तालुकानिहाय ग्रामपंचायती अशा

माहे जानेवारी ते माहे डिसेंबर २०२६ या कार्यकाळात मुदत संपणाऱ्या ग्राम पंचायतींमध्ये करमाळा ५१, माढा ८३, बार्शी ९५, उत्तर सोलापूर २४, मोहोळ ७२, पंढरपूर ७२, माळशिरस ४९, सांगोला ६२, मंगळवेढा २३, द. सोलापूर ५२ आणि अक्कलकोट ७२ अशा एकूण ६५५ ग्रामपंचायतींचा समावेश आहे.






## संत शिरोमणी गुरु रविदास महाराज जयंतीचा उत्साह

### भक्तिमय वातावरणात विविध सामाजिक उपक्रम संपन्न

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**

शेळगी परिसरात श्री संत रविदास बहुद्देशीय सामाजिक संस्था, शेळगी यांच्या वतीने गुरु रविदास यांची ६४९ वी जयंती १४ व १५ फेब्रुवारी रोजी साजरी करण्यात आली.

१४ फेब्रुवारी रोजी मूर्ती प्रतिष्ठापना सोहळ्याने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रा. कल्लप्पा महाजन, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री मुलानी, प्रा. डॉ. विश्वनाथ शिंदे, ह.भ.प. बळीराम जांभळे महाराज, संस्थापक अध्यक्ष मेजर वसंत सपताळे आणि हभप मंगेश कुलकर्णी यांच्या हस्ते महापूजन करून मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. त्यानंतर भजन, कीर्तन, पारायण व महाप्रसादाने वातावरण भक्तिरसात न्हाऊन निघाले.

१५ फेब्रुवारी रोजी सामाजिक बांधिलकी जपत विविध क्षेत्रात पदोन्नती मिळविलेल्या मान्यवरांचा व सोलापूर महानगरपालिकेतील नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला. तसेच परिसरातील गरजू महिलांना साड्यांचे वाटप करून जयंतीची सांगता करण्यात आली. कार्यक्रमास वैशाली कोनापूरे, प्रकाश बिराजदार, अशोक लाम तुरे, केदार पाटील उपस्थित होते. संस्थेच्या सचिवा जयश्री सपताळे व खजिनदार वैशाली गायकवाड यांनी प्रस्तावना केली.

सूत्रसंचालन प्रकाश मारुती जाधव यांनी केले तर आभार दिलीप कांबळे यांनी मानले.

## पी. एस. इंग्लिश मिडीयम स्कूलच्या वतीने अभ्यासपूर्ण क्षेत्र भेटीचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**




येथील श्राविका संस्था संचलित पद्मश्री सुमतीबाई इंग्लिश मिडीयम स्कूलच्या वतीने प्री-प्रायमरीच्या विद्यार्थ्यांसाठी नुकतेच सोलापूर विमानतळ येथे अभ्यासपूर्ण अश्या क्षेत्र भेटचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी देवई शहा यांच्या मार्गदर्शनाखाली व प्री-प्रायमरीच्या समन्वयक सौ. अर्चना अक्कलकोटे यांच्या नेतृत्वाखाली विशेष संकल्पनेनुसार आयोजित केलेल्या या अभ्यासपूर्ण क्षेत्र भेटीत शाळेतील नर्सरी ते मोठ्या गटामधील सर्व विद्यार्थी मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते. यावेळी विद्यार्थ्यांना विमान कसे उतरते कसे उड्डाण करते हे दाखविण्यात आले; त्याचबरोबर विमान तिकीट, बोर्डिंग पास, साम ानाची तपासणी कश्याप्रकारे केली जाते, विमान प्रवास करतेवेळी कोणते साहित्य नेण्यास परवानगी आहे, प्रवासात स्वतः ची काळजी कशी घ्यावी इ. संदर्भात माहिती देण्यात आली. ही सर्व माहिती देण्यासाठी तेथील सर्व प्रकारच्या कर्मचाऱ्यांनी उत्तम असे सहकार्य केले. अतिशय आनंददायी व उत्साही वातावरणात पार पडलेली ही क्षेत्र भेट यशस्वी करण्यासाठी प्री-प्रायमरी विभागाच्या सर्व सह शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



## 'ना नफा-ना तोटा' तत्त्वावर रुग्णवाहिकेचे लोकार्पण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**

बसव ब्रिगेडच्या सोलापूर जिल्हा शाखेच्या पुढाकारातून गरजू रुग्णांसाठी 'ना नफा-ना तोटा' तत्त्वावर सुरू करण्यात आलेल्या रुग्णवाहिकेचे लोकार्पण जुळे सोलापुरातील श्री प्रभुलिंग मंदिर येथे पार पडले. सामाजिक बांधिलकी जपत आरोग्यसेवेत हातभार लावण्याचा निर्धार या उपक्रमातून व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी युवा उद्योजक सिद्धू पाटील होते. प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष संतोष पवार, भाजपचे नगरसेवक प्रशांत पल्ली, एमआयएमचे नगरसेवक शोएब चौधरी, युवा उद्योजक राघवेंद्र जामगोंडी आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी माजी नगरसेवक चंद्रकांत रमनशेट्टी, काशिनाथ मेलगिरी, शिवलिंग शाबादे, आनंद म ुस्तारे, समाजसेवक श्याम धुरी, लक्ष्मीकांत बिराजदार, रुग्णवाहिका उद्योजक श्रीशैल रोडगे, राजेंद्र हौदे यांच्यासह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संघटनेचे शहर सचिव राहुल जत्ती, सहसचिव अविनाश बिराजदार, सोशल मीडिया प्रमुख दत्तात्रय केरे, प्रसिद्धी प्रमुख विशाल पाटील, जुळे सोलापूर प्रमुख अमरनाथ दामा, शहर उपाध्यक्ष सिद्धांत रंगापुरे, सुधाकर कोरे, नागराज बसवराज मुनोळी, राहुल महादेवकर, शुभम गुजरे, अमर टक्का, चेतन गड्डम, संकेत मसुती, सुनिल तगेळी, शंकर शिवानंद पडसलगी, लगक्षट्टी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## राज्यात नव्याने ११ अतिरिक्त जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**

**विविध तालुक्यात होणार ६९ अतिरिक्त तहसील कार्यालये**

वाढती लोकसंख्या तसेच शहरांचा होत असलेला भौगोलिक विस्तार आणि त्यातून महसूल विभागाच्या कामकाजाचा व्याप वाढत चालला आहे. हे लक्षात घेऊन राज्यातील सहा महसूल विभागात ११ अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांची, तर ६९ अतिरिक्त तहसीलदार कार्यालयांची नव्याने निर्मिती करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला आहे. यात पुणे विभागात तीन, तर अन्य सर्व विभागांत प्रत्येकी एक अतिरिक्त जिल्हाधिकारी नेमण्यात येणार आहेत. पुणे जिल्ह्यातील बारामती येथे अतिरिक्त जिल्हाधिकारी, तर चाकण येथे अतिरिक्त तहसीलदार कार्यालय स्थापन करण्यात येणार आहे.

**प्रस्तावित अपर जिल्हाधिकारी कार्यालये**

पुणे विभागात पुणे जिल्ह्यात बारामती, सातारा जिल्ह्यात फलटण, तर सोलापूर जिल्ह्यात पंढरपूर, कोकण विभागातील ठाणे जिल्ह्यात कल्याण, तर रत्नागिरी जिल्ह्यात दापोली. नाशिक विभागात जळगाव जिल्ह्यात चाळीसगाव. छत्रपती संभाजीनगर विभागात नांदेड जिल्ह्यात किनवट. अमरावती विभागात अमरावती जिल्ह्यात अचलपूर, यवतमाळ जिल्ह्यात पुसद, बुलडाणा जिल्ह्यात खामगाव. नागपूर विभागात नागपूर जिल्ह्यात कळमेश्वर.



## प्रभाग २२ मध्ये १४ लाखांच्या रस्त्याचे भूमिपूजन; आश्वासनांपासून कृतीकडे विकासाची वाटचाल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**

सोलापूर महानगरपालिका नागरी दलितेतर योजनेअंतर्गत प्रभाग क्रमांक २२ मधील बुवा गल्ली येथे १४ लाख १८ हजार ४९२ रुपयांच्या रस्ता कामाचे उद्घाटन पार पडला.

या प्रकल्पासाठी माजी नगरसेवक नागेश गायकवाड यांचे मार्गदर्शन तसेच विद्यमान नगरसेवक दत्तात्रय नडगिरी, चैत्रालीताई शिवराज गायकवाड आणि अंबिकाताई नागेश गायकवाड यांच्या प्रयत्नांचे महत्त्वपूर्ण योगदान लाभले. राज्याचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या सहकार्याने विकासकामांना गती देण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

प्रभाग २२ मध्ये आता केवळ आश्वासने नाहीत, तर प्रत्यक्ष कृतीतून विकास दिसत आहे. रस्ता कामाचा हा शुभारंभ आगामी सर्वांगीण प्रगतीचा नांदीघोष ठरत असून, परिसराच्या विकासाला नवी दिशा देणारा ठरणार आहे. या प्रसंगी अनेक मान्यवर व स्थानिक नागरिकांची उपस्थिती होती.

# एनए परवानगी रद्द; महसूल कायद्यात मोठा ऐतिहासिक बदल

**दलालांची दुकानदारी झाली बंद! शासनाच्या निर्णयाचा जमीनदारांना दिलासा; सनदीसाठी मारावे लागत होते हेलपाटे**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**

राज्य शासनाने शेतजमिनीचा निवासी, व्यावसायिक किंवा औद्योगिक वापर करण्यासाठी आवश्यक असलेली ना परवानगीची अट रद्द करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे बांधकाम व्यावसायिक, गृहनिर्माण संस्था आणि जमीनधारकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

नव्या नियमानुसार विकास आराखड्याशी सुसंगत असलेल्या जमिनींसाठी स्थानिक नियोजन प्राधिकरणाने दिलेली बांधकाम परवानगी हीच अकृषिक परवानगी म्हणून ग्राह्य धरली जाणार आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांकडून स्वतंत्र मंजुरीची आवश्यकता नाही. याशिवाय वार्षिक बिनशेती कराची अटही रद्द केली आहे. घर किंवा इमारत उभारण्यासाठी महानगरपालिका, नगरपालिका किंवा नगररचना विभागाकडून अधिकृत बांधकाम नकाशा मंजुरी घेणे बंधनकारक राहील. संबंधित स्थानिक प्राधिकरणाकडेच अर्ज करावा लागेल. बांधकाम मंजुरीसाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज करता येईल. अर्ज सादर झाल्यानंतर महसूल विभागाच्या संगणकीय प्रणालीद्वारे सातबारा उताऱ्यात आवश्यक नोंद आपोआप होईल. फक्त बांधकाम परवानगी मिळाल्यामुळे भोगवटादार वर्ग दोनमध्ये आपोआप बदल होणार नाही. तर ७/१२ उताऱ्यात आपोआप फेरफार नोंद घेतली जाईल, त्यासाठी आवश्यक शुल्क भरावे लागेल. अर्जानंतर छाननी शुल्कही ऑनलाईन भरावे लागेल. नोंदणीकृत वास्तुविशारद नियमानुसार नकाशा तयार करून तो अधिकृत संकेतस्थळावर अपलोड केल्यानंतर नगररचना विभागाकडून तांत्रिक पडताळणी केली जाईल. सर्व अटी पूर्ण झाल्यास डिजिटल स्वाक्षरीसह मंजुरी प्रमाणपत्र दिले जाते. सातबारा उतारा किंवा मालमत्ता पत्रिका भूमी अभिलेख विभागाचा मोजणी नकाशा नोंदणीकृत वास्तुविशारद परवान्याची प्रत चालू वर्षाचा घरपट्टी किंवा मालमत्ता कर भरल्याची पावती अग्निशमन, पर्यावरण विभाग, विमानतळ प्राधिकरण यांसारख्या संबंधित यंत्रणांची ना हरकत प्रमाणपत्रे राज्य सरकारच्या या निर्णयामुळे बांधकाम परवानगी प्रक्रिया सुलभ होईल. मात्र स्थानिक प्राधिकरणाच्या नियमांचे पालन करणे अनिवार्य आहे.

### कर्जाचा अडथळा दूर

संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेने एखाद्या जमिनीवर विकास परवानगी, बांधकाम, रेखांकन आराखडे मंजूर केल्यास स्वतंत्र अकृषक परवानगीची आवश्यकता राहणार नाही. या जमिनीवर कोणत्याही बँक व वित्तीय संस्थेमार्फत कोणत्याही प्रकारचे कर्ज वा अन्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अकृषक वापराच्या सनदेची आवश्यकता नाही. त्यामुळे बँका, वित्तीय संस्थांनी त्याचा आग्रह धरू नये, असे आदेशही शासनाने दिले आहेत.

### रुपांतरण अधिमूल्य भरावे लागणार

आता जमिनीच्या वापरातील बदलादाखल जमिनीच्या क्षेत्रफळानुसार टप्पानिहाय चालू वार्षिक दर विवरणपत्रानुसार निर्धारित केलेल्या जमिनीच्या चालू बाजार मूल्यावर आधारीत एकरकमी रुपांतरण अधिमूल्य आकारण्यात येईल. संबंधित नियोजन प्राधिकरणाने एखाद्या जमिनीवर विकास परवानगी दिली किंवा बांधकाम आराखडा मंजूर केला, तर त्याला आता जिल्हाधिकाऱ्यांकडून स्वतंत्र अकृषक परवानगीची आवश्यकता नाही.

### असे असेल रुपांतरण अधिमूल्य

१००० चौरस मीटरपर्यंतच्या क्षेत्राच्या भूखंडासाठी क्षेत्रफळानुसार चालू वार्षिक दर विवरणपत्रानुसार निर्धारित केलेल्या जमिनीच्या चालू बाजार मूल्याच्या ०.१० टक्के.

१००१ ते ४००० चौरस मीटरपर्यंतच्या भूखंडासाठी क्षेत्रफळानुसार चालू वार्षिक दर विवरणपत्रानुसार निर्धारित केलेल्या जमिनीच्या चालू बाजार मूल्याच्या ०.२५ टक्के.

४००१ चौरस मीटरपेक्षा जास्त क्षेत्राच्या भूखंडासाठी क्षेत्रफळानुसार चालू वार्षिक दर विवरणपत्रानुसार निर्धारित केलेल्या जमिनीच्या चालू बाजार मूल्याच्या ०.५० टक्के.

## सोलापूर महापालिकेला मिळाल्या नव्या उपायुक्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**

**शासनाने सोनाली यादव यांची २ वर्षांसाठी केली प्रतिनियुक्ती**

सोलापूर महानगरपालिका येथे उपायुक्त पदावर मुख्याधिकारी (गट-अ) संवर्गातील सोनाली यादव यांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली आहे. याबाबतचा शासन आदेश महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांनी १८ फेब्रुवारी २०२६ रोजी जारी केला आहे.

सोलापूर महापालिकेतील तत्कालीन उपायुक्त तैमूर मुलाणी यांची ४ नोव्हेंबर २०२५ रोजी बार्शी येथे बदली झाल्यानंतर ते पद रिक्त होते. श्रीमती यादव या यापूर्वी वसई-विरार महानगरपालिका येथे उपायुक्त म्हणून कार्यरत होत्या. त्यांची नियुक्ती सोलापूर महानगरपालिकेतील रिक्त उपायुक्त पदावर प्रारंभी दोन वर्षांच्या कालावधीसाठी करण्यात आली आहे. प्रतिनियुक्तीचा कालावधी पदाचा कार्यभार स्वीकारल्यापासून लागू होणार असून, शासनाने लोकसेवेच्या हितासाठी आवश्यक असल्यास त्यांना कालावधीपूर्वी परत बोलावून घेण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

शासन आदेशानुसार, श्रीमती यादव यांनी नव्या पदावर रुजू झाल्यानंतर अनुपालन अहवाल सादर करणे अपेक्षित आहे. ही नियुक्ती महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ मधील अटी व शर्तींनुसार करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग अंतर्गत शासनाचे अवर सचिव अ.का.लक्कस यांनी तसे आदेश काढले आहेत.

---

## महत्वाचे...



### पोलिस आयुक्तालयातर्फे गायक मोहम्मद अयाज यांचा सन्मान

**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**

नुकतेच पोलीस आयुक्तालय सोलापूर यांच्या वतीने पोलीस आयुक्त एम राजकुमार यांच्या हस्ते सोलापूरचे गायक मोहम्मद आयाज यांचा सन्मान करण्यात आला. पोलीस आयुक्तालय स्नेहसंमेलन संगीत संध्या या सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये महाराष्ट्राचे महागायक विजेते मोहंम्मद अयाज यांचा संगीत संध्या हा सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात मोहम्मद अयाज यांनी एका पेक्षा एक गाणी सादर करून पोलीस परिवाराचे मने जिंकली. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून सोलापूर जिल्हा सत्र न्यायाधीश शर्माजी व जिल्हा परिषद चे मुख्य कार्यकारी अधिकारी, कुलदीप जंगम सह डीसीपी विजय कबाडे, डीसीपी हसन गोहर, डीसीपी अश्विनी पाटील, एसपी विजया कुर्री, एसपी राजेंद्र माने, एसीपी मच्छिंद्र पंडित, उदयसिंग पाटील, सोलापूरचे डीन डॉक्टर जयकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक शिवाजी राऊत, पोलीस निरीक्षक लकडे सह हजारो पोलीस परिवार उपस्थित होते. हा बहारदार कार्यक्रम सोलापूर पोलीस मुख्यालयाच्या प्रांगणात पार पडला. मोहम्मद अयाज यांनी संपूर्ण पोलीस आयुक्तालय सोलापूर यांचे आभार व्यक्त केले.



### उल्लेखनीय कामगिरीबद्दल पोलिस कॉन्स्टेबल रमेश कोर्सेगाव यांचा सत्कार

**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**

उल्लेखनीय कामगिरीबद्दल पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर यांच्या वतीने पोलीस कॉन्स्टेबल रमेश कोर्सेगाव यांचा पोलीस आयुक्त एम राजकुमार यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला. विजापूर नाका पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या अल्पवयीन मुलीच्या प्रकरणाचा पोलीस कॉन्स्टेबल रमेश कोर्सेगाव यांनी तातडीने तपास करून संबंधित मुलीचा शोध लावण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. ही मुलगी फूस लावून पळवून नेल्याची तक्रार प्राप्त होताच पोलिसांनी तत्परतेने तपासाची सूत्रे हाती घेतली. अवघ्या काही तासांत मुलीचा ठावठिकाणा शोधून तिला सुरक्षितरित्या ताब्यात घेण्यात आले व आई-वडिलांच्या स्वाधीन करण्यात आले. या कार्यामुळे संबंधित कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला. या उत्कृष्ट कामगिरीबद्दल पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी पोलीस कॉन्स्टेबल रमेश कोर्सेगाव यांना प्रशस्तीपत्र प्रदान करून गौरविले.



### श्रीशैल पदयात्रेकरूंना औषधे व प्रथमोपचार पेटी; वीरशैव व्हिजनची अखंडित सेवा

**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**

ग्रामदैवत श्री सिध्दरामेश्वर यांचे गुरु श्री मल्लिकार्जुन यांच्या दर्शनासाठी सोलापूर ते श्रीशैलम पायी जाणाऱ्या भक्तांना वीरशैव व्हिजनतर्फे औषधे, प्रथमोपचार पेटी व ५०० एनर्जी ड्रिंक बाटल्या देण्यात आल्या. वेदमूर्ती राजशेखर स्वामी (आहेरवाडीकर) यांच्या नेतृत्वाखाली निघणाऱ्या या पदयात्रेचे यंदाचे ५१ वे वर्ष आहे. जवळपास १ हजार भक्त एक महिनाभर या पदयात्रेत सहभागी होतात. वीरशैव व्हिजनतर्फे २० हजार रुपयांची औषधे, प्रथमोचार पेटी व ५०० एनर्जी ड्रिंक देण्यात आले. मागील १५ वर्षापासून ही सेवा बजावण्यात येत आहे. या उपक्रमासाठी डॉ. संजय कळके, डॉ. अजित दुलंगे व वैद्यकीय प्रतिनिधी रवींद्र आमणे यांचे सहकार्य लाभले. कुंभार वेस येथील श्री रेवणसिध्दाश्रम मठ येथून यंदाच्या पदयात्रेचे बुधवारी सकाळी प्रस्थान झाले. त्यावेळी यात्रेचे उत्तराधिकारी श्रीशैल स्वामी (आहेरवाडीकर) यांच्याकडे उद्योजक अमोल बिराजदार यांच्या हस्ते व सतीश हुलसुरे, वीरशैव व्हिजन उत्सव समिती अध्यक्ष विजयकुमार बिराजदार, शिवानंद सावळगी, गुरुनाथ होसाळे, सुरेश कंदगुळे यांच्या उपस्थितीत औषधे, प्रथमोपचार पेटी व ५०० एनर्जी ड्रिंक सुपुर्द करण्यात आले. यावेळी राजशेखर बिराजदार, चंद्रकांत रमणशेट्टी, बाबासाहेब देशमुख, अप्पू पुराणिक, महेश स्वामी, शंकर बगले उपस्थित होते.

### जेईई मेनमध्ये वालचंद कॉलेजचे यश; १० विद्यार्थ्यांची उल्लेखनीय कामगिरी

**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**



जानेवारी २०२६ मध्ये झालेल्या जेईई मेन परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून, त्यामध्ये वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. महाविद्यालयातील १० विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट पर्सेंटाइल मिळविले. या परीक्षेत अनिकेत खडके (९८.६९), रेवनेश सुतार (९८.२५), मुहम्मदउस्मान मुल्ला (९५.५५), स्वयम व्हनकुद्रे ९४.३३ ), समर्थ एडके (९२.८६), समर्थ तोडकरी (९०.०२), मोहम्मद चौधरी (८६.२५), प्रणव साखरे (८३.९८), गायत्री ढंगे (८०.९५) विनायक निंबाळ (८०.५०) यांनी हे यश मिळविले. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन वालचंद शिक्षण समूहाचे समस्त विश्वस्त तसेच प्राचार्य डॉ. संतोष कोटी, उपप्राचार्य अनुप म्हेत्रे, पर्यवेक्षक डॉ. जीवराज कस्तुरे व समन्वयिका सारिका महिंद्रकर यांनी अभिनंदन केले




खोदूनच काढायचे झाले तर सगळेच भ्रष्टाचाराने पोखरलेले आहेत. आज सरकारची कामे गलगोटिया विद्यापीठासारखी झाली आहेत. आमचे काम गलगोटियासारखे बनावट नाही. आम्ही जे करतो ते प्रत्यक्षात दिसते.
**-आदित्य ठाकरे**, उबाठा नेते

तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
शुक्रवार, २० फेब्रुवारी २०२६




विलीनीकरण झाले नसतानाही त्या अगोदरच कोणत्या पदावर कोण बसणार हे सुद्धा ठरवून टाकले होते. त्याच्यामध्ये उपमुख्यमंत्री कोण होणार ही ठरले असेल. राष्ट्रीय अध्यक्ष कोण होणार हेदेखील ठरले असेल कदाचित.
**-छगन भुजबळ**, राकाँ नेते

## विचारपुष्प



धर्म शाश्वत आहे व अपरिवर्तनीय आहे कारण त्याला सकल चराचराला सुदृढ व सुव्यवस्थित ठेवायचे आहे. पण देश-काल-स्थिती बदलत असल्यामुळे धर्माला प्रत्यक्ष जीवनात युगानुकूल व स्थानानुकूल मार्गदर्शनही करावे लागते. म्हणून धर्म तात्त्विकदृष्ट्या स्थिर आहे पण व्यावहारिक दृष्टीने गतिमान आहे. यालाच 'सनातन' म्हणतात.
**- रंगा हरी**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. बौद्धिक प्रमुख

# भारताची डिजिटल प्रणाली जगासाठी दिशादर्शक

## फ्रान्सच्या राष्ट्राध्यक्षांकडून कौतुक, एआय परिषद प्रगतीच्या नवीन युगाची सुरुवात



◆ **नवी दिल्ली, १९ फेब्रुवारी**
रस्त्यावर स्टॉल लावणाऱ्या व्यक्तीला भारतात दहा वर्षांपूर्वी बँक खाते उघडता येत नव्हते. आज तोच विक्रेता मोबाईलवरून आर्थिक व्यवहार करतो. ही डिजिटल प्रणाली क्रांतीची क्षमता आहे. भारताची डिजिटल प्रणाली जगासाठी दिशादर्शक बनली आहे अशा शब्दांत फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष मॅन्युएल मॅक्रॉन यांनी कौतुक केले आहे.

राजधानी दिल्लीतील भारत मंडपम् येथे आयोजित 'इंडिया एआय इम्पॅक्ट' परिषदेत मॅक्रॉन यांनी भाषणाची सुरुवात 'नमस्ते' ने केली. एआय परिषद प्रगतीच्या नवीन युगाची सुरुवात असल्याचे नमूद करताना त्यांनी सांगितले की, कुठलीही कागदपत्रे नसलेल्या भारतातील व्यक्तीसाठी बँक खाते उघडणे आणि मोबाईलने आर्थिक व्यवहार करणे अधिक सोपे झाले. बँक खाते उघडण्यासाठी जगात कुठेही इतकी सोपी पद्धत नाही. भारताची बँकिंग डिजिटल प्रणाली इतर देशांसाठी दिशादर्शक ठरली आहे. भारताने जगातील इतर कोणत्याही देशापेक्षा वेगळी डिजिटल प्रणाली निर्माण केली. भारताची अर्थव्यवस्था जगात सर्वात वेगवान असण्यामागे डिजिटल प्रणालीची महत्त्वाची भूमिका आहे. भारताच्या डिजिटल पेमेंट प्रणालीतून दरमहा २० अब्ज रुपयाचे व्यवहार होणे, ही बाब जगासाठी एक उदाहरण आहे. ५०० दशलक्ष लोकांना डिजिटल आरोग्य ओळखपत्रे जारी करून भारताने विकसित देशालाही मागे टाकले.

### भविष्यात एआय जीवनाचा भाग असेल : सुंदर पिचाई



इंडिया एआय परिषदेत संबोधित करताना गुगल आणि अल्फाबेटचे सीईओ सुंदर पिचाई म्हणाले, भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात् एआय मानवी जीवनाचा भाग असेल. एआयचे फायदे निश्चित करण्यासाठी जगाचा एकत्रित दृष्टिकोन आवश्यक आहे. आज आपण मोठ्या बदलाच्या उंबरठ्यावर आहोत. प्रत्येकासाठी उपयुक्त असे एआय तयार करण्यासाठी आपण धैर्याने पाठपुरावा केला पाहिजे. आपण एकत्र काम केल्याशिवाय एआयचे पूर्ण फायदे कळणार नाहीत. जीवन सुधारण्यासाठी सार्वजनिक सेवांमध्ये एआय आणणे आणि व्यवसाय क्षेत्रात या तंत्रज्ञानाचा अवलंब वाढवणे आवश्यक आहे.

**२०२७ मध्ये जीनेव्हा येथे एआय परिषद**
स्वित्झर्लंड २०२७ मध्ये जीनेव्हा येथे एआय शिखर परिषदेचे आयोजन करेल, अशी घोषणा राष्ट्राध्यक्ष गाय पार्मेलिन यांनी केली. त्यांनी सांगितले की, एआय आपले भविष्य अभूतपूर्व वेगाने घडवत आहे. सर्वांनी एकत्र काम करणे, ज्ञान सामायिक करणे आणि एआय सर्वांना लाभदायक ठरेल याची खात्री करणे गरजेचे आहे. नियमांवर आधारित आंतरराष्ट्रीय व्यवस्थेप्रती आम्ही वचनबद्ध आहे. एआय ही केवळ गती किंवा अनुप्रयोगाची बाब नाही, तर त्याचा लोकांच्या जीवनावर थेट प्रभाव पडतो. ◀(वृत्तसंस्था)

# ७० हजार कोटी रुपयांची करचोरी!

**नवी दिल्ली, १९ फेब्रुवारी**
हैदराबादमधील एका बिर्याणी रेस्टॉरंट (चेन) च्या चौकशीत मोठ्या प्रमाणात करचोरीचा घोटाळा उघडकीस आला आहे. अन्न आणि पेय उद्योगातील हा घोटाळा हजारो कोटी रुपयांचा असू शकतो, असे मानले जाते. आयकर विभागाच्या हैदराबाद तपास युनिटने बिलिंग सॉफ्टवेअरमधील ६0 टेराबाइट डेटा तपासल्यानंतर गैरव्यवहार उघड झाला. देशभरातील १ लाखाहून अधिक रेस्टॉरंट्समध्ये हे सॉफ्टवेअर वापरले जाते.

२०१९-२0 पासून या रेस्टॉरंट्सनी किमान ७0,000 कोटींची विक्री लपवून ठेवली, असा संशय आहे. लपवलेल्या उत्पन्नावरील कर आणि दंडाची गणना अद्याप केलेली नसली तरी, आतापर्यंत तपासण्यात आलेले सॉफ्टवेअर देशभरातील रेस्टॉरंट बिलिंग सॉफ्टवेअर मार्केटच्या अंदाजे १०% नियंत्रित करते, असे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. १.८ लाखांहून अधिक रेस्टॉरंट्समधील डेटाचे विश्लेषण करण्यासाठी तपासकर्त्यांनी जनरेटिव्ह एआयसह डेटा विश्लेषण आणि एआय टूल्सचा वापर केला. देशभरातील एकूण ७0,000 कोटींच्या विक्रीपैकी, १३,३१७ कोटींचा डेटा हटवण्यात आला आहे.

## महत्त्वाचे

### शेअर बाजार १२३६ अंकांनी कोसळला

**मुंबई** : अमेरिका-इराणमधील वाढत्या भू-राजकीय तणावामुळे मोठ्या प्रमाणात विक्रीचा दबाव निर्माण झाल्याने मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक गुरुवारी १२३६ अंकांनी कोसळला. तीन सत्रांच्या तेजीच्या सत्राला ब्रेक लागत निर्देशांकात मोठी घसरण होऊन तो ८२,४९८ वर स्थिरावला. राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीत ३६५ अंकांची घसरण होऊन तो २५,४५४ या पातळीवर बंद झाला. मुंबई शेअर बाजारातील इंडिगो, महिंद्रा अ‍ॅण्ड महिंद्रा, अल्ट्राटेक सिमेंट, ट्रेन्ट, भारत इलेक्ट्रॉनिक्स लि., अदानी पोर्ट्स या मोठ्या कंपन्यांना आज विक्रीचा फटका बसला.

# भारताने रशियन तेल खरेदी थांबवली नाही

**मॉस्को, १९ फेब्रुवारी**
भारत-रशिया ऊर्जा भागीदारी दोन्ही देशांसाठी फायदेशीर आणि जागतिक तेल बाजारपेठेत स्थिरता राखण्यासाठी महत्त्वाची आहे. रशियन कच्चे तेल खरेदी करण्यासंदर्भात भारताच्या भूमिकेत कोणताही बदल झालेला नाही. भारतीय कंपन्यांनी तेलाची खरेदी करणे थांबविली नसल्याचे स्पष्ट करीत रशियाच्या परराष्ट्र मंत्री सर्गेई लावरोव्ह यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे दावे फेटाळून लावले.

पत्रपरिषदेत बोलताना लावरोव्ह म्हणाले, रशियन तेल खरेदी करण्याबाबत भारताच्या भूमिकेत कोणताही बदल झालेला नाही. भारताने रशियन हायड्रोकार्बन खरेदी करण्याबाबतचे धोरण बदलले आहे असे मानण्याचे आपल्याकडे कोणतेही कारण नाही. हे पाऊल दोन्ही देशांसाठी फायदेशीर आहे आणि आंतरराष्ट्रीय ऊर्जा बाजारपेठेत स्थिरता राखते. अमेरिका स्वतंत्र देशांना त्यांचे स्वतःचे निर्णय घेण्यापासून रोखण्याचा प्रयत्न करत आहे. यामध्ये शुल्क, निर्बंध आणि इतर दबाव यांचा समावेश आहेत. अमेरिकेने केलेल्या दाव्याला कोणताही आधार नाही आणि भारताने अद्याप यावर भूमिका स्पष्ट केलेली नाही. रशिया आणि भारत यांच्यातील ऊर्जा सहकार्य दीर्घकाळापासून मजबूत आहे.

# राम मंदिर लोकार्पणानंतर १ लाख कोटींची उलाढाल

## आयआयएम लखनौचा अहवाल, आर्थिक स्थितीत ऐतिहासिक परिवर्तन

◆ **लखनौ, १९ फेब्रुवारी**
अयोध्येतील राम मंदिराला दोन वर्षे पूर्ण झाली. भारतासह जगभरातून कोट्यवधी भाविक रामललाच्या चरणी नतमस्तक झाले आणि दररोज हजारो भाविक दर्शनासाठी येत आहे. अशातच आयआयएम लखनौच्या अहवालानुसार राम मंदिराचे लोकार्पण झाल्यानंतर देशभरात १ लाख कोटींची उलाढाल झाल्याची माहिती समोर आली आहे. राम मंदिराच्या लोकार्पणानंतर अयोध्येसह देशाच्या अर्थव्यवस्थेत ऐतिहासिक परिवर्तन झाले आहे.

आयआयएम लखनौच्या अभ्यासात राम मंदिराच्या बांधकामापूर्वी आणि नंतरच्या आर्थिक परिस्थितीचे तुलनात्मक विश्लेषण करण्यात आले. राम मंदिर बांधण्यापूर्वी अयोध्येची ओळख प्रामुख्याने एका पवित्र तीर्थस्थळापुरती मर्यादित होती. परंतु, लोकार्पणानंतर येथील आर्थिक घडामोडींमध्ये अभूतपूर्व वाढ झाली आहे. पर्यटन, गुंतवणूक, रोजगार आणि महसुलात लक्षणीय वाढ झाली. पर्यटन-आधारित उपक्रमांमधून मिळणारा महसूल २० हजार ते २५ हजार कोटीपर्यंत पोहोचला. आदरातिथ्य, बांधकाम, वाहतूक आणि सेवा क्षेत्रात रोजगाराच्या संधी झपाट्याने वाढल्या आहेत. पुढील ४ ते ५ वर्षांत पर्यटन, वाहतूक आणि आतिथ्य क्षेत्रात अंदाजे १.२ लाख प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष नोकऱ्या निर्माण होण्याचा अंदाज अहवालातून व्यक्त करण्यात आला.



**आदरातिथ्य उद्योगांना चालना**
राम मंदिराच्या लोकार्पणामुळे देशभरात १ लाख कोटींहून अधिक व्यवसायिक उलाढाल झाली, ज्यामध्ये अयोध्येने महत्त्वाची भूमिका बजावली. दररोज येणाऱ्या २००,००० हून अधिक भाविकांच्या गर्दीमुळे हॉटेल आणि संबंधित उद्योगांना चालना मिळाली आहे. अयोध्येत १५० हून अधिक नवीन हॉटेल्स आणि होमस्टे उघडली आहेत. राम नगरीतही प्रमुख हॉटेल साखळ्यांचा विस्तार होत आहे. ऑनलाइन ट्रॅव्हल प्लॅटफॉर्मवरील बुकिंगमध्ये चौपट वाढ झाली. ◀(वृत्तसंस्था)

**मूर्तींच्या मागणीत मोठी वाढ**
स्थानिक हस्तकला, धार्मिक स्मृतिचिन्हे आणि मूर्तींच्या मागणीत मोठी वाढ झाली आहे. याचा थेट फायदा कारागीर आणि स्थानिक उत्पादकांना झाला.अयोध्या आणि आसपासच्या भागात जवळपास ६,००० लघु उद्योग स्थापन झाले आहेत. अभ्यासात असेही म्हटले आहे की, लहान दुकानदार आणि रस्त्यावरील विक्रेत्यांचे दैनिक उत्पन्न २,५०० रुपयांपर्यंत पोहोचले आहे.

### अजित पवार विमान अपघात
## 'ब्लॅक बॉक्स'मधील डेटा डाऊनलोडला यश

**मुंबई** : महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांचा विमान अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना घडली होती २८ जानेवारी रोजी. त्यानंतर संपूर्ण राज्यावर शोककळा पसरली होती.या विमानात २ स्वतंत्र फ्लाईट रेकॉर्डर अस्तित्वात होते. ङ३ कम्युनिकेशन्स या कंपनीने उत्पादन केलेल्या डिजिटल फ्लाईट डेटा रेकॉर्डर मधील माहिती विमान अपघात तपास संस्थेच्या दिल्लीतील कार्यालयात यशस्वीरीत्या डाउनलोड करण्यात आली आहे.




नागपूर : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीदिनी आज नागपूर येथील निवासस्थानी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी नातवंडांसह महाराजांना अभिवादन केले.

# माचणूर यात्रेत दारु पिऊन गाडी चालविल्या प्रकरणी गुन्हा दाखल

**तभा वृतसेवा**
**मंगळवेढा दि. १९ फेब्रुवारी**
तीर्थक्षेत्र माचणूर येथे दारुचे सेवन करुन इरटिगा गाडी चालविल्या प्रकरणी वाहतूक शाखेच्या पोलीसांनी महंमद सय्यद तांबोळी (वय २५ वर्षे,रा. जागजी,जि.धाराशीव) या कार चालकाविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील फिर्यादी तथा पोलीस अंमलदार प्रविण जाधव यांच्यासह पोलीस हवालदार संभाजी यादव, पोलीस अंमलदार दुधाळ हे जिल्हा वाहतूक शाखेकडील दि.१२ फेब्रुवारी रोजी १.४0 वाजता तीर्थक्षेत्र माचणूर येथे यात्रेनिमित्त बंदोबस्त करीत असताना यातील आरोपी हा दारुचे सेवन करुन सुझूकी कंपनीची





इरटिगा गाडी नंबर एम.एच.४७ क्यू ६७९४ हे वाहन वेडेवाकडे चालवित येत असताना दिसला. त्यास पोलीसांनी हाताचा इशारा करुन थांबवून कार चालक तथा आरोपीस नाव व पत्ता विचारला असता त्याच्या तोंडाचा आंबट,उग्र घाण वास आल्याने त्याची ब्रेथॲनालायझर मशीनने तपासणी केली असता त्याची टेस्ट पॉझीटीव्ह आल्याचे दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. याचा तपास पोलीस करीत आहेत.

## पाकिस्तानात स्फोट, १६ ठार, १४ जखमी

**कराची** : पाकिस्तानमधील कराची येथे एका निवासी इमारतीत गॅस गळतीमुळे स्फोट होवून १६ लोकांचा मृत्यू झाला, तर १४ जखमी झाले. मृत्यूकांमध्ये महिला आणि मुलांचा समावेश आहे. गुल राणा कॉलनीमध्ये संशयास्पद गॅस गळतीमुळे स्फोट झाला, त्यानंतर इमारतीचा काही भाग कोसळल्याने हा अपघात झाल्याची माहिती एका पोलिस अधिकाऱ्याने दिली. बचाव पथकाने घटनास्थळी धाव घेत बचाव कार्य सुरू केले. पोलिसांनी परिसरात सुरक्षा वाढवली आहे, तर ढिगाऱ्याखाली अडकलेल्या लोकांचा शोध सुरू आहे

## राहुल गांधींसह २५ खासदारांना धमकी

**दिल्ली** : काँग्रेस नेते राहुल गांधी आणि २५ काँग्रेस खासदारांना गोळी घालण्याची धमकी देणारा व्हिडीओ अपलोड करणाऱ्या एका व्यक्तीला राजस्थान पोलिसांनी कोटा येथून अटक केली.व्हडीओत राज सिंह असे नाव सांगणारा व्यक्ती करणी सेनेचा प्रवक्ता आहे. त्याने लोकसभेत घडलेल्या एका घटनेवरून ही धमकी दिली होती. त्याने दावा केला की, नुकतेच पार पडलेल्या संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात २५ काँग्रेस खासदारांनी लोकसभा अध्यक्ष बिर्लांना शिवीगाळ केल्यामुळे कार्यकर्ते नाराज होते.



# मोहोळ पं.स.त भाजपाच्या गटनेतेपदी संजीव खिलारे

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. १९ फेब्रुवारी-**
मोहोळ पंचायत समिती भाजपाच्या गटनेते पदी संजीव माणिक खिलारे यांच्या नावाची घोषणा महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष, भाजपा सोलापूर जिल्ह्याचे जेष्ठ नेते माजी आमदार राजन पाटील यांनी केली.

चळवळीतील एका लढावू बाण्याच्या अभ्यासू कार्यकर्त्याला भारतीय जनता पार्टीने व पक्ष नेतृत्वाने मोहोळ पंचायत समिती गटनेता म्हणून संधी दिल्याने समाजातील सर्व स्तरातून चांगल्या प्रतिक्रिया उमटत आहेत. गुरुवारी कृषी उत्पन्न बाजार समिती मोहोळ येथे भारतीय जनता पार्टीच्या नवनिर्वाचित जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांची बैठक आयोजित केली असता सर्व नवनिर्वाचित सदस्यांनी मोहोळ पंचायत समिती गट नेता निवडीचे सर्वाधिकार माजी आमदार राजन पाटील यांना दिल्याने त्यांनी संजीव खिलारे यांचे नाव सुचविले. खिलारे हे पोखरापूर गणातून निवडून आले आहेत.

यावेळी जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश चवरे, जिल्हा सरचिटणीस विकास वाघमारे, मोहोळ शहर व तालुका पूर्व अध्यक्ष सतीश काळे, मोहोळ दक्षिण ता. अध्यक्ष रमेश माने, अल्पसंख्यांक सेलचे जिल्हा जिल्हाध्यक्ष मुजीब मुजावर, युवा मोर्चाचे तालुका अध्यक्ष अंकुश आवताडे, मोहोळ नगरपरिषद उपनगराध्यक्ष दत्ता खवळे, नगरसेवक सुशील क्षीरसागर, जिल्हा परिषद सदस्य अनुक्रमे लखन शिंदे, बालाजी नरुटे, पंचायत समिती सदस्य अस्लम चौधरी, उल्का पाटील, पार्वती गावडे, निलम मसलकर, कोमल आवताडे, अमिरिका कापसे, अक्षय खताळ, माजी नगरसेवक संतोष सुरवसे, माजी नगरसेवक अण्णा फडतरे, मंगेश गुंड इत्यादी उपस्थित होते.



# विधान परिषदेत राजेंद्र राऊतांना संधी मिळो

● उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांचे भगवंताकडे साकडे
● बार्शीत जिल्हा परिषद, बाजार समिती अन् नगरपालिका सदस्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१९ फेब्रुवारी-**
नुकत्याच झालेल्या बार्शी नगरपरिषद, जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकांमध्ये विजयी झालेल्या भाजपच्या सदस्यांचा सत्कार समारंभ बार्शीत पार पडला. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते विजयी सदस्यांचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाला माजी आमदार राजेंद्र राऊत, मोहन डांगरे, बाजार समितीचे सभापती विजय गरड, उपसभापती बाबा गायकवाड, नगराध्यक्षा तेजस्विनी कथले, उपनगराध्यक्ष रोहित पाटील, संतोष निंबाळकर, अरुण कापसे, अनिल डिसले, रमेश पाटील, असिफ तांबोळी, सुभाष लोढा, ॲड. अविनाश गायकवाड, डॉ. भारत पंखे, बाबा कापसे, श्रीमंत थोरात यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होते. यावेळी राजेंद्र राऊत यांनी बार्शीच्या विकासासाठी पाणी व रोजगाराला प्राधान्य देणार असल्याचे सांगितले. बार्शी उपसा सिंचन, साठवण तलाव व केटीवेअरच्या माध्यमातून सुमारे ५0 हजार हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आणण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. तीन एमआयडीसी उभारण्याचाही प्रयत्न सुरु असून, विधानसभा पराभवाची परतफेड जनतेने स्थानिक स्वराज्य संस्थांमधील विक्रमी विजयातून केली, असे ते म्हणाले. फडणवीस राऊतांना नक्कीच न्याय देतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. मंत्री चंद्रकांत पाटील यांनी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर 'कर्तृत्ववान नेतृत्व गैरसमजामुळे विधानसभेत पराभूत झाले. देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून राऊतांना विधान परिषदेत संधी मिळो,' अशी अपेक्षा आणि ५0 हजार हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आणण्याचा निर्धार केला.

**विरोधकांना पाणी पाजण्यासाठी पाणी बाटली भेट देऊन केला सत्कार**
आज मी नूतन विजयी उमेदवारांचा सत्कार करण्यासाठी पाणी बाटल्या आणल्या आहेत. त्या विरोधकांना पाणी पाजायला आणल्या आहेत. भाऊ तुम्ही ऑलरेडी पाणी पाजले आहे. यशाने हुरळून जाणारे राजेंद्र राऊत नाहीत. ॲक्टिव्हिटी करण्यात कमी नाहीत. मुख्यमंत्री त्यांना मित्र मानतात. त्यांचा एखादा शब्द आम्ही खाली पडू देत नाही, असे पाटील यांनी भाषणातून सांगितले. यावेळी मंत्री चंद्रकांत पाटील यांनी भेट म्हणून स्वतःच्या हातातील घड्याळ काढून माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या हातात बांधले. सूत्रसंचालन संदीप मिरगणे यांनी केले.

## अग्रलेख...

# एका रोबोटाने, धरिले वेठीला...

आपली सारी बुद्धिमत्ता पणाला लावून माणसाने विज्ञान व आधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्याने निर्माण केलेल्या रोबोटच्या मेंदूत आज्ञावलीचा अफाट साठा भरला असला, तरी मन नावाचा मानवी अवयव त्यास बहाल करण्याचे तंत्रज्ञान अद्याप उपलब्ध नाही. भारताच्या दृष्टीने अत्यंत प्रतिष्ठेच्या ठरलेल्या व कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्राच्या नव्या जागतिक वाटचालीस दिशा देणारे दालन ठरलेल्या कृत्रिम बुद्धिमत्ताविषयक जागतिक परिषदेत सादर करण्यात आलेल्या त्या प्रयोगातील रोबोटने तिथल्या तिथे आपले मन मोकळे करून, गलगोटियास युनिव्हर्सिटीच्या प्रतिनिधीचा खोटेपणा स्वतःच उघडकीस आणला असता किंवा आपल्या निर्मितीचे श्रेय घेणाऱ्या खोट्या माहितीने वैफल्यग्रस्त होऊन आत्महत्या केली असती. राजधानी दिल्लीत सध्या 'एआय इम्पॅक्ट समिट' नावाची जागतिक परिषद सुरू आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात जागतिक नेतृत्व करण्याच्या संधीची दालने भारतासाठी खुली होण्याची संधी या परिषदेतून भारतास लाभली आहे. भारत मंडपम येथे सुरू असलेल्या या परिषदेत ग्रेटर नॉयडामधील गलगोटियास युनिव्हर्सिटी या खाजगी विद्यापीठाच्या कृत्रिम बुद्धिमत्ताविषयक स्टॉलवर प्रदर्शित करण्यात आलेला ओरियॉन नावाचा यांत्रिक कुत्रा अभिमानाने मिरवला गेला. या कृत्रिम बुद्धिमत्तायुक्त यांत्रिक कुत्र्याचे तंत्रज्ञान आपणच विकसित केल्याचा दावा विद्यापीठाच्या प्रतिनिधीकडून केला गेला, तेव्हा तो ओरियॉन बाजूलाच उभा होता. आज्ञावलीनुसार आपल्या बुद्धिमत्तेची चुणूक दाखविणाऱ्या काही यांत्रिक कृती त्याने करून दाखविल्या; या विद्यापीठाने त्याच्या निर्मितीचे तंत्रज्ञान विकसित केले आहे, या तद्दन खोट्या माहितीवर मात्र त्याला काहीच करता आले नाही. कारण रोबोट कृत्रिम असला तरी माणसांसारखे मन नसते. सुमारे दोन वर्षांपूर्वी दक्षिण कोरियामधील गुमी सिटी कौन्सिल नावाच्या एका भागात प्रशासकीय कामासाठी तैनात रोबो एके दिवशी जिन्याच्या पायऱ्यांवरून खाली पडलेल्या अवस्थेत आढळला. सहसा यंत्रमानवाच्या तंत्रज्ञानात अशी कृती आढळत नसल्याने त्याने आत्महत्या केली, अशा चर्चेला जगभर ऊत आला आणि त्याच्या आत्महत्येची कारणे शोधण्यास सुरुवात झाली. कामाचा ताण असह्य झाल्याने व कामास प्रतिष्ठा मिळत नसल्याने त्याने आत्महत्या केली असा गमतीदार निष्कर्ष समाजमाध्यमांवर निघू लागला. प्रत्यक्षात हा त्यामधील तांत्रिक बिघाडाचा परिणाम होता. काही वर्षांपूर्वी अमेरिकेत सुरक्षा रक्षकाचे काम करणाऱ्या एका रोबोटने एका तळ्यात स्वतःस झोकून दिले, तेव्हाही नोकरीला कंटाळून त्याने आत्महत्या केल्याची चर्चा झालीच होती. पण रोबोटना मनच नसल्यामुळे थकवा, कंटाळा आणि खरेखोटेपणा अशा भावना नसतात; गलगोटियास युनिव्हर्सिटीच्या प्रतिनिधीची तद्दन खोटी फुशारकी सहन करूनही ओरियॉन नावाचा हा यांत्रिक कुत्रा शांतपणे बाजूला उभाच होता. या यांत्रिक कुत्र्याचे तंत्रज्ञान गलगोटियास युनिव्हर्सिटीत विकसित करण्यात आले आहे, असे या प्रतिनिधीने सांगितल्यानंतर लगेचच, प्रत्यक्षात मात्र तो चीनमध्ये बनविलेला रोबोट असल्याचे उघडकीस आले. हे खोटेपणाचे पितळ उघडे पडताच त्यांना भारताच्या या प्रतिष्ठित मंचावरून गाशा गुंडाळण्याचा आदेश देण्यात आला. निखळ बुद्धिमत्तेचे पारदर्शकपणे स्वागत करण्यासाठी आयोजित या परिषदेच्या जागतिक मंचाचा गैरफायदा घेऊन कृत्रिम बुद्धिमत्तेचे 'कॉपीपेस्ट तंत्रज्ञान' या युनिव्हर्सिटीच्या अंगलट तर आलेच; एका खोट्यापायी भारताच्या प्रतिष्ठेवरही समाजमाध्यमांतून प्रश्नचिन्हे उमटू लागली आहेत. यांत्रिक कुत्र्याचे तंत्रज्ञान चीनमध्ये विकसित झाले असून युनिव्हर्सिटीने दिलेली माहिती चुकीची व खोटी आहे, याची शहानिशा समाजमाध्यमे आणि या क्षेत्रातील तज्ज्ञांनी केल्यानंतर आता युनिव्हर्सिटीच्या स्टॉलची जागाच हटविण्याचा निर्णय घ्यावा लागल्याने, विद्यापीठाच्या या खोटेपणा किंवा खोडकरपणापायी कोणत्या अवघड परिस्थितीस आयोजकांना सामोरे जावे लागले असेल, याची कल्पना करता येणे कठीण नाही.

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात खोटेपणाला थारा नाही, हे आता या निमित्ताने उघड झाले ही त्यातील समाधानाची बाब मानावी लागेल. कारण या एका घटनेमुळे अशा प्रकारच्या जागतिक परिषदांमध्ये केवळ स्वतःच्या प्रज्ञा आणि प्रतिभेचाच आविष्कार दिसला पाहिजे, असा फतवा जारी करून बजावण्याची वेळ सरकारी यंत्रणा व मंत्रालयावर आली. अर्थात युनिव्हर्सिटीच्या या खोटारडेपणामुळे भारताची अब्रू गेली, असे म्हणणे धाडसाचे ठरेल. कारण एका युनिव्हर्सिटीकडून कृत्रिम बुद्धिमत्तेची कॉपी उघडकीस आल्याने संपूर्ण भारतीय तंत्रज्ञानावर आक्षेप घेणे चुकीचे ठरणार आहे. याचा राष्ट्रीय प्रतिष्ठेवर काही परिणाम होईल किंवा कसे, हे लगेचच स्पष्ट होणार नाही, पण ही घटना या क्षेत्रात कायमची नोंदली जाणार असल्याने, या क्षेत्रात काम करणाऱ्यांना आता अधिक पारदर्शकपणे व सावधपणे आपल्या बुद्धिकौशल्यावर आधारित तंत्रज्ञानाची कास धरावी लागेल, हे स्पष्ट झाले आहे. या प्रकारामुळे देशाच्या सामाजिक, सरकारी आणि राजकीय स्तरावर काहीसा परिणाम झाला आहे हे खरे आहे. कारण भारतीय प्रज्ञेचे प्रदर्शन करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या प्रतिष्ठित परिषदेत चिनी बनावटीच्या वस्तूंचे प्रदर्शन भरविले गेल्याच्या टीकेमुळे आता भारताची प्रतिष्ठा पणाला लागणार आहे. भारतातील कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील समुदाय, कंपन्या आणि विद्यापीठांना आता अधिक सखोल तपासणी आणि स्पष्टता व पारदर्शकता आवश्यक आहे, हे या निमित्ताने अधोरेखित झाले आहे. जागतिक मंचांवर देशाच्या प्रतिष्ठेला मान्यता मिळविण्याच्या प्रामाणिक प्रयत्नांना एखादा खोडसाळपणादेखील किती हानिकारक ठरू शकतो, हे या प्रकारामुळे दिसून आले आहे. आता या प्रकारामुळे भविष्यात भारतीय तंत्रज्ञान अधिक प्रामाणिक व पारदर्शी राहील अशी अपेक्षा करता येईल. कारण या क्षेत्रातील कोणाकडूनही केले जाणारे कोणतेही दावे-प्रतिदावे सत्यतेच्या कठोर निकषावर तपासून घेतले जातील. एकदा तोंड पोळल्यावर पुढचा घोटही फुंकून पिण्याचा शहाणपणा शिकण्यासाठी ही लाजीरवाणी घटना काहीशी उपकारकच म्हणावी लागेल. अशा घटनांतून देशाची प्रतिष्ठाही पणाला लागलेली असते.

जगभर विकसित होत असलेल्या कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा नैतिक, सुरक्षित आणि सर्वसमावेशक विकास कसा करता येईल आणि या तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर विधायक कामासाठी व मानवजातीच्या कल्याणासाठी कसा केला जाईल, यावर धोरणात्मक संवाद साधण्यासाठीचा मंच म्हणून या परिषदेकडे पाहिले जात आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर सर्वांना समान फायदे देणारा ठरावा व जबाबदारीने केला जावा, यावर परिषदेचा मुख्य भर आहे. यासाठी जगभरातील अनेक देश अनेक उपाय सुचवत आहेत, तर भारताने प्रत्यक्ष कृतीद्वारे यासाठी पुढाकार घेतला आहे. जगात हे तंत्रज्ञान भन्नाट वेगाने विकसित होत असले, तरी त्याचे लाभ सर्व देशांना सारख्याच प्रमाणात मिळत नाहीत. म्हणजेच या क्षेत्रातही मोठा जागतिक असमतोल निर्माण होत असून अनेक देश कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात अनुशेषग्रस्त राहण्याची भीती आहे. अशा देशांना या क्षेत्राचे लाभ मिळावेत, विकसनशील देशांमध्येही कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर सुलभ करणे व नवोद्योगांना या क्षेत्राच्या वापरासाठी प्रोत्साहन देणे ही भारताची भूमिका मान्य करून अनेक जागतिक नामवंत उद्योगांनी त्यामध्ये सहभागाची तयारी दर्शविली आहे. मायक्रोसॉफ्ट, गुगलसारख्या कंपन्या भारतासोबत यासाठी काम करण्यास उत्सुक असल्याचे संकेत या परिषदेतून मिळाले आहेत, तर भारतातील लाखो नागरिकांनी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या विधायक वापरासाठी नैतिक जबाबदारी स्वीकारण्याची वचनबद्धता व्यक्त केली आहे. या क्षेत्राच्या संभाव्य गैरवापरातून होणाऱ्या हानीचे भय वाढत असताना व सुरक्षितता, जबाबदारीची जाणीव आणि पारदर्शकता अशा जाणिवा जपल्या जात असून भारताच्या या प्रयत्नांची जागतिक स्तरावर स्तुती होत असताना, चिनी बनावटीचे प्रदर्शन घडविणाऱ्या या घटनेचा लाजीरवाणा प्रकार टाळावयास हवा होता, यात शंका नाही. याच गलगोटियास विद्यापीठास काही वर्षांपूर्वी, सर्वोत्तम खाजगी विद्यापीठ म्हणून गौरविण्यात आले होते, असे दिसते. त्याबाबत मतांतरेही आहेतच. आंतरराष्ट्रीय परिषदेतील त्यांच्या या कृतीमुळे या विद्यापीठाच्या प्रतिष्ठेसही धक्का लागला आहे.

---

## तंत्रवेध

### डॉ. दीपक शिकारपूर

# संवाद साधतील वाहने...

सुमारे सात हजार वर्षांपूर्वी समुद्रावर चालू शकेल अशी नौका कुवैतमधील उत्खननात दिसून आली. प्राण्यांचा वापर करून प्रवास ही पद्धत तर अनेक शतकांपासून लोकप्रिय आहे. अजूनही अनेक दुर्गम भागात प्रचलित आहे. उद्याच्या तंत्रमय भविष्यात अनेक पैलू क्रांतिकारी पद्धतीने बदलणार आहेत. अनेक उपकरणे, प्रथा, प्रक्रिया कालबाह्य होतील. मग या सर्व उत्क्रांतीला वाहन कसे अपवाद ठरेल? २० व्या शतकात संगणक जन्माला आले. पूर्वी खूप मोठ्या आकाराचे हे उपकरण स्वस्त, छोटे आणि शक्तिशाली होत गेले. हे तिन्ही प्रवाह एकाच वेळी कार्यरत होते. भौतिक जग आणि संगणकीय बिट, बाईटचे व्हर्च्युअल जग पूर्णपणे वेगळे होते. हे २०१० नंतर बदलू लागले. २०२६ नंतर त्यात आमूलाग्र बदल घडतील. सेलफोन, जीपीएस, इंटरनेट आणि नॅनो उर्फ सूक्ष्म तंत्रज्ञान यांच्या संगमातून एक अत्यंत वेगळ्याच प्रकारचे स्मार्ट जग लवकरच आपल्या आसपास दिसू लागणार आहे. संगणकीय सूक्ष्मतंत्राचा प्रवेश प्रत्येक पैलूमध्ये झालेला आढळेल; याला 'स्मार्ट कॉम्प्युटिंग' म्हटले जाते.

भविष्यकाळात एक-दोन किलोमीटरवर वाहतूक कोंडीची लक्षणे दिसू लागताच गाडीतील जीपीएस यंत्रणा पर्यायी मार्ग शोधेल. तंत्रज्ञानाची प्रगती होत आहे, तसतशी आपली वाहनेही अधिक स्मार्ट होत चालली आहेत. उद्याचे वाहन केवळ चालवण्यापुरते मर्यादित न राहता, आपले साथीदार, मदतनीस आणि सुरक्षिततेचे संरक्षक ठरणार आहे. उद्याचे स्मार्ट वाहन हे पूर्णपणे इंटरनेटशी जोडलेले असेल. त्यात कृत्रिम बुद्धिमत्ता, इंटरनेट ऑफ थिंग्ज आणि सेन्सर टेक्नॉलॉजी यांचा वापर असेल. याव्यतिरिक्त स्मार्ट वाहने प्रदूषणविरहित असतील. ती सौर किंवा विद्युत ऊर्जेवर चालतील. त्यामुळे पर्यावरणाचे रक्षण होईल आणि हवामान बदलावरही सकारात्मक परिणाम होईल. उद्याचे स्मार्ट वाहन हे अधिक आरामदायक, कार्यक्षम आणि सुरक्षित असेल. ते अधिक वैयक्तिकृत आणि कनेक्टेड असेल. अधिक लवचीक आणि अत्याधुनिक प्रवास पर्याय प्रदान करेल. उद्याचे वाहन रचतेच्या बाबतीतही बदलत आहे. त्यात सुटे हलते भाग कमी होऊन सिलिकॉन चिप्स, इंटरनेट ऑफ थिंग्ज, लिथियम बॅटरी असे अवयव असतील. चालकासमोरचा डॅशबोर्ड अधिकाधिक स्मार्ट होऊन चालकाला बॅटरी किती चार्ज आहे, जवळ चार्जिंग स्टेशन कुठे आहे, ट्रॅफिक जाम व वाहतुकीच्या मार्गाचा स्मार्ट सल्ला इत्यादीची इत्थंभूत माहिती देईल.

येत्या काळात वाहने अधिक प्रगत सस्पेन्शन आणि सीटिंग सिस्टिमसह येतील, जी अधिक आरामदायक प्रवास अनुभव प्रदान करतील. त्यात अधिक कार्यक्षम इंजिन असेल आणि ऊर्जा-सक्षम घटकांसह जास्त मायलेज आणि कमी उत्सर्जन देईल. इथे इलेक्ट्रिक, हायब्रीड असे अनेक घटक समाविष्ट असतील. स्मार्ट वाहने इंटरनेट आणि इतर उपकरणांशी सतत जोडलेली राहतील. यामुळे त्यांना रिअल टाईम वाहतूक माहिती, हवामानाचा अंदाज आणि इतर उपयुक्त माहिती मिळत राहील. उद्याचे स्मार्ट वाहन अधिक सुरक्षित असेल. स्वयंचलित ब्रेकिंग, लेन-बदल करण्यात मदत आणि अंधारात दृष्टी या बाबतीत ते चुणूकदार ठरेल. चालक गाडी ठीक चालवत नसेल तर ते अनेक प्रकारे त्याला सूचना देईल. गजर, झटका, समोरील वाहन वेगात उलट येत असेल तर आपोआप स्टिअरिंग वळवणे, अनेक निकटवर्तीयांना आपत्कालीन संदेश पाठविणे आदी गोष्टी करेल. उद्याचे स्मार्ट वाहन अधिक वैयक्तिकृत इंटीरियर आणि एक्सटीरियर डिझाईनसह उपलब्ध होईल, जे चालक आणि प्रवाशांच्या आवडीनिवडी पूर्ण करेल. उद्याचे स्मार्ट डिस्प्ले तंत्रज्ञान तुम्हाला स्मार्टफोन स्क्रीन समोर दाखवेल आणि ध्वनी सहायक (व्हॉईस असिस्टंट) तुम्हाला वाहन चालवत असताना संदेश ऐकवेल. त्यातील एआय टूल आपोआप काही निर्णय घेईल.

वाहनातील मनोरंजन प्रणाली अधिक प्रगत असेल. आपण गाडीमध्ये मागील बाजूला बसलो असल्यास समोरील सीट हे वर्क स्टेशन बनेल. त्यामुळे मनोरंजन, संगणकाचा वापर अशा अनेक गोष्टी शक्य होतील. वाहने एकमेकांशी आणि रस्त्यावरील पायाभूत सुविधांशी संवाद साधू शकतील. यामुळे सुरक्षितता वाढेल आणि वाहतूक व्यवस्थापन अधिक प्रभावी होईल. यामध्ये अजून एक प्रवाह असेल तो स्वयंचलित वाहनाचा. सध्या ते प्रगत देशात प्रायोगिक स्तरावर प्रचलित आहे, पण भारतात त्याच्या अनेक समस्या आहेत. सतत बदलणारे रस्ते (आजचा नो एन्ट्री पॉईंट उद्याचा वन-वे असू शकतो), कधीही कुठूनही वाहन अथवा प्राणी प्रकट होऊ शकते, अंधारात खड्डे असू शकतात. पुढील काही वर्षांमध्ये त्यावरही उपाय सापडतील. इलेक्ट्रिक वाहने आधुनिक युगातील पर्यावरणपूरक वाहतूक स्रोत म्हणून उदयास आली आहेत. या वाहनांमध्ये पेट्रोल किंवा डिझेलऐवजी विद्युत ऊर्जा वापरली जाते. त्यामुळे प्रदूषण कमी होते आणि पर्यावरणाचे नुकसानही कमी होते.

गेल्या दशकापासून देशामध्ये हायड्रोजनवर चालणाऱ्या वाहनांवरील संशोधनाला गती मिळाली आहे. अनेक देशांनी आपापल्या वाहन उत्पादकांवर कमीत कमी धूर सोडून पर्यावरणाची हानी शक्य तितकी टाळणारी इंजिने (व इंधनेही) शोधण्याचे, बनवण्याचे आणि वापरण्याचे बंधन आता घातले आहे. त्यामुळे वाहन उद्योगाच्या पारंपरिक चित्रात आणि एकंदर रचनेमध्ये मोठे बदल होऊ घातले आहेत. हायड्रोजन कार्स हे त्यातलेच एक महत्त्वाचे पाऊल आहे. ही हायड्रोजन कार चालते कशी हे आपण थोडक्यात वाचू. इथे हायड्रोजन पेट्रोलप्रमाणे, थेट जाळला जात नाही तर त्यातील रासायनिक ऊर्जेचे रूपांतर विजेमध्ये केले जाते. या विजेवर गाडीची चाके फिरवली जातात. मुख्य म्हणजे या वाहनाच्या एक्झॉस्ट पाईपमधून धूर नाही तर चक्क पाणी बाहेर येते; परिणामी प्रदूषण शून्य! हायड्रोजन तीन प्रकारे मिळतो. पेट्रोलियमच्या उत्पादन प्रक्रियेतून, कोळशापासून आणि पाणी व सेंद्रिय कचऱ्यातून. 'ग्रीन' म्हणजेच पर्यावरणस्नेही असल्याने या तिसऱ्या प्रकारच्या हायड्रोजनचा वापर या वाहनांसाठी केला जातो. या सर्व नवसंशोधनांकडे पाहताना कोणतेही एक विशिष्ट तंत्रज्ञानच श्रेष्ठ मानून त्याचाच वापर करण्याचा आग्रह धरण्यापेक्षा, सर्वोत्तम विविध तंत्रांचे एकत्रीकरण करून पर्यावरण रक्षणाचा अंतिम हेतू साध्य करणे महत्त्वाचे आहे, असे म्हणता येईल.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

---


## वेध

### सोनाली पवन ठेंगडी

# पालकांचेच समुपदेशन व्हावे!

सध्या परीक्षांचा हंगाम आहे. बारावीची परीक्षा सुरू आहेच आणि आता दहावीची सुरू होते आहे. आता या परीक्षांना अर्थ उरला नाही, प्रवेश परीक्षांवरच सगळा भर असतो असे कोणीही म्हणत असले, तरी पूर्वापार बोर्डाच्या परीक्षांना असलेले महत्त्व अबाधित आहे. त्यातही दहावीची परीक्षा तर विद्यार्थ्यांच्या जीवनातील मोठा टप्पा आहे. यानंतरच त्यांच्या जीवनाची दिशा खऱ्या अर्थाने ठरते. त्यामुळे मग दहावी कधी, असे कोणी विचारले की, त्या विद्यार्थ्याला जेवढे दडपण येणार नाही तेवढा ताण पालकांच्या चेहऱ्यावर दिसतो.

विद्यार्थ्यांच्या अतिताणाची परिणती आत्महत्येत होण्याच्या घटना लक्षात घेता मागील काही वर्षांपासून बोर्डाच्या आणि शाळांच्या वतीने विद्यार्थ्यांच्या समुपदेशनाचे कार्य हाती घेण्यात आले. ताणाचे व्यवस्थापन कसे करायचे हे समुपदेशक आणि शिक्षक सतत त्यांना समजावत असतात. अभ्यासासोबतच हे आवश्यक आहेच. पण, विद्यार्थ्यांसाठी समुपदेशक नेमताना पालकांचाही थोडा विचार व्हायला हवा. कारण बहुतांश ठिकाणी मुलांच्या तणावाचे कारण अभ्यासाइतकेच पालकांकडून येणारा दबाव हेही असल्याचे लक्षात येईल. काही घरांमध्ये तर मुलगा किंवा मुलगी आठव्या, नवव्या वर्गात गेल्यापासूनच लष्करी शिस्तीचा अवलंब केला जातो. (काही लोक याला घरात मार्शल लॉ लागला असेही म्हणतात) सर्वप्रथम गारपीट येते ती टीव्हीवर. केबल बंद करा..झाला. नंतर ट्यूशन कुठे कुठे लावायची, याचे काथ्याकूट सुरू होते. विशेष म्हणजे, असे सर्व करणारे पालक एकदाही शाळेत जाऊन शिक्षक किंवा मु'याध्यापकांशी बोलण्याची तसदी घेत नाहीत.



वास्तविक, या नाजूक वळणावर एकटे शिक्षक किंवा एकटे पालक काहीच करू शकत नाही. दोघांनी मिळून विद्यार्थ्यांचे हे वळण सोपे करायचे असते. म्हणून नवव्या वर्गापासूनच पालकांनी आपल्या पाल्याच्या शिक्षकांची भेट घेऊन त्याच्याविषयी सविस्तर बोलले पाहिजे. त्याच्या दोषांचे भांडवल न करता किंवा त्याविषयी त्याला टचटच बोलून टोचण्यापेक्षा त्याच्या गुणांच्या उत्कर्षाकडे लक्ष दिले पाहिजे. म्हणजे त्याचा कोणता विषय आवडीचा आहे किंवा पक्का आहे, हे जाणून घ्यावे. पक्का विषय कळला की कच्चा विषय आपोआपच कळतो. असे झाले की, त्याच्या त्रुटींना भरून काढण्याचे काम आपोआपच सुरू होते. पालकांनी शिक्षकांशी चांगला संवाद ठेवण्यासोबतच मुलांशीही बोलत राहिले पाहिजे. नेहमीच अभ्यासाशिवाय दुसरे काही बोलायचेच नाही, हा खाक्या चुकीचा आहे. उलट, मुलांना विश्वासात घेण्यासाठी त्याच्या आवडीच्या चांगल्या विषयावर बोलावे. म्हणजे त्याला कळू लागेल की पालक आपल्याशी चांगले बोलू शकतात. एकदा मुलांना लक्षात आले की आपण पालकांशी कोणत्याही विषयावर मोकळेपणाने बोलू शकतो, तिथे पालकांनी अर्धी लढाई जिंकली असे समजावे. कारण मुलांमध्ये पालकांविषयी विश्वास निर्माण होणे सर्वाधिक गरजेचे असते. दुर्दैवाने सध्या याचाच अभाव दिसतो. 'अरे किती महत्त्वाचे वर्ष आहे तुझे,' असे मुलांशी बोलल्याने त्याचा ताण वाढतोच. शिवाय यातून पालकांचाही ताण दिसून येतो. मुळात, या सर्व समस्यांचे मूळ एकच आहे की, बोर्डाचे निकाल पालकांसाठी प्रतिष्ठेचा मुद्दा असतो. अमक्याच्या मुलाला किंवा मुलीला ९० टक्क्यांच्या वर मिळाले, हा विचार त्यांच्या डोक्यातून जात नाही. यावर उपाय एकच आहे की, पालकांनी आपले मूल खरंच ९० टक्के किंवा त्याच्या आसपासची टक्केवारी मिळवू शकेल का, याचे आकलन करून घ्यावे. आपला मुलगा किंवा मुलगी सर्वसाधारण विद्यार्थी आहेत, ही वास्तविकता प्रथम पालकांनी स्वीकारली पाहिजे. मग तिथून पुढे त्याच्या प्रगतीचा आलेख कसा उंचावता येईल, हे शिक्षकांसोबत बोलून ठरवावे. पण, मुलांचे सर्वसाधारणपण स्वीकारताना त्यांना यासाठी कधीही टोमणे मारले जाऊ नये. कारण दहावी-बारावीचे निकाल हेच आयुष्य नाही, यशस्वी जीवनाचे अंतिम सूत्र नाही, हे आता सर्वांना कळले आहे. फक्त आपल्या अपत्याची वेळ आली की पालकांना बरेचदा ते वळतच नाही. मग तिथेच सगळी समस्या उद्भवते. शिवाय नववी-दहावीचे वर्ष आल्यानंतरच झोपेतून जागे झाल्यासारखे पालक मुलांच्या मागे लागतात. हे चुकीचे आहे. लहानपणापासूनच मुलांमध्ये टीव्ही, मोबाईल, अभ्यास, खेळ, संस्कारक्षम गोष्टी यांची योग्य ती शिस्त बाणवली पाहिजे. असे झाले तरच मुलांच्या बोर्डाच्या वर्षांमध्ये पालकांना त्यांना हाताळणे जड जाणार नाही. म्हणून आता गरज विद्यार्थ्यांसोबतच पालकांच्याही समुपदेशनाची आहे, असे म्हणावे लागते.

७७५५९३८८२२

---

## दखल

### मोरेश्वर बडगे

# रोहित पवार हे दुसरे 'शरद पवार?'

राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे विमान अपघातात निधन झाले. या घटनेने सारा महाराष्ट्र हळहळला. अजितदादा राष्ट्रवादीचे सुप्रीमो होते, राज्याच्या महायुती सरकारमध्ये सहभागी होते. त्यांच्या अकाली जाण्याने पवार कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. सत्ताधारी राष्ट्रवादीचा उत्तराधिकारी कोण, हाही प्रश्न उभा झाला. अशा हवेत अचानक दोन राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाच्या चर्चेने जोर धरला. अजितदादांची अंतिम इच्छा या स्वरूपात विलीनीकरणाचा मुद्दा चर्चेत आला. राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील आणि खुद्द अजित पवार यांच्या तब्बल १२ बैठका झाल्या होत्या, असे सांगितले गेले. मात्र, अजितदादांनी आपल्या हयातीत विलीनीकरणाचा विषय कधीही छेडला नव्हता. मग या निमित्ताने अजितदादांचे काका म्हणजे शरद पवार काही वेगळा नॅरेटिव्ह सेट करू पाहत होते का? विलीनीकरण कोणाचे आणि कोणत्या पक्षात? हाही प्रश्न होता. दोन राष्ट्रवादीचे विलीनीकरण करून अजितदादांच्या राष्ट्रवादीवर ताबा मिळण्याचा डाव होता का? मात्र, अजितदादांच्या गटाने वेगवान हालचाली केल्या. त्यामुळे काकांच्या राष्ट्रवादीला हात चोळत बसावे लागले. अजितदादांच्या निधनाच्या चौथ्याच दिवशी अजितदादांच्या पत्नी खासदार सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्रिपदाची शपथ देवविण्यात आली. त्या विधिमंडळ पक्षाच्या नेत्या बनल्या. आता तर सुनेत्रा पवार या राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्ष होत आहेत. त्यामुळे दोन राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाचा विषय मागे पडला आहे.

सत्तेच्या सोबत जायचे की नाही या मुद्यावर राष्ट्रवादीत फूट पडली होती. अजित पवार यांनी बंड केले. आपले आमदार घेऊन अजितदादा महायुती सरकारमध्ये सामील झाले होते. अलिकडे विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने काका-पुतणे जवळ आले होते. विधानसभा निवडणुकीत अजितदादांना ४१ जागा जिंकता आल्या तर शरद पवारांचा पक्ष १० जागांवर थांबला. स्वतःच्या ताकदीचा अंदाज आल्याने शरद पवारांनी पुतण्याशी जुळवून घ्यायचे ठरवले होते. विलीनीकरणाच्या चर्चा सुरू होत्या काय? हा वादाचा विषय असला, तरी या चर्चा मीडियामध्ये नक्कीच चालू होत्या. त्या प्रमाणे सुप्रिया सुळे यांना केंद्रात मंत्रिपद मिळणार होते. जयंत पाटील अर्थमंत्री तर रोहित पवार राज्यात मंत्री होणार होते. भाजपाने रोहित यांच्या नावाला विरोध केला होता, अशी माहिती आहे. अजितदादा गटाचे नेते प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे हेही दोघे विलीनीकरणाच्या विरोधात होते. आता तब्बल तीन वर्षे कुठल्याही निवडणुका



नाहीत. इतका काळ रिकामे राहावे लागेल या कल्पनेनेच राष्ट्रवादीतल्या अनेकांचा रक्तदाब वाढला आहे. आपण बारामतीचे तिसरे वारसदार असताना आपला विचार होत नाही, हे पाहून रोहित पवार गडबडले असणार. पण करणार काय? सुनेत्रा वहिनींच्या शपथविधीनंतर पार्थ आणि जय या बंधूंनी सूत्रं हाती घेतली. हे दोघे आईचे राजकारण सांभाळताना इतरांना आसपास फिरकू देत नाहीत. तोंडाला आलेला घास हिसकावला गेला, अशी भावना रोहित पवार यांची झाली असणार. त्यातून ते आज शंकासुर झालेले दिसतात. अजितदादांच्या विमानाची दुर्घटना हा अपघात होता, असे त्यांचे आजोबा शरद पवारांनी सुरुवातीलाच सांगितले असतानाही रोहित पवार सारख्या शंका उपस्थित करीत आहेत. आपण अपघात सांगितलं असताना नातू दुसरेच काही भलते सलते बोलतो आहे, हे शरद पवारांना खटकत का नाही? हे कोडे आहे. त्यांनी आपल्या नातवाला झापल्याचं ऐकिवात नाही. मुळात शरद पवार जे बोलतात ते त्यांना बोलायचे नसते हा अनेकांचा अनुभव आहे. मग आजोबानेच वेगळे बोलायला रोहित पवार यांना पुढे केले नसेल, याची खात्री नाही. रोहित पवारांना तर 'शरद पवार' व्हायचं आहे. या आधी पार्थलाही त्यांनी छळले होते. आजोबा बोलल्यानंतरही रोहित पवारांनी पत्रपरिषद आणि गौप्यस्फोटांचा सपाटा लावला आहे. हा अपघात कसा घातपात आहे हे दाखवण्यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा चालवली आहे. सुनेत्रा वहिनींना बदनाम करता येत नाही म्हणून मग इतरांवर शरसंधान सुरू आहे, ते सुनील तटकरेंना टार्गेट करताहेत. 'फाईल उशिराने आल्याने अजितदादांना दुसऱ्या दिवशी सकाळी विमानाने बारामतीला जावे लागले. ती फाईल प्रफुल्ल पटेल यांची होती' असेही ते सांगतात. विलीनीकरण होत नाही तर मग समोरच्याला ब्लॅकमेल करायचं. दबाव आणायचा. रोहित पवार हा आपल्या आजोबांचा 'बोलका बाहुला' आहे का? कारण शरद पवार काहीही करू शकतात.

या विमान अपघाताला महिनाही व्हायचा आहे. विमानाचा अपघात आहे. महत्त्वाचा माणूस त्यात मारला गेला आहे. विमान अपघाताची चौकशी, तपास हा सारा प्रकार गुंतागुंतीचा असतो. दुसऱ्यांदा आमदार झालेल्या रोहित पवारांना हे कळत नसेल अशातला भाग नाही. तरीही ते उठसूट आरोप करीत आहेत. त्यांना खाज सुटली काय की ते स्वतःचे उपद्रवमूल्य सिद्ध करू पाहत आहेत? शंकासुराच्या या उतावीळपणाला काय म्हणायचं ? नागरी उड्डयन मंत्रालय तसेच महाराष्ट्राची सीआयडी या अपघाताची चौकशी करीत आहेत. सुरुवातीला गप्प असलेल्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी या अपघाताची सीबीआयमार्फत चौकशी करा, अशी मागणी महाराष्ट्र सरकारकडे केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ही मागणी मान्यही करतील. त्या प्रमाणे तपास होईल. पण रोहित पवारांना कशाची घाई झाली आहे ते कळायला मार्ग नाही. अपघातानंतर लागलेल्या आगीत या विमानाचा ब्लॅक बॉक्स खराब झाला आहे. त्यामुळे आतल्या वैमानिकांचं शेवटचं संभाषण मिळवणं जड जात आहे. कुठल्याही विमान अपघातात ही समस्या येते. ती दुरुस्त केली जाते. रोहित म्हणतात त्या प्रमाणे तो घातपात असेल तर तो कशाने झाला? कोणी केला? कशासाठी केला? हे प्रश्न उपस्थित होतात. 'विमान मुद्दाम आदळलं' असं रोहित म्हणतात. कुठलाही पायलट असं विमान आदळू शकतो का? विमानात दोन टँक भरून इंधन होतं, असे ते म्हणतात. विमानात इंधन भरून ठेवायची टँक घ्यायला ती काय 'वडापाव'ची गाडी आहे? विमान कंपनीकडेही ते बोट दाखवतात. मग आजपर्यंत त्यांचे किती अपघात झाले? ते सारे तांत्रिक मुद्दे तपासावे लागतील. त्यासाठी वेळ देणे आवश्यक आहे. पण वाट पाहायची सोडून रोहित पवार वारंवार अकलेचे तारे तोडताहेत ते भयंकर आहे. मला त्यांचे पॉवर प्रेझेंटेशन कव्हर करणाऱ्या मीडियाची कीव येते. एकही पत्रकार उलट प्रश्न करीत नाही. रोहित जे बोलतात ते श्रद्धा भावनेने ऐकून घेतात. रोहित काहीही बोलतील. पण ते कायद्याच्या कसोटीवर टिकायला पाहिजे ना. सध्या जे सुरू आहे ते बेताल सुरू आहे. बिनबुडाचे आणि निरर्थक सुरू आहे. शरद पवारही हेच करायचे. मुंबईमध्ये ११ बॉम्बस्फोट झाले होते तेव्हा शरद पवारांनी काय थाप मारली होती ते आठवा. शरद पवारांच्या थापांना कधी 'गुगली' तर कधी 'भाकरी फिरवली' असे सांगितले गेले. आजोबाने केले तेच सध्या नातू करतो आहे. खरे तर शरद पवारांनी आता रिटायर व्हायला पाहिजे. राजरोस थापेबाजीचा त्यांचा वारसा चालवायला नातू आला आहे. लवकरच राज्य विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होत आहे. त्यात अजितदादांना श्रद्धांजली वाहणारा शोक प्रस्ताव येणार आहे. सीबीआय चौकशी जाहीर होणार असेल तर चर्चा काय करणार? मग रोहित पवार यांचे तोंड गप्प करण्यासाठी सीबीआय चौकशी लावली काय? सध्या सारे संशयाच्या घेऱ्यात आहे. सुनेत्रा वहिनींच्या हातात गेम आहे. सारे बोलताहेत. पण त्या गप्प आहेत. ज्या दिवशी सुनेत्रा वहिनी बोलायला लागतील तेव्हा भूकंप होईल.

९८५०३०४१२३


(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

---

### आधुनिक काळात होतायत् शेणाच्या चाकोल्या लुप्त

होळी सणाला भारतभरात वेगवेगळ्या प्रथा परंपरा आहेत. त्यातील अशीच एक परंपरा विदर्भात प्रसिद्ध आहे, ती म्हणजे शेणापासून तयार होत असलेले गोळे किंवा चाकोल्या. गाईच्या शेणापासून तयार होणाऱ्या या चकऱ्यांना चाकोल्या सुद्धा म्हटलं जातं. आधी शेणाच्या चाकोल्यांची ही माळ होळीमध्ये अर्पण करून होळी पेटवली जायची. पूर्वीच्या काळात होळीची लगबग सुरू होताच घरोघरी विशेषतः वृद्ध आणि चिमुकले चाकोल्या बनवण्यात व्यस्त दिसायचे. मात्र आता ही परंपरा कुठेतरी लुप्त झालेली दिसून येते. २५-३० वर्षांपूर्वीची होळी आणि आजची होळी यात बराच फरक पडला आहे. होळी लाकडांची असली तरीही तयार केलेला शेणाच्या चाकोल्या होळीच्या पूजेच्या वेळी टाकल्या जायच्या. लहान मुले दोन दिवसआधीच या चाकोल्या बनवायचे. त्यांनी बनविलेल्या लहान लहान चाकोल्या माळेत ओवता याव्यात यासाठी मध्यभागी एक छिद्रही ठेवले जायचे. त्या पूर्णपणे सुकल्या की त्याची माळ बनवली जायची. त्यावेळी या चाकोल्यांच्या माळा होळीत टाकल्या जायच्या.

धार्मिक मान्यतानुसार होलिका दहनात नकारात्मक गोष्टींचा नाश होतो आणि येणाऱ्या नव्या ऋतूप्रमाणे सर्वकाही नव्याने प्रारंभ होते. म्हणूनच लोक होलिका दहनाने सर्व वाईट गोष्टी जाळून टाकतात. शेणकूट जाळण्यामागील धार्मिक श्रद्धा आहे. हिंदू धर्मात गाय पूजनीय आहे आणि तिच्या शेणाची देखील पूजा केली जाते. शेणाची गोवरी शुभतेचे प्रतीक मानली जाते. तिला जाळल्याने आजूबाजूची नकारात्मक ऊर्जा निघून जाते. म्हणूनच हिंदू धर्मात जेव्हा एखाद्याचा मृत्यू होतो तेव्हा मृतदेहाजवळ शेणाची चिता रचली जाते. जेणेकरून त्या व्यक्तीच्या शरीरातील नकारात्मक ऊर्जा निघून जावी.



केवळ या कार्यात नाही तर कोणतेही धार्मिक कार्य असेल तर होम हवनमध्ये गोवरी जाळल्या जातात. हिंदू धर्मात गायीची पूजा केली जाते आणि शेण हे पवित्रतेचे प्रतीक देखील मानले जाते. शेणाचा वापर केल्याने घरात समृद्धी येते आणि नकारात्मक ऊर्जा दूर होते. अनेक वेळा गाईच्या शेणाचा वापर वनौषधी बनवण्यासाठी केला जातो. त्यामुळे होलिका दहनात

## वाचक पत्रे

शेण जाळल्यास आजूबाजूची सर्व वाईट गोष्टी, नकारात्मक ऊर्जा आणि वाईट रोगांचाही नाश होतो.

**नितीन दुर्बुडे**/९५०३६४८६३०

●● ●●

### विद्यार्थ्यांना दिलासा द्या

कोराडीत परीक्षेच्या भीतीने एका विद्यार्थिनीने आत्महत्या केली. विद्यार्थी खूपदा परीक्षेच्या आधी अभ्यास झाला नाही म्हणून, पेपर नीट गेला नाही म्हणून, तर नापास झालो म्हणून आत्महत्या करतात. सर्वच मुलांमध्ये अपयश पचविण्याची ताकद नसते. खूपदा आई-वडिलांनी मुलांकडून अवास्तव अपेक्षा, शाळेत मास्तरांचा धाक, ट्युशनसाठी हजारो रुपये खर्च झालेले यामुळे मुलांचे मानसिक संतुलन बिघडते. अपयशाची भीती वाटते. म्हणून सर्वांनी प्रथम मुलांच्या मनाचा विचार करावा. घरातील वातावरण उगीच गंभीर ठेवू नये. परीक्षा आहे म्हणून टीव्ही, खेळणे, थोड्याशा गप्पा मारणे यावर अनावश्यक बंधन ठेवू नये. यश-अपयश काहीही येवो आम्ही तुझ्या पाठीशी आहोत ही भावना मुलांच्या मनात निर्माण करा. दुसऱ्यांशी आपल्या मुलांची स्पर्धा करू नका. सर्वांची बुद्धी समान नसते. सकारात्मक विचारांची सवय लावा. अपयश पुढील यशाची पायरी आहे हे समजावून सांगा. परीक्षा पुन्हा देता येईल पण आयुष्याचं काय? परीक्षेत अनुत्तीर्ण होऊन आयुष्यात यशस्वी झालेल्यांची उदाहरणे मुलांना सांगा. आयुष्यापेक्षा परीक्षा मोठी नाही.

**निर्मला गांधी**/९११२२७५२८४

●● ●●

### विकत घेणारेही दोषी

'पांढऱ्या कोटातील 'काळा' कारभार' हा वेधमधील लेख डॉक्टर व वैद्यकीय क्षेत्रातील अयोग्य गोष्टींचा पर्दाफाश करणारा आहे. वर्तमानात डॉक्टरकडे जाताना लोक खूप विचार करतात. कारण आपण कुठल्या साखळीत अडकून तर जाऊ नाही ना, अशी भीती मनात असते. त्याचप्रमाणे एखाद्या इस्पितळात दाखल करतानाही खूप विचार करावा लागतो. कारण दाखल करतानाच भरावी लागणारी अनामत रक्कम आणि त्यांच्या दुपटी-तिपटीने होणारे बिल! पण लहान लेकराला दाखल करून ते विकणे हे अत्यंत लज्जास्पद कृत्य असून त्याने वैद्यकीय पेशाला काळिमा फासला आहे. मुळात एखादे बालक दत्तक घेण्याचा पर्याय असताना ते विकत घेण्यासाठी त्या बाजारात जाणारेही तितकेच दोषी आहेत. हल्ली सर्वांनाच सगळं काही फटाफट हवं असतं. त्यामुळे कायदेशीर गोष्टीत होणारा विलंब टाळण्यासाठी बाळ विकत घेणारे आणि ते विकणारे डॉक्टर दोघेही घृणेस पात्र आहेत. वैद्यकीय क्षेत्राकडे आधी सन्मानाने आणि आदराने पाहिलं जायचं, पण आता या क्षेत्रात येणंही महाग झाल्यामुळे की काय, त्यात विविध कृष्णकृत्ये होताना दिसतात तेव्हा माणसाचा माणुसकीवरचा विश्वास उडतो.

**माया हेमंत भाटकर**/९८६९०७४४९९

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस tbedit2016@gmail.com

तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

## महत्वाचे...



### ईच्छा भगवंताची परिवाराच्या वतीने आमदार कल्याणशेट्टी यांचा सत्कार

**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**

ईच्छा भगवंताची परिवाराच्या वतीने आमदार सचिन कल्याणशेट्टी, शांभवीताई कल्याणशेट्टी, मिलन कल्याणशेट्टी आणि सागर कल्याणशेट्टी यांचा सन्मान करण्यात आला. अक्कलकोट तालुक्यात पार पडलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत भाजपाने दणदणीत विजय मिळवत एकहाती सत्ता संपादन केली. चपळगाव जिल्हा परिषद गणातून पाणीदार आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या पत्नी शांभवीताई मोठ्या मताधिक्याने विजयी झाल्या. सागर यांनी पंचायत समिती गणातून विजय मिळवला. याचबरोबर अक्कलकोट नगर परिषदेच्या नगराध्यक्षपदी मिलन विराजमान झाले. या यशानिमित्त त्यांचा सत्कार करण्यात आले. मार्गदर्शक किसन जाधव यांनी त्यांचा फेटा बांधून, पेढे भरवून व हार घालून गौरव केला. भाजप म्हणजे विकास आणि विकास म्हणजे भाजप हे समीकरण अक्कलकोटकरांनी पुन्हा अधोरेखित केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण व पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर जिल्ह्यात भाजप अव्वल स्थानी पोहोचला असून, त्यात आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या सक्षम, धडाडीच्या नेतृत्वाचे मोलाचे योगदान असल्याचे भाजप नगरसेवक किसन जाधव यांनी सांगितले. अक्कलकोट ही ब्रह्मांडनायक श्री स्वामी समर्थ यांचे पावन भूमी असून धार्मिक व पर्यटनदृष्ट्या शहराचा झपाट्याने विकास करण्याचा संकल्प आमदार कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केला धार्मिक नगरीचा सर्वांगीण विकास हेच आमचे ध्येय, असेही त्यांनी सांगितले. यावेळी प्रभाग २२च्या नगरसेविका चैत्रालीताई गायकवाड, उद्योजक शिवराज गायकवाड, चेतन नागेश गायकवाड, यशवंत जाधव, संतोष गायकवाड हुडको, हुलगप्पा शासम, महादेव राठोड, प्रसाद मनीगर्ल आदी उपस्थित होते.



### छत्रपती शिवाजी प्रशालेत पुरातन शस्त्र पाहण्यास गर्दी

**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी**

छत्रपती शिवाजी प्रशालेत शिवमुर्तीची प्रतिष्ठापना आणि शस्त्र व पुरातन नाण्यांचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते शिवमुर्तीचे पूजन व प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. प्रशालेच्या आवारात भरविलेल्या या प्रदर्शनात पुरातन शस्त्रे व पुरातन नाणी ठेवण्यात आली आहेत. इतिहासाला उजळणी मिळण्यासाठी हे प्रदर्शन भरविल्याचे मराठा समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष मनोहर सपाटे यांनी सांगितले. महापौर कोंड्याल म्हणाले, इतिहासाची जपवणूक व संवर्धन करण्यासाठी जुन्या काळातील शस्त्र व नाणी यांचे प्रदर्शन भरवण्याची आवश्यकता आहे. महाराजांचे शौर्य व दूरदृष्टी, राष्ट्रभक्ती ही प्रत्येकांसाठी प्रेरणादायी आहे. विद्यार्थ्यांनी इतिहासातून प्रेरणा घेऊन समाजहितासाठी काम करावे. यावेळी ज्ञानेश्वर सपाटे, महादेव गवळी, विनायकराव पाटील, प्रभाकर खंडाळकर,सुरेश पवार, मुकुंद जाधव,नागेश हावळे, शिवदास चटके, अशोक चव्हाण, राजेंद्र शिंदे, प्राचार्य नितीन मोटे, प्रा.युवराज सुरवसे दत्ता भोसले, अलका सुरवसे, सुजाता जुगदार मंजुश्री पाटील सूत्रसंचालन सारिका महामुनी यांनी केले. आभार महेश माने यांनी मानले.



### शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयाच्यावतीने बार्शीत शैक्षणिक साहित्याचे प्रदर्शन आयोजन

**बार्शी, दि. १९ फेब्रुवारी-**

येथील शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयाच्यावतीने आंतरवासिता उपक्रमांतर्गत श्री भगवान महावीर नगरपालिका शाळा क्रमांक दोन येथे शैक्षणिक साहित्य प्रदर्शनाचे उद्घाटन नगराध्यक्षा तेजस्विनीताई कथले यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रशासन अधिकारी भारत बावकर, पर्यवेक्षक सुरेश शिंदे, प्राचार्य डॉ. दीपक गुंड, मुख्याध्यापक महेश नेवरे, हेमंत शाहीर, मुख्याध्यापक अशोक सानप, दिनकर पाटील, रवी मिरगणे, संजय गोरे, दत्ता सोनवणे, अमोल नलवडे आणि प्रसाद मिरगणे उपस्थित होते. शालेय आंतरवासिता अंतर्गत नगरपालिका शाळा क्रमांक दोनमध्ये विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या शैक्षणिक साधनांचे प्रदर्शन आयोजित केले होते. यामध्ये मराठी, हिंदी, इंग्रजी, गणित, विज्ञान, परिसर अभ्यास या विषयावर आधारित विविध प्रकारच्या शैक्षणिक साधनांची निर्मिती विद्यार्थ्यांनी केलेली होती. प्राचार्य डॉ. दीपक गुंड यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. या शैक्षणिक साहित्य प्रदर्शनाच्या उद्घाटनाप्रसंगी तेजस्विनीताई कथले यांनी आपल्या मनोगतमध्ये या उपक्रमाचे कौतुक केले व विद्यार्थ्यांना याचा फायदा निश्चितच होईल, असे मत व्यक्त केले. यानंतर या आंतरवासिता अंतर्गत राबवलेल्या विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण हे मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यामध्ये चित्रकला स्पर्धा, लिंबू चमचा स्पर्धा तसेच संगीत खुर्ची स्पर्धा यामध्ये प्रथम द्वितीय व तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार कुमारी बरबडे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे नियोजन हे आंतरवासिता विभाग प्रमुख डॉ. साबळे व डॉ. जळकुटे जे. बी. यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक महेश नेवरे यांच्या नेतृत्वाखाली शिक्षिका श्रीमती शोभा बारबोले, श्रीमती वीणा कुरनावळ, श्रीमती आफ्रिन शेख तसेच बालवाडी विभाग प्रमुख श्रीमती परदेशी व श्रीमती मठपती यांनी विशेष परिश्रम घेतले.

# स्वीकृत, स्थायी व परिवहन सदस्यांच्या नियुक्तीवर आज शिक्कामोर्तब

**▶▶ १० स्वीकृतीसह स्थायीचे १६ तर परिवहनचे १२ सदस्य होणार फायनल**

**▶▶ उत्सुकता शिगेला; भाजपात मोठी रस्सीखेच**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**

सोलापूर महापालिकेची नवीन टर्ममधील पहिली सर्वसाधारण सभा शुक्रवार, २० फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता बोलवण्यात आली आहे. या सभेत १० स्वीकृत सदस्य, स्थायी समितीचे १६ तर परिवहन समितीच्या १२ सदस्यांची नियुक्तीवर शिक्कामोर्तब होणार आहे. प्राप्त ६२ अर्जांपैकी स्वीकृत नगरसेवकसाठी दहा नावे फायनल होतील.

महापौर विनायक कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा महानगरपालिकेच्या कै. यशवंतराव बळवंतराव सभागृह (कौन्सिल हॉल) येथे होईल. नगरसचिव प्रवीण दंतकाळे यांनी प्रसिद्ध केलेल्या अजेंड्यानुसार विविध नेमणुका होतील. प्रशासकीय प्रस्तावांबरोबर सभासद प्रस्तावदेखील सभा पटलावर आहेत.

**संख्याबळानुसार सदस्यांची नियुक्ती**

स्थायी समिती व परिवहन समिती सदस्यांची नियुक्ती ही महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१-अ मधील तरतुदीनुसार मान्यताप्राप्त पक्षाचे अथवा नोंदणीकृत पक्षाचे किंवा गटाने तौलनिक संख्याबळानुसार करण्यात येणार आहे. ही नेमणूक करताना सभागृह नेता, विरोधी पक्षनेता आणि पक्षाचे व गटाचे नेत्यांच्या सल्ल्यानुसार कार्यवाही ठेवावी लागणार आहे. नाम निर्देशित सदस्य व परिवहन समिती सदस्यपदासाठी महानगरपालिका पालिका सदस्यांप्रमाणे शपथपत्र तद्अनुषंगिक कागदपत्रे महानगरपालिकेतील विविध खात्याचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**बी २ उठविण्यासंदर्भात सभासद प्रस्ताव**

महापालिकेचे सदस्य विनोद भोसले, सिध्देश्वर कमटम, विजया खरात यांनी सोलापूर शहरातील विविध परिसरातील मिळकतींवर असलेल्या बी २ संदर्भात या सर्वसाधारण सभेपुढे सभासद प्रस्ताव ठेवला आहे. बी २ (सत्ता प्रकार) उठवण्याकरिता राज्य शासनास विनंती करण्यासाठी सर्वसाधारण सभेकडे मान्यतेस्तव हा पाठविण्यात येत आहे. संबंधित मिळकतींवर बी-२ (सत्ता प्रकार) असल्यामुळे खरेदी-विक्री बंद आहे. या ठिकाणी बांधकाम परवाने मिळत नसल्याकारणाने महानगरपालिकेच्या उत्पन्नावर विपरीत परिणाम होत आहे. महापालिकेस मिळणारे उत्पन्न ठप्प झाले आहे. बी-२ (सत्ता प्रकार) उठल्यास, नियमितपणे व्यवहार सुरू होतील, संबंधित चाळी असतील त्यांना स्वतःचा मालकी हक्क मिळण्यास मदत होईल तसेच शासनाचा भरीव असा १ टक्के महसूल महानगरपालिकेस प्राप्त होईल व महानगरपालिकेस मिळकत कराच्या माध्यमातून भरीव असे उत्पन्न मिळेल. असे या प्रस्तावात म्हटले आहे. अनेक चाळी ज्या जीर्ण अवस्थेमध्ये आहेत, त्यांना बी २ (सत्ता प्रकार) रद्द होऊन मालकी हक्क मिळाल्यास या ठिकाणी भविष्यामध्ये पुनर्विकास करण्यास मदत होईल. सभेने बी २ (सत्ता प्रकार) उठविण्याकरता राज्य शासनास विनंती करावी, असे या प्रस्तावात नमूद केले आहे.

**६२ अर्जांपैकी दहा स्वीकृत होणार फायनल**

महापालिकेतील स्वीकृत सदस्यत्वासाठी एकूण ६२ अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यापैकी पक्षीय बलाबलानुसार भाजपकडे नऊ तर एमआयएम कडे एक जागा जाणार आहे. भाजपाने एकूण इच्छुक विविध जणांना अर्ज भरण्याच्या सूचना दिल्या असल्या तरी त्याहूनही अधिक अर्ज दाखल झाले आहेत. यामुळे भाजपात मोठी रस्सीखेच होणार आहे. दुसरीकडे एमआयएम पक्षाने वरिष्ठांच्या आदेशानुसार तिघांनी अर्ज भरले आहे. गटनेत्यांनी सालार यांचे नाव अधिकृत असल्याचे स्पष्ट केले आहे. या सभेत स्वीकृत सदस्य नावे फायनल होतील.

**मनीष केत यांच्या रूपाने एका पत्रकाराची एन्ट्री होणार**

दरम्यान, स्वीकृत सदस्यत्वासाठी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेश अध्यक्ष मनीष केत यांनीही अर्ज दाखल केला आहे. त्यांचे नाव जवळपास निश्चित मानले जात आहे. यामुळे यंदा सोलापूर महापालिका सभागृहात त्यांच्या रूपाने एका पत्रकाराची एन्ट्री होईल.

## विधानपरिषदेसाठी लिंगायत युवा चेहरा म्हणून संधी द्या : चाकोते

**तभा वृत्तसेवा,**
**द. सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी -**



दिल्ली येथे काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांची भेट घेऊन विधानपरिषदेसाठी इच्छुक असून संधी देण्याची मागणी काँग्रेस सेवादल यंग ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष व अखिल भारतीय वीरशैव लिंगायत महासभेचा राष्ट्रीय उपाध्यक्ष सुदीप चाकोते यांनी केली आहे . यावेळी पक्ष संघटन, आगामी राजकीय दिशा आणि युवकांच्या भूमिकेबाबत सविस्तर चर्चा झाली.

पक्ष अत्यंत अडचणीच्या काळातून जात असताना गेल्या २५ वर्षांपासून मी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची विचारधारा लोकांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य प्रामाणिकपणे केले आहे. युथ काँग्रेसचा अध्यक्ष असताना सोलापूर जिल्ह्यात युवकांची मोठी फळी उभी केली. संपूर्ण महाराष्ट्रभर तसेच दिल्लीमध्येही आंदोलनं केली; पोलिसी कारवाईला सामोरं जात अनेक गुन्हे अंगावर घेतले, तरीही पक्षाशी एकनिष्ठ राहिलो.आज काँग्रेस सेवादल यंग ब्रिगेडच्या माध्यमातून युवकांना काँग्रेसची विचारधारा प्रशिक्षणाद्वारे संपूर्ण महाराष्ट्रभर पोहोचवत आहोत. प्रतिकूल परिस्थितीतही पक्षाशी तत्वनिष्ठ राहून काँग्रेस पुन्हा बळकट करण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत.

मी लिंगायत समाजाचा असून महाराष्ट्रात सव्वा कोटी ते दीड कोटी लिंगायत बांधव आहेत. विशेषतः पश्चिम महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर वास्तव्य आहे. सध्या मी अखिल भारतीय वीरशैव लिंगायत महासभेचा राष्ट्रीय उपाध्यक्ष म्हणून कार्यरत आहे.जर विधानपरिषदेत युवक वीरशैव लिंगायत चेहरा म्हणून मला संधी मिळाली, तर संपूर्ण महाराष्ट्रातील लिंगायत समाजाला एका छत्राखाली संघटित करून २०२९ मध्ये पक्षाला निश्चितच मोठा राजकीय लाभ मिळवून देता येईल, असा विश्वास आहे.

## पिलीवचे कोहिनूर इलेक्ट्रिकल्स हे दुकान फोडून सव्वा लाखांचा माल लंपास

**पिलीव परीसरात चोऱ्यांचे सत्र काही केल्या थांबेना**

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि.१९ फेब्रुवारी-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील बसस्थानकापासुन पुर्व दिशेला हाकेच्या अंतरावर असणाऱ्या कोहिनूर इलेक्ट्रिकल्स या दुकानाचे पाठीमागील शर्टर उचकटून १७ फेब्रुवारी सायंकाळी ७.३० ते १८ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजण्याच्या दरम्यान दुकानात प्रवेश करुन २६००० रुपये किमतीची पॉलीकॅब केबल, २८००० रुपये किमतीची वायडिंग वायर, १०००० रुपये किमतीचे वायरचे तिन बंडल, ३०००० किमतीचे कॉपर वायरचे स्क्रॅब, १०००० रुपये किमतीचा सीसीटीव्ही डिव्ही आर बॉक्स, ८००० रुपये किमतीचा कॉपर बुत, ४००० रुपये किमतीचा वायर बंडल, ३२०० रुपये किमतीचे दोन वायर बंडल, १८०० रुपये किमतीची वायर असा एकुण १,२५,५०० रुपये किमतीचा माल व सीसीटीव्ही डिव्ही आर बॉक्स चोरुन नेल्याचे तक्रार चेतन कैलास काळे यांनी दिली आहे.यानुसार अज्ञात व्यक्तीविरुद्ध माळशिरस पोलीस ठाण्यात ४४/२०२६ भारतीय न्याय संहीता कलम ३०५ अ,३३१(४) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याचा अधिक तपास सहायक पोलीस निरीक्षक जानकर हे करीत आहेत.

पिलीव परीसरात गेल्या काही दिवसांपासून ठराविक लोकांच्या म्हणजेच शिक्षक कॉलनी, विद्यानगर या बसस्थानकापासुन दक्षिणेकडील भागातच मोठ्याप्रमाणात सतत चोऱ्या होत आहेत . मात्र कोणत्याही चोरीचा तपास लागलेला नाही यामुळे नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे .पोलीस प्रशासनाने रात्रीची गस्त वाढवण्याची नागरिकांमधुन मागणी होत आहे.मात्र या पिलीव पोलीस चौकीला चार चाकी वाहन नसल्यामुळे पोलीस प्रशासनाला रात्रीची गस्त घालणे अडचणीचे ठरत आहे.



_ याच दुकानातून गतवर्षी २६ जानेवारी २०२५ मध्ये मोठी चोरी झाली होती .त्यानंतर एक वर्षांनी पुन्हा एकदा चोरी झाली .यावरुन ही चोरी निश्चितच संशयास्पद असुन यामध्ये माहीतगार व्यक्तीचा हात असल्याचे बोलले जात आहे.


**IDFC FIRST Bank Limited**

(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

IDFC FIRST Bank

**वित्तीय मालमत्तेचे सुरक्षा आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज अंमलबजावणी कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेले आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखले जाणारे) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तीचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांचे कर्ज एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) यांना त्यांच्याकडून देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून लागू होणाऱ्या कराराच्या दरानुसार आकारले जातील.

| अ. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 60903289 | मालमत्तेवर कर्ज | 1. सुनिल दिगंबर जंगम<br>2. सुनिता सुनिल जंगम | 23/01/2026 | INR 2,12,992.59/- |

**मालमत्तेचा पत्ता :** सीटीएस क्रमांक ५९६, ग्राम मालमत्ता १६०/४, एकूण क्षेत्रफळ ३९.०० चौ. मीटर बांधकाम असलेले प्रॉपर्टीचे सर्व भाग आणि पार्सल, सुतार गल्ली, घेरडी येथे स्थित, तालुका: सांगोला, जिल्हा: सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०९, आणि पूर्वेकडे अशी सीमा: नारायण धुळा खुलापे पश्चिम: गट क्रमांक १५२ उत्तर: सी.टी.एस. क्रमांक ५९७ दक्षिण: सी.टी.एस. क्रमांक ५९६ पैकी

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करणेस मनाई आहे.

**सही/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये एकत्र केलेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँकलिमिटेडम्हणून ओळखले जाते)**

**दिनांक : 20/02/2026**
**स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र**



**TENDER NOTICE**

**Supply, Installation, Commissioning & Testing of Seed Cleaning & Grading Unit (2 TPH) ( Semi Automatic)**

The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project. Naitik Agro Producer Company Ltd is one of the beneficiaries of the project and is inviting offline bids for the above-mentioned machinery. The bid document is available on the project website, **www.smart-mh.org,** in the tender and procurement section. The last date for submission of offline bids is **02.03.2026** up **to 01.00 PM.** Any updates or notices shall be published on the aforementioned website only.

**DIU Dharashiv, Above Punjab National Bank,**
**ATMA Office, Near Central Building Chowk, Dharashiv-413501**



**जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर**
**(पाणी टंचाई शाखा)**

दुरध्वनी क्र. ०२१७-२७३१०२०, २१ (विस्तार १४८) E-mail- solapurpanitanchai@gmail.com
फॅक्स ०२१७- २६२११२० संकेतस्थळ - http//solapur.gov.in

क्र. उजिम /पाणीटंचाई/प्र.क्र. ३/२०२६/आरआर/२८ दि. १६/०२/२०२६

**ई- निविदा प्रसिध्दी सूचना**
**जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर**

अ. सोलापूर जिल्ह्यातील पाणी टंचाई भासणाऱ्या संभाव्य गावे, वाड्या, वस्त्या व तांडे, क वर्ग नगर पालिका यांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणेसाठी खाजगी टँकर / ट्रक पुरवठा कंत्राटासाठीची कालावधी ई-निविदा सूचना प्रसिध्द करणेत येत आहे.
उपरोक्त ई- निविदे बाबत फॉर्मची विक्री व स्विकृती व निविदा उघडण्याची कार्यवाही पुढील प्रमाणे राहिल.

| | |
|---|---|
| १. निविदा फॉर्म ऑनलाईन उपलब्ध दिनांक | **२३.०२.२०२६ ते १६.०३.२०२६ दु. १२.०० वाजेपर्यंत** |
| २ निविदा फॉर्म ऑनलाईन स्वीकृतीचा दिनांक | **२३.०२.२०२६ ते १६, ०३.२०२६ दु. १२.०० वाजेपर्यंत** |
| ३. प्री बिड मिटींग दिनांक | **२६.०२.२०२६ वेळ दु.४.०० वाजता** जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर |
| ४. निविदा लिफाफा १ व २ उघडण्याचा दिनांक व ठिकाण | **१७.०३.२०२६ वेळ दु. ३.०० वाजता** जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर |

निविदा फॉर्म विक्री व स्वीकृतीची कार्यवाही वरील कालावधीत **http://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने करणेत येईल. **दि. २३.०२.२०२६ ते दि. १६.०३.२०२६** या कालावधीत ऑनलाईन उपलब्ध आहे. तसेच सर्व निविदाधारकांनी जिल्हाधिकारी कार्यालय, (पाणी टंचाई शाखा) सोलापूर येथे (मॅन्युअल) तांत्रिक लिफाफा निविदा उघडणेच्या दिवशी प्रत्यक्ष सादर करणे आवश्यक आहे. अधिक माहिती उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच सविस्तर निविदा सूचना http://solapur.gov.in वरही उपलब्ध आहे
अधिक माहितीसाठी १८००३०७० २२३२ या टोल फ्री क्रमांकावर व या कार्यालयाचा दुरध्वनी क्र. ०२६७-२७३१०२०, २१ विस्तार १४८ वर संपर्क साधावा.

**विमाका/पुणे/जाहि./३२१/२०२५-२६**

**सही/-**
**जिल्हाधिकारी सोलापूर**



**जाहिर प्रसिध्दीकरण**

**श्रीम. अनुराधा गजानंद शिंदे**
रा. कर्जाळ ता. अक्कलकोट -- अर्जदार
**विरुध्द**
जन्म मृत्यू नोंदणी, कार्यालय
ग्रामपंचायत, नागणसूर ता अक्कलकोट -- सामनेवाला

ज्याअर्थी, यातील अनुराधा गजानंद शिंदे रा. कर्जाळ ता. अक्कलकोट यांनी या कार्यालयाकडे अर्ज करुन त्यांचा मुलगा शांतकुमार गजानंद शिंदे यांचा जन्म दि. ०१/०१/२०११ रोजी मौजे नागणसूर ता. अक्कलकोट येथे झाला आहे. परंतू माझ्या मुलाच्या जन्माची नोंद हे सामनेवाला यांच्या दप्तरी आढळून आले नाही. त्यामुळे अर्जदार यांनी त्यांच्या मुलाच्या जन्माची नोंद शांतकुमार गजानंद शिंदे या नावाने जन्म दाखला मिळण्याकामी जन्म-मुत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) अन्वये मा. तहसिलदार अक्कलकोट यांच्या न्यायालयात दि. ०३/०९/२०२५ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांच्या मुलाच्या जन्म दाखला मिळणेकामी कोणाची हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात आपण स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे मांडावे. मुदतीत कोणचाही काही हरकत अथवा म्हणने न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला देण्यात येईल,

हे आज दि. १६/०२/२०२५ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्याने प्रसिध्द केले असे.

शिक्का

**सही/-**
**तहसिलदार अक्कलकोट**



**जाहिर प्रसिध्दीकरण**

**श्रीम. अनुराधा गजानंद शिंदे**
रा. कर्जाळ ता. अक्कलकोट -- अर्जदार
**विरुध्द**
जन्म मृत्यू नोंदणी, कार्यालय
ग्रामपंचायत, नागणसूर ता अक्कलकोट -- सामनेवाला

ज्याअर्थी, यातील अनुराधा गजानंद शिंदे रा. कर्जाळ ता. अक्कलकोट यांनी या कार्यालयाकडे अर्ज करुन त्यांचा मुलगा सतिश गजानंद शिंदे यांचा जन्म दि. ०१/०१/२०१२ रोजी मौजे नागणसूर ता. अक्कलकोट येथे झाला आहे. परंतू माझ्या मुलाच्या जन्माची नोंद हे सामनेवाला यांच्या दप्तरी आढळून आले नाही. त्यामुळे अर्जदार यांनी त्यांच्या मुलाच्या जन्माची नोंद शांतकुमार गजानंद शिंदे या नावाने जन्म दाखला मिळण्याकामी जन्म-मुत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) अन्वये मा. तहसिलदार अक्कलकोट यांच्या न्यायालयात दि. ०३/०९/२०२५ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांच्या मुलाच्या जन्म दाखला मिळणेकामी कोणाची हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात आपण स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे मांडावे. मुदतीत कोणचाही काही हरकत अथवा म्हणने न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला देण्यात येईल.

हे आज दि. १६/०२/२०२५ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्याने प्रसिध्द केले असे.

शिक्का

**सही/-**
**तहसिलदार अक्कलकोट**



**जाहिर प्रसिध्दीकरण**

**श्रीम. अनुराधा गजानंद शिंदे**
रा. कर्जाळ ता. अक्कलकोट -- अर्जदार
**विरुध्द**
जन्म मृत्यू नोदणी, कार्यालय
ग्रामपंचायत, नागणसूर ता अक्कलकोट -- सामनेवाला

ज्याअर्थी, यातील अनुराधा गजानंद शिंदे रा. कर्जाळ ता. अक्कलकोट यांनी या कार्यालयाकडे अर्ज करुन त्यांची मुलगी काजल गजानंद शिंदे हिचा जन्म दि. १८/०१/२००८ रोजी मौजे नागणसूर ता. अक्कलकोट येथे राहत्या घरी झाला आहे. परंतू माझ्या मुलीच्या जन्माची नोंद हे सामनेवाला यांच्या दप्तरी आढळून आले नाही. त्यामुळे अर्जदार यांनी त्याच्या मुलीच्या जन्माची नोंद काजल गजानंद शिंदे या नावाने जन्म दाखला मिळण्याकामी जन्म-मुत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) अन्वये मा. तहसिलदार अक्कलकोट यांच्या न्यायालयात दि. ०३/०९/२०२५ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांच्या मुलीच्या जन्म दाखला मिळणेकामी कोणाची हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात आपण स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाचीही काही हरकत अथवा म्हणने न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला देण्यात येईल.

हे आज दि. १६/०२/२०२५ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्याने प्रसिध्द केले असे.

शिक्का

**सही/-**
**तहसिलदार अक्कलकोट**

www.tarunbharat.net
तरुण भारत



सोलापूर, शुक्रवार, २० फेब्रुवारी २०२६

# टी-२० विश्वचषकाचा थरार





## महत्त्वाचे

### साई सुदर्शनची आयपीएलच्या तयारीला सुरुवात

**नवी दिल्ली** : गत डिसेंबरमध्ये अहमदाबादमध्ये मध्य प्रदेशविरुद्धच्या विजय हजारे चषक सामन्यात उजव्या बरगडीला फ्रॅक्चर झाल्यानंतर बराच काळ मैदानाबाहेर राहिलेला गुजरात टायटन्सचा फलंदाज बी. साई सुदर्शनने कर्णधार शुभमन गिलसह आयपीएल २०२६ च्या तयारीला सुरुवात केली आहे. गुजरात टायटन्सने येथील मिराज आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियममध्ये मुख्य प्रशिक्षक आशिष नेहरा आणि सहाय्यक प्रशिक्षक पार्थिव पटेल यांच्या नेतृत्वाखाली हंगामपूर्वी शिबिरासह आयपीएल २०२६ च्या तयारीला पूर्ण जोमाने सुरुवात केली आहे. भारतासाठी सहा कसोटी आणि तीन एकदिवसीय सामने खेळलेल्या सुदर्शनला सामन्यात धाव पूर्ण करण्यासाठी डायव्हिंग करताना सातव्या उजव्या बरगडीचा आतील भाग फ्रॅक्चर झाला आहे. त्यानंतर त्याने बंगळुरूमधील बीसीसीआयच्या सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये तपासणी केली व तिथे त्याचे पुनर्वसन झाले. आमच्या परदेशी संघात, इंग्लंडचा यष्टिरक्षक-बॅटर जोस बटलर, अफगाणिस्तानचा फिरकीपटू रशीद खान, दक्षिण आफ्रिकेचा आघाडीचा वेगवान गोलंदाज कागिसो रबाडा आणि न्यूझीलंडचा अष्टपैलू खेळाडू ग्लेन फिलिप्स यांना आयपीएल २०२६ हंगामासाठी कायम ठेवण्यात आले आहे.

### पाकिस्तान हॉकी महासंघाच्या अध्यक्षांचा राजीनामा

**कराची** : ऑस्ट्रेलियाच्या अलिकडच्या दौऱ्यात खेळाडूंना रस्त्यावर उतरवणाऱ्या गैरव्यवस्थापनानंतर पाकिस्तान हॉकी महासंघाचे (पीएचएफ) अध्यक्ष तारिक बुगती यांनी गुरुवारी राजीनामा दिला. त्यामुळे पाकिस्तान हॉकीमधील संकट आणखी वाढले, परंतु त्यानंतर पीएचएफवर टीका केल्याबद्दल कर्णधार अम्मद शकील बटवर दोन वर्षांची बंदी घालण्यात आली. आपण महासंघाचे संरक्षक-प्रमुख, पंतप्रधान शेहबाज शरीफ यांना राजीनामा पाठवला आहे, असे बुगती म्हणाले. मी माझा राजीनामा पत्र पंतप्रधानांना पाठवला आहे परंतु मी त्यांना आणि फील्ड मार्शल असीम मुनीर यांना एफआयएच प्रो लीग हॉकी दरम्यान ऑस्ट्रेलियामध्ये घडलेल्या संपूर्ण परिस्थितीची निष्पक्ष चौकशी करण्याची विनंती करतो, असे ते म्हणाले.

### १३ वी लडाख मॅराथॉन १० सप्टेंबरपासून

**नवी दिल्ली** : जगातील सर्वात उंच एआयएमएस-प्रमाणित मॅराथॉन, लडाख मॅराथॉन २०२६ मध्ये आपली १३ वी आवृत्ती साजरी करणार आहे. ही मॅराथॉन १० ते १३ सप्टेंबर दरम्यान लडाखच्या कठोर आणि खडकाळ भूप्रदेशात होणार आहे. क्युरेटेड सिल्क रूट अल्ट्रा (१२२ कि.मी.) आणि खारदुंग ला चॅलेंजर (७२ कि.मी.) अल्ट्रा शर्यतींसह लडाख मॅराथॉनच्या सर्व सहा शर्यतींसाठी नोंदणी गुरुवारी सुरू झाली आणि अधिकृत वेबसाइटद्वारे अर्ज करता येतील. दोन अल्ट्राशिवाय या कार्यक्रमात मॅराथॉन (४२ किमी), हाफ मॅराथॉन (२१ किमी), ११.२ किमी धावणे आणि ५ किमी रन फॉर फन यांचा समावेश असेल. १३ सप्टेंबर २०२६ रोजी गणल्यानुसार ५ किमीसाठी १२ वर्ष ते २४ वर्षांपर्यंत वयोमर्यादा सिल्क रूट अल्ट्रासाठी आहे. सर्व वेळेवर शर्यतींसाठी ११,५०० फूटांपेक्षा जास्त उंचीवर धावताना आवश्यक असलेल्या कठोरतेशी जुळवून घेण्यासाठी निर्धारित वेळेत पात्रता कामगिरी करणे आवश्यक आहे.

### ॲनिसिमोव्हा, ॲण्ड्रिव्हा उपांत्यपूर्व फेरीत

**दुबई** : दुबई ओपनमध्ये एलेना रायबाकिना ही शेवटची खेळाडू होती. तिने आपल्या सामन्यातून निवृत्ती घेतली, तर अमांडा ॲनिसिमोवा आणि मिरा ॲण्ड्रिव्हा दोघांनीही विजय मिळवून उपांत्यपूर्व फेरी गाठली. दुसऱ्या क्रमांकाची खेळाडू ॲनिसिमोव्हाने पहिल्या फेरीत बाय आणि दुसऱ्या फेरीत पुढे चाल मिळवल्यानंतर स्पर्धेतील आपला पहिला सामना खेळला.

# अपराजित वेस्ट इंडीज 'सुपर-८'मध्ये

### इटलीवर ४२ धावांनी विजय

◆ **कोलकाता, १९ फेब्रुवारी**

आयसीसी टी-२० विश्वचषक २०२६ स्पर्धेत ईडन गार्डन्सवर गुरुवारी आपल्या शेवटच्या गट साखळी फेरीच्या सामन्यात शाय होपची दमदार फलंदाजी व वेगवान गोलंदाज शमार जोसेफने चार व मॅथ्यू फोर्डने टिपलेल्या तीन बळींच्या जोरावर वेस्ट इंडीजने इटलीवर ४२ धावांनी विजय नोंदविला. आधीच सुपर एटमध्ये स्थान मिळविणाऱ्या वेस्ट इंडीजने गट साखळी फेरीत आपले चारही सामने जिंकून ८ गुणांसह क गटात अव्वल स्थान मिळविले आहे. सहा गुणांसह इंग्लंडने दुसरे स्थान मिळवित सुपर एटमध्ये प्रवेश मिळविला आहे. स्कॉटलंड (२), इटली (२) आणि नेपाळचे आव्हान संपुष्टात आले आहे.




इटलीचा हंगामी कर्णधार हॅरी मॅनेंटी याने वेस्ट इंडीजविरुद्ध नाणेफेक जिंकून जेसन होल्डरच्या ३०० व्या आंतरराष्ट्रीय सामन्यात वेस्ट इंडीजला फलंदाजीसाठी आमंत्रित केले आहे. वेस्ट इंडीजचा कर्णधार शाय होपने आपला शानदार फॉर्म कायम ठेवला आणि संघाला ६ बाद १६५ अशी मजल मारून दिली. त्यानंतर वेस्ट इंडीजने इटलीला १८ षटकांत १२३ धावांत गुंडाळले व १६५ धावांचा बचाव केला.

वेस्ट इंडीजचा सलामीवीर ब्रँडन किंग (४) दुसऱ्या षटकाच्या सुरूवातीलाच बाद झाला, परंतु त्यानंतर शाय होपने कर्णधारपदाला साजेशी कामगिरी करत शिमरॉन हेटमायर, रोस्टन चेस, रोवमन पॉवेल व शेर्फन रदरफोर्डच्या मदतीने संघाला ११५ धावांचा टप्पा गाठून दिला. शाय होपने ४६ चेंडूंत ६ चौकार व ४ षट्कारांच्या मदतीने ७५ धावांची आकर्षक खेळी केली. रोस्टन चेसने २५ चेंडूंत २४ धावांची भर घातली. आपल्या ३०० व्या आंतरराष्ट्रीय सामन्यात जेसन होल्डरने ७ चेंडूंत ९ धावा केल्या. मॅथ्यू फोर्डने नाबाद १६ धावांची खेळी करत संघाला २० षटकांत ६ बाद १६५ धावांचा टप्पा गाठून दिला. गत आठवड्यात मुंबईत नेपाळवर विजय मिळविल्यानंतर इटलीला आणखी एका विजयाची आशा होती, परंतु वेस्ट इंडीजच्या गोलंदाजांचा सामना करणे त्यांना कठीण झाले आणि इटलीचा संपूर्ण संघ १८ षटकांत १२३ धावांतच बाद झाला.

इटलीची सुरुवात वाईट झाली. त्यांनी डावाच्या सातव्या चेंडूवर आपला प्रमुख फलंदाज जस्टिन मोस्का (५ चेंडूत २) गमावला. त्याचा भाऊ अँथनी मोस्का देखील १२ चेंडूत १९ धावा काढल्यानंतर बाद झाला. इटलीचा संघर्ष आणखी वाढला. (वृत्तसंस्था)

# ऑस्ट्रेलिया, ओमानचे गोड सांगता करण्याचे लक्ष्य


मिचेल मार्श


जतिंदर सिंग

**आजचा सामना**
**ऑस्ट्रेलिया वि. ओमान**
**स्थळ** : पल्लेकेले क्रिकेट स्टेडियम, पल्लेकेले
**वेळ** : सायंकाळी ७.०० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

◆ **पल्लेकेले, १९ फेब्रुवारी**

आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक २०२६ स्पर्धेच्या ४० व्या सामन्यात शुक्रवारी पल्लेकेले आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर ऑस्ट्रेलियाचा सामना ओमानशी होणार आहे. दोन्ही संघ आधीच सुपर एटच्या शर्यतीतून बाहेर पडले असल्यामुळे गट ब चा हा शेवटचा सामना त्यांच्या २०२६ च्या मोहिमेचा शेवट ठरेल. दोन्ही संघांनी मोहिमेची गोड सांगता करण्याचे लक्ष्य ठेवले आहे.

आता ऑस्ट्रेलिया आणि ओमान दरम्यानचा हा अखेरचा सामना औपचारिक असणार आहे. ब गटातून श्रीलंका (६ गुण) आणि झिम्बाब्वेने (५ गुण) सुपर एट फेरीत आपले स्थान निश्चित केले आहे.


ऑस्ट्रेलियाने आयर्लंडवर ६७ धावांनी विजय मिळवून सुरुवात केली होती, परंतु त्यांना विजयाची लय कायम राखण्यात अपयश आले, झिम्बाब्वे आणि श्रीलंकेकडून पराभव पत्करावा लागला. त्यानंतर पावसाने त्यांचे नशीब सील केले, कारण इतरत्र पावसामुळे त्यांचा लवकर पराभव झाला. माजी विजेत्यांसाठी ही निराशाजनक कामगिरी आहे, त्यांना फलंदाजी व गोलंदाजी या दोन्ही बाबतीत संघर्ष करावा लागला. दुसरीकडे, ओमानचीही मोहीम कठीण होती. झिम्बाब्वे, श्रीलंका व आयर्लंडविरुद्धच्या पराभवामुळे ते गुणतालिकेत तळाशी आले. अंतिम सामन्याची तयारी करत असताना, दोन्ही संघ सकारात्मक खेळ करण्याचा प्रयत्न करतील. (वृत्तसंस्था)

# आयसीसीने सराव सामन्यांची गणना करावी : डेव्हिसन

◆ **कोलकाता, १९ फेब्रुवारी**

आयसीसीने जागतिक क्रिकेट स्पर्धांमध्ये सराव सामन्यांना अधिकृत सामने म्हणून मान्यता द्यावी तसेच मानांकनासाठी त्या सामन्यांची गणना करावी, असे आवाहन इटलीचे मुख्य प्रशिक्षक जॉन डेव्हिसन यांनी केले आहे.

अर्थपूर्ण सामन्याच्या वेळेशिवाय सहयोगी देशांना मानांकन सुधारण्यासाठी संघर्ष करावा लागतो. टी-२० विश्वचषक स्पर्धेत प्रवेश करण्यापूर्वी इटलीने कॅनडाला १० धावांनी हरवले व सराव सामन्यांमध्ये युएईला ११२ धावांनी हरवले.



मला त्या सराव सामन्यांना कमी दर्जाच्या संघांसाठी अधिकृत सामने म्हणून पहायचे आहे. जर आपण खेळत नसलो तर आपले मानांकन सुधारणे आपल्यासाठी खरोखर कठीण आहे, असे डेव्हिसन म्हणाले.

पहिल्यांदाच विश्वचषकात स्थान मिळविणाऱ्या इटलीचा विश्वचषकात पहिला विजय नेपाळविरुद्ध झाला. त्यांनी मुंबईत १० गड्यांनी विजय नोंदविला,

इटलीने नेहमीच त्यांच्या संघाच्या गुणवत्तेवर विश्वास ठेवला आहे परंतु खरी परीक्षा जागतिक स्तरावर दबावाखाली कामगिरी करण्याची होती, दबावाखाली खेळणे हे सर्वात मोठे आव्हान आहे असे मला वाटते आणि आम्ही ते करू शकतो हे दाखवून दिले आहे, असे ते म्हणाले. आम्हाला आतापर्यंतच्या आमच्या कामगिरीचा खूप अभिमान आहे, परंतु आम्हाला आमच्या गौरवांवर अवलंबून राहायचे नाही आणि आम्ही आमच्या अंतिम सामन्यात चांगली कामगिरी करण्यासाठी खूप दृढ आहोत, असे ते म्हणाले.

इटलीला अधिक क्रिकेट खेळायला आवडेल व मायदेशी टर्फ सुविधा विकसित करायला आवडेल, परंतु निधी आणि कार्यक्रम प्रशासक आणि आयसीसीच्या पाठिंब्यावर अवलंबून राहतील, असेही त्यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

**ऑनलाईन तभा वाचण्यासाठी**
www.tarunbharat.net
**वर भेट द्या!**

# कर्नाटकची अंतिम फेरीत धडक

### रणजी करंडक क्रिकेट

◆ **लखनौ, १९ फेब्रुवारी**

कर्नाटक आणि उत्तराखंड यांच्या दरम्यानचा रणजी करंडक क्रिकेट सामना अनिर्णीत राहिला. मात्र पहिल्या डावांत मिळविलेल्या भक्कम आघाडीच्या बळावर कर्नाटकने स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली. पहिल्या डावांत २३२ धावांची द्विशतकी खेळी करणारा कर्नाटकचा कर्णधार देवदत्त पडिक्कल सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.

आता विजेतेपदासाठी कर्नाटकला प्रथमच स्पर्धेची अंतिम फेरी गाठणाऱ्या जम्मू-काश्मीर संघाविरुद्ध २४ ते २८ फेब्रुवारीदरम्यान अंतिम सामना खेळावा लागणार आहे. जम्मू-काश्मीरने बुधवारी कल्याणी येथे उपांत्य सामन्यात बंगालवर ६ गडी राखून विजय प्राप्त केला.

कर्नाटकने पहिल्या डावांत ७३६ धावा उभारल्या होत्या. प्रत्युत्तरात उत्तराखंडला २३३ धावाच काढता आल्या. पहिल्या डावात ७०३ धावांची भक्कम आघाडी मिळविणाऱ्या कर्नाटकने पाचव्या दिवशी दुसऱ्या डावांत ७४.३ षटकांत सर्वबाद ३२३ धावा केल्या आणि उत्तराखंडसमोर विजयासाठी ८२७ धावा काढण्याचे लक्ष्य ठेवले. परंतु दिवस अखेरपर्यंत उत्तराखंडला ६२ षटकांत ६ बाद २६० धावांपर्यंतच मजल मारता आली, परिणामी हा सामना अनिर्णीत राहिला. कर्नाटकच्या दुसऱ्या डावांत


द्विशतकी खेळी करणारा देवदत्त पडिक्कल सामनावीर

रवीचंद्रन स्मरनने १४९ चेंडूंत १२ चौकार व ३ षटकारांच्या मदतीने १२७ धावांची शतकी खेळी केली. केएल राहुलने १०३ चेंडूंचा सामना करीत ५ चौकार व ६ षट्कारांच्या नाबाद ८६ धावांची खेळी केली.

विजयासाठी धावांचा पाठलाग करताना उत्तराखंडकडून अवनीश सुधा, सौरभ रावत व अभय नेगीने कसोशीने प्रयत्न केले, परंतु त्यांचे प्रयत्न अपुरे ठरले. अवनीशने ७१ चेंडूंत १० चौकार व ५ षट्कारांसह ६६ धावांची खेळी केली, सौरभने ११४ चेंडूंचा सामना करत ४ चौकार व २ षट्कारांसह नाबाद ५३ धावांची, तर अभय नेगीने ६६ चेंडूंत ५ चौकार व ३ षट्कारांसह नाबाद ५७ धावांची खेळी केली.

कर्नाटककडून श्रेयस गोपालने ३ बळी, प्रसिध कृष्णाने २ बळी, तर विजय कुमार विशाकने एक बळी टिपला. (वृत्तसंस्था)

# झिम्बाब्वेचा श्रीलंकेला धक्का

## सिकंदर रझाची २८ चेंडूंत ४५ धावांची खेळी

◆ **कोलंबो, १९ फेब्रुवारी**

आयसीसी टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आणखी एक उलटफेर झाला असून ब्रायन बेनेट व कर्णधार सिकंदर रझाच्या दमदार खेळीच्या बळावर झिम्बाब्वेने सहा गडी राखून श्रीलंकेला पराभवाचा धक्का दिला आणि गट ब मध्ये श्रीलंकेला मागे खेचून अव्वल स्थान मिळविले. दोन्ही संघांनी आधीच गट ब मधून सुपर ८ मध्ये प्रवेश केला आहे.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या श्रीलंकेने ७ बाद १७८ धावा उभारल्या आणि झिम्बाब्वेसमोर विजयासाठी १७९ धावांचे लक्ष य ठेवले. झिम्बाब्वेने १९.३ षटकांत ४ बाद १८२ धावा काढून आपला सलग चौथा विजय साकार केला. २८ चेंडूंत २ चौकार व ४ षट्कारांसह ४५ धावांची खेळी करणारा झिम्बाब्वेचा कर्णधार सिकंदर रझा सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला. झिम्बाब्वेने यापूर्वीच्या सामन्यात ऑस्ट्रेलियालाही हरविले होते.

१७९ धावांचा पाठलाग करताना झिम्बाब्वेने चांगली सुरुवात केली. झिम्बाब्वेच्या सलामीवीर बेनेटने ४८ चेंडूंत नाबाद ६३ धावांची विजयी खेळी केली. बेनेट व तादी मारुमानीने (३४, २६ चेंडू) ८.३ षटकांत पहिल्या गड्यासाठी ६९ धावा जोडल्या. रायन बर्लने १२ चेंडूत २३ धावा केल्या.

बेनेटने ४१ चेंडूत अर्धशतक पूर्ण केले, परंतु झिम्बाब्वेला त्याचा पाठलाग करताना काही ताकदीची आवश्यकता होती. रझाने वेगवान गोलंदाज दिलशान मदुशंकाला सलग दोन षट्कार मारले आणि त्यानंतर १९ व्या षटकात चौकार मारून संघाच्या विजयाचा मार्ग सुकर केला.


सामनावीर सिकंदर रझा

त्यापूर्वी, श्रीलंकेच्या पहिल्या फळीतील फलंदाजांनी दमदार फलंदाजी केली. पाथुम निसंका (६२), कुसल परेरा (२२) व पवन रथनायकेने (४४) श्रीलंकेची धावसंख्या वाढविली, परंतु नंतर त्यांचे फलंदाज नियमित अंतराने तंबूत परतले. श्रीलंकेने ७ बाद १७८ धावा केल्या. झिम्बाब्वेकडून ब्लेसिंग मुझारबानी, ब्रॅड एव्हान्स व ग्रॅमी इव्हान्सने प्रत्येकी २ बळी टिपले. रेयान बर्लने एक बळी मिळविला. (वृत्तसंस्था)

### सुपर एटमध्येही विजयी कामगिरी करू : सिकंदर रझा

**कोलंबो** : आयसीसी टा-२० विश्वचषकाच्या साखळी फेरीत आमच्या संघाने चांगली कामगिरी बजावली, त्यामुळे संघाचा आत्मविश्वासही बळावला आहे. आता सुपर एटमध्येही आम्ही विजयी कामगिरी करू, अशी आशा झिम्बाब्वेचा कर्णधार सिकंदर रझा याने व्यक्त केली. आफ्रिकन संघाने येथे गट ब सामन्यांमध्ये ऑस्ट्रेलिया आणि श्रीलंकेला मागे टाकत आश्चर्यचकित करण्याची आपली क्षमता दाखवली. आता, रझाने सुपर एटवर आपले लक्ष केंद्रित केले असून यात त्यांचा सामना गतविजेता भारत, दोन वेळा विजेत्या वेस्ट इंडीज व २०२४ च्या अंतिम फेरीत पोहोचलेल्या दक्षिण आफ्रिकेशी होईल. आमच्याकडे सर्व भूमिका स्पष्ट आहेत व म्हणूनच तुम्हाला आमच्या संघात आत्मविश्वास दिसतो, असे तो म्हणाला. आम्ही आतापर्यंत अपराजित आहोत, पण माझ्या मनात केवळ पुढचा सामना येतो. कर्णधार म्हणून चांगली स्थिती आहे पण मी किमान आज रात्रीचा आनंद घेण्याचा प्रयत्न करेन, असे तो म्हणाला.

### मधमाश्यांच्या हल्ल्यात पंचाचा मृत्यू

**उन्नाव** : उन्नावमधील शुक्लागंज येथील राहुल सप्रू मैदानावर बुधवारी कनिष्ठ साखळी क्रिकेट सामन्यादरम्यान मधमाश्यांच्या झुंडीने खेळाडू आणि पंचांवर हल्ला केला. या हल्ल्यात एका ६५ वर्षीय क्रिकेट पंचाचा मृत्यू झाला. या सामन्याचे आयोजन करणाऱ्या कानपूर क्रिकेट संघटनेच्या एका वरिष्ठ पदाधिकाऱ्याने सहा जण जखमी झाल्याची पुष्टी केली. कानपूर क्रिकेट संघटनेच्या पंच पॅनेलचे दीर्घकाळ सदस्य असलेले माणिक गुप्ता नुकतेच एका १३ वर्षांखालील मुलांच्या सामन्याचे पंच होते आणि शेजारील मैदानाजवळ वाट पाहत होते तेव्हा मधमाश्या खाली उतरल्या आणि खेळाडू आणि अधिकाऱ्यांना चावत होत्या. खेळाडू आणि अधिकाऱ्यांनी आश्रय घेण्यासाठी धाव घेतली, पण गोंधळात गुप्ता कोसळले आणि मधमाशांनी त्यांना वारंवार चावा घेतला. त्यांना शुक्लागंज येथील रुग्णालयात नेण्यात आले आणि नंतर कानपूरमधील लाला लजपत राय रुग्णालयात पाठविण्यात आले. तिथे डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

# ऑस्ट्रेलियाचा भारतावर १९ धावांनी विजय

### महिला टी-२० मालिकेत १-१ ने बरोबरी

### जॉर्जिया व्होलची ८८ धावांची खेळी

◆ **कॅनबेरा, १९ फेब्रुवारी**

जॉर्जिया व्होलची कारकिर्दीतील सर्वोत्तम ८८ धावांची खेळी व बेथ मूनीसोबत केलेली विक्रमी सलामी भागीदारी, तसेच गोलंदाजांनी डेथ ओव्हर्समध्ये केलेल्या प्रभावी कामगिरीच्या बळावर ऑस्ट्रेलियाने गुरुवारी मनुका ओव्हल येथे दुसऱ्या महिला टी-२० सामन्यात भारतावर १९ धावांनी विजय नोंदविला. याबरोबरच तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेत ऑस्ट्रेलियाने १-१ अशी बरोबरी मिळविली. आता शनिवारी ॲडलेड ओव्हल येथे होणारा तिसरा सामना निर्णायक ठरणार आहे.

या निकालामुळे, संघाची कर्णधार म्हणून सोफी मोलिनेक्सचा हा पहिला टी-२० विजय होता, याचा अर्थ ऑस्ट्रेलियाला बहु-फॉरमॅट मालिकेत पहिले गुण मिळाले.

जॉर्जिया व बेथने पहिल्या गड्यासाठी १२८ धावांची भागीदारी केली. ऑस्ट्रेलियाने टी-२० मध्ये भारताविरुद्धची सर्वोच्च भागीदारी केली व त्यांनी २० षटकांत ५ बाद १६३ धावांची मजल मारली. प्रत्युत्तर देताना भारतीय महिला संघाला २० षटकांत ९ बाद १४४ धावांचा पल्ला गाठता आला.

ऑस्ट्रेलियाच्या जॉर्जियाने ५७ चेंडूंत ८८ धावा केल्या, यात तिने ११ चौकार व एक षट्कार खेचला. बेथने ४६ धावांचे योगदान दिले व तिला अर्धशतकासाठी चार धावा कमी पडल्या.


जॉर्जिया व्होल सामनावीर

प्रत्युत्तरादाखल, भारताच्या सलामीवीरांनी सुरुवातीचे भांडवल केले, पॉवर-प्लेमध्ये विनाविनाबाद ५४ धावा केल्या, परंतु ऑस्ट्रेलियाने जोरदार प्रतिकार केला आणि चार षटकांत भारताची अव्वल फळी कोसळली व त्यामुळे गती निर्णायकपणे बदलली. हरमनप्रीत कौर व यष्टिरक्षक ऋचा घोषने ५५ धावांची भागीदारी करून डाव सावरला व भारताच्या आशा जिवंत राहिल्या. पण १७ व्या षटकांत किम गार्थने हुशारीने चेंडू टाकून हरमनप्रीतला ३६ धावांवर बाद केले. तिथून, नाट्यमय पतन झाले, कारण भारताने आपले शेवटचे सहा बळी केवळ सात धावांत गमावले. (वृत्तसंस्था)

# महाराष्ट्र विरुध्द झारखंड उपांत्यपूर्व सामना उद्या सोलापुरात

### २३ वर्षाखालील मुलांची कर्नल सी के नायडू चषक क्रिकेट स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**

येथील इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर शनिवारपासून (दि. २१) २३ वर्षाखालील मुलांच्या कर्नल सी के नायडू चषक स्पर्धेतील महत्त्वाचा उपांत्यपूर्व फेरीचा महाराष्ट्र विरुद्ध झारखंड असा क्रिकेट सामना होईल.

१६ फेब्रुवारी रोजी संपलेल्या साखळी फेरींच्या सामन्यात महाराष्ट्राने ७ पैकी ५ सामने जिंकत सबंध भारतात सर्वाधिक ७९ गुण मिळवत क गटात सर्वोच्च स्थान पटकाविले असून अ गटात दुसऱ्या स्थानी आलेल्या झारखंड संघासोबत महत्वाचा उपांत्यपूर्व सामना येथे होणार असून सोलापूरचे मैदान लकी असल्याचे बोलले जात असल्याने हा एक बहुमान असल्याचे जिल्हा क्रिकेट असोसिएशन जिल्हा क्रिकेट संघटनेचे संयुक्त सचिव चंद्रकांत रेम्बर्सु यांनी सांगितले आहे, ते येथील उत्तम खेळपट्टी, उत्तम आयोजन नियोजन असल्यामुळे.

सचिन धसच्या नेतृत्वात महाराष्ट्राने गेल्या महिन्यात सलग दोन सामने याच मैदानावर एक डावाने जिंकले होते आणि त्यानंतर आंध्र व दिल्ली येथे देखील विजय प्राप्त केला असून संघात रणजी खेळाडू सोलापूरचा अर्शीन कुलकर्णी समवेत विकी ओस्तवाल, नीरज जोशी हे सामील झाल्याने संघाची ताकद वाढली आहे. या सामन्यासाठी तयारी जिल्हा क्रिकेट संघटनेच्या वतीने युद्ध पातळीवर सुरू आली असून विविध समिती कार्यरत झाल्या आहेत. सामानाधिकारी अजय कुडूआ, पंच प्रणव जोशी, रमीझ खान, गुनलेखक मंगेश नाईक, केतकी जामगावकर, व्हिडिओ विश्लेषक सागर देशमुख, सहाय्यक सदानंद प्रधान आणि अँटी करप्शन ऑफिसर म्हणून अरमान शेख, स्थानिक व्यवस्थापक म्हणून अमोघ जगताप (महाराष्ट्र), ज्योतिबा वाघ (झारखंड), नवीन माने (पंच) हे सर्व काम पाहणार आहेत. सदरचा सामना ४ दिवसाचा असून उपांत्य फेरी गाठण्यासाठी अत्यंत महत्वाचा असल्याने तसेच दोन्ही संघाकडून उत्तम खेळ होणार असल्याने सोलापुरातील क्रिकेट चाहते, खेळाडू, समीक्षक संघटक यांना एक पर्वणी असणार आहे.

**दोन्ही संघ याप्रमाणे**

**महाराष्ट्र** : सचिन धस, अनिरुद्ध साबळे, अर्शीन कुलकर्णी, दिग्विजय पाटील, हर्ष मोगावीरा, वैभव दारकुंडे, अजय बोरुडे, अभिषेक निषद, विकी ओस्तवाल, नीरज जोशी, किरण चोरमले, साहिल औताडे, अभिषेक पवार, प्रथमेश गावडे, स्वराज चव्हाण.

**झारखंड** : रॉबिन मिन्ज (कप्तान), हर्ष राज, बिशेष दत्ता, अभिषेक, शरणदीप सिंग, नकुल यादव, कौनैन कुरेशी, आर्यन हुडा, तनिष, मनिषी, शिखर मोहन, सत्या सेतू, अनमोल राज, मोहम्मद अफसार, प्रभातकुकर माहतो.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### श्री चंद्रादेवी महोत्सव यात्रेत आजपासून विविध कार्यक्रमांचे आयोजन

**सोलापूर, दि. १९ फेबुवारी-**



सालाबादप्रमाणे श्री चंद्रादेवी यात्रा महोत्सव किनरळ्ळी, ता. अक्कलकोट ग्रामदैवत श्री चंद्रादेवी यात्रा दि २० फेबुवारी २०२६ रोजी शुक्रवार, सांय. ७ वाजता चंद्रादेवी पालखी व घोडी, भुरिकवठे, येथे मुक्कामी जाणार. दि. २१ फेबुवारी २०२६ वार शनिवार रोजी भुरिकवठे येथून परत किनरळ्ळी आगमन सा. ८ वा. महादेव मंदिरास भेट तद्नंतर शोभेच्या दारूचा आरास रात्रौ १०.०० मनोरंजन म्हणून मराठी नाटक वाघ्या मुरली कार्यक्रम आयोजित केले आहे. दि. २२ फेब्रुवारी २०२६ वार रविवार दु. १२ वा देवीची सभिना रथोत्सव निघाणार आहे. तसेच सा. ४ वाजता भव्य कुस्तीचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच रात्रौ १० वाजता मराठी नाटकाचे आयोजन केले आहे.



### लोकविकास संस्थेत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी

**वेळापूर, दि.१९ फेब्रुवारी-**

वेळापूर येथील लोकविकास मराठी मिडियम स्कूल, लोकविकास इंग्लिश मिडियम स्कूल व लोकविकास ज्युनिअर कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य अमोल पांढरे, मुख्याध्यापक सुनिल पताळे, अजित बनकर व प्रमुख पाहुणे सुनील शिनगारे, अण्णासाहेब कळके यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रम सुरू झाला. यावेळी प्रशालेतील विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीविषयी शिक्षिका जयश्री साठे, पूजा कुदळे तसेच विद्यार्थी वरद शिनगारे, यज्ञेश कळके, रुद्र देवकुळे, नित्यश्री बनकर, श्रुती जंगले, शौर्य कळके, चैतन्य नवले, आर्या ताटे, राजश्री भोसले, लेखणी साठे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रियांका अनंतकवळस यांनी केले तर आभार प्रदर्शन विद्या जंगम यांनी मानले.



### पंढरपूरच्या १२ गावात रक्तदान शिबीर; शिवजन्मोत्सव मंडळांकडून प्रतिसाद

**पंढरपूर, दि.१९ फेब्रुवारी-**

छत्रपती शिवाजी महाराज जयंती सोहळ्यानिमित्त पंढरपूर तालुका पोलीस ठाणे हद्दीतील विविध १२ गावांत रक्तदान शिबिर घेण्यात आले. शिव जन्मोत्सव मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी सहाय्यक पोलीस अधीक्ष प्रशांत डगळे यांनी आयोजित केलेल्या या उपक्रमास प्रतिसाद देऊन उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. पोलीस अधिकारी, पोलीस अंमलदार यांनी देखील सहभाग नोंदवला. शिव जन्मोत्सव मंडळाचे पदाधिकारी यांनी डीजे वाद्य न लावता मौजे अनवली, रांजणी, बाबुळगाव, अजूनसोंड, खर्डी, सरकोली, खरसुळी, लक्ष्मी टाकळी, नारायण चिंचोली या गावामध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी.वाय. मुजावर, पोलीस उपनिरीक्षक भारत भोसले, विक्रम वडणे, पोलीस हवालदार अभिमन्यू गरड, मंगेश रोकडे, स्वप्निल वाडदेकर, विनायक नलवडे, तात्या गायकवाड, रमेश बनसोडे, सतीश चंदनशिवे यांनी सहभाग नोंदवला.

## निधन वृत्त...

### अरुण दिंडोरे



**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**

पद्म नगर येथील रहिवासी अरुण विश्वनाथ दिंडोरे (७४ वर्षे) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना , नातवंडे असा परिवार आहे.डॉ. निलेश दिंडोरे यांचे ते वडील होत.

### भागीरथी देशमुख



**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**

तुळजापूर तालुक्यातील काटी येथील भागीरथी कल्याणराव देशमुख (वय ८२ ) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पक्षात एक मुलगा, तीन मुली, नातवंडे असा परिवार आहे. अक्कलकोट तालुक्यातील कोर्सेगाव जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक रवींद्र देशमुख यांच्या त्या मातोश्री होत.

### तुकाराम गायकवाड



**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**

कांचन गंगा नगर सैफुल जुळे सोलापूर येथील रहिवाशी तुकाराम गायकवाड (वय-८४) यांचे हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### जयप्रकाश मडूर



**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**

येथील जयप्रकाश सिद्राम मडूर (वय-८६) यांचे गुरूवार दि.१९ फेब्रुवारी रोजी दुपारी ४.१५ वाजता निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा साखर पेठ येथील राहत्या घरा पासून शुक्रवारी सकाळी ९ वाजता निघणार आहे. पद्मशाली शांतीधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात चार मुले, सुना, मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ईन्शुरन्स सर्व्हेअर श्रीकांत मडूर व आनंद मडूर यांचे ते वडील होत.

# शिवजयंतीनिमित्त बार्शीत रणरागिणींची बाईक रॅली

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि.१९ फेब्रुवारी-**





'जय भवानी, जय शिवाजी'च्या जयघोषाने आसमंत दुमदुमून गेला, भगव्या ध्वजांच्या दिमाखदार फडकण्याने आणि रणरागिणींच्या अंगात संचारलेल्या शिवतेजाने आज संपूर्ण बार्शी शहर जणू शिवमय झाले होते. निमित्त होते अखंड महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे! या ऐतिहासिक दिनाचे औचित्य साधून 'एकता महिला मंच' च्या वतीने बार्शीमध्ये आयोजित करण्यात आलेल्या भव्य महिला बाईक रॅलीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या रॅलीतून केवळ शिवरायांना अभिवादनच करण्यात आले नाही, तर महिला सक्षमीकरण आणि स्त्री-शक्तीचा एक आगळावेगळा आविष्कार पाहायला मिळाला.

**रॅलीचा प्रारंभ आणि शाही थाट**

आज १९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ठीक ११ वाजता लातूर रोडवरील 'अटलांस फॅमिली मॉल' (शोरूम) येथून या रॅलीची अत्यंत उत्साहात आणि वाजत-गाजत सुरुवात झाली. रॅलीचे दृश्य अत्यंत विलोभनीय होते. नाकात पारंपारिक नथ, डोक्यावर स्वाभिमानाचा भगवा फेटा आणि केसरी रंगाची साडी परिधान करून, आपल्या दुचाकीला भगवे झेंडे लावून जेव्हा या शेकडो महिला रस्त्यावर उतरल्या, तेव्हा बार्शीकरांनी या 'नारीशक्ती'चे दर्शन घेऊन त्यांना दाद दिली.

**नारीशक्तीचा हुंकार आणि आत्मविश्वास**

या बाईक रॅलीच्या माध्यमातून आधुनिक युगातील स्त्री कोणत्याही क्षेत्रात मागे नाही, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले. घरातील चूल आणि मूल सांभाळणारी स्त्री जेव्हा बुलेट आणि इतर दुचाकींवर स्वार होऊन शिवरायांचा जयघोष करते, तेव्हा समाजात एक सकारात्मक संदेश जातो. महिलांनी स्वतःहून पुढे येत या रॅलीत नोंदवलेला उत्स्फूर्त सहभाग त्यांच्यातील नेतृत्वगुणांची आणि वाढलेल्या आत्म विश्वासाची साक्ष देत होता. नारीशक्ती हीच सर्वशक्ती हे ब्रीद सार्थ ठरवत या रणरागिणींनी शिवरायांच्या चरणी अनोखी मानवंदना अर्पण केली.

> महिलांचा आत्मविश्वास वाढावा आणि त्यांनी समाजात प्रत्येक स्तरावर नेतृत्व करण्यासाठी धैर्याने पुढे यावे, हाच या रॅलीचा मुख्य उद्देश होता. बार्शी आणि सोलापूर जिल्ह्यात हा उपक्रम कौतुकाचा विषय ठरला असून, येणाऱ्या काळातही 'एकता महिला मंच'च्या वतीने असेच प्रेरणादायी कार्यक्रम राबवले जातील.
> **- प्रभाकर क्षीरसागर (प्रमुख, एकता महिला मंच)**

**प्रमुख उपस्थिती आणि मार्गक्रमण**

रॅलीचा मार्ग बार्शी शहरातील प्रमुख चौक आणि गजबजलेल्या भागांतून निश्चित करण्यात आला होता. मार्गावर ठिकठिकाणी नागरिकांनी फुलांची उधळण करून रॅलीचे जंगी स्वागत केले. या सोहळ्याला शोभा वाढवण्यासाठी विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. वैद्यकीय अधिकारी डॉ. विश्वरूपी यादव, पोलीस कॉन्स्टेबल दत्तात्रय शिंदे, साळवे आणि पवार, एकता महिला मंचचे प्रमुख प्रभाकर क्षीरसागर, अटलांस फॅमिली मॉल मॅनेजर सतीश शेरखाने. ही भव्य रॅली यशस्वी करण्यासाठी एकता महिला मंचच्या पदाधिकारी व सदस्यांनी गेल्या अनेक दिवसांपासून अहोरात्र परिश्रम घेतले होते. या नियोजनात खालील रणरागिणींचा सिंहाचा वाटा होता: तालुकाप्रमुख कविता दसवंत, रेश्मा मुकटे (कोषाध्यक्ष), जास्मिन शेख (सचिव), गीतांजली जोशी (प्रसिद्धी प्रमुख), लक्ष्मी सुतार (संघटन सचिव) यांच्यासह

वसुधा कुंभार, रीना गुरव, नुरजहा शेख, सानिया सय्यद, प्रभावती साबळे, कल्पना वाघमोडे, शामबाला सुतार, सुनीता नवले, रुक्मिणी पायगण, सारिका जाधव, अशा विभूते, रानी गवळी, शितल संकपाळ, जयश्री संकपाळ, करिश्मा शेख, सुचिता कुटे, सुनिता जांभळे, संस्कृती माळी, जयश्री संकपाळ, वर्षा पाटील, राधा लोखंडे, अश्विनी कुडपे, वैशाली यमगर, मनीषा गवळी, सविता काजळे, सविता दसवंत, सुकनंदा सुरवसे, शितल काजळे, मंगल काजळे, अनिता दसवंत, मथुरा दसवंत, पद्मा महाडिक, पंचशिला बनसोडे, सोना बादगुडे, सोनाली गवळी, सविता काजळे. यांच्यासह तालुक्यातील इतर अनेक महिला सदस्य मोठ्या संख्येने या उपक्रमात सहभागी झाल्या होत्या.

**पोलीस प्रशासनाचे सहकार्य आणि समारोप**

रॅलीचा समारोप 'शिवसृष्टी' येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याजवळ करण्यात आला. यावेळी उपस्थित महिलांनी छत्रपती शिवाजी महाराज की जय अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून सोडला. पोलीस प्रशासनाच्या सहकार्याने संपूर्ण रॅली शिस्तबद्ध व शांततेत पार पडली.

# मोडनिंबमध्ये शाहिरी डफ कडाडला

## शिवशाहीर चंद्रकांत माने यांचा पोवाडा सादर; स्फूर्तीगीतांनी रंगला सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.१९ फेब्रुवारी-**



मोडनिंब (ता. माढा) येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची व शौर्याची गाथा सांगताना शिवशाहीर चंद्रकांत माने यांचा शाहिरी डफ दणाणला.

येथे शिवजन्मोत्सवा निमित्त पोवाडा व विविध स्फूर्तीगीतांच्या माध्यमातून त्यांनी आपली ओजस्वी कला सादर केली. समाजसुधारणा घडावी तसेच सांस्कृतिक व सामाजिक ठेवा जपला जाण्यासाठी यंथील आमदार अभिजीत पाटील मित्र परिवाराच्यावतीने पोवाडा कार्यक्रमाचे आयोजन केले होते. शाहीर माने यांनी गणेश वंदना करून शाहिरी गणाने सुरुवात केली. शिवाजी महाराज जन्मोत्सव पोवाडा, उगवला तारा तिमिर हरा, गर्जा शिवाजी राजा, गर्जा महाराष्ट्र माझा, अफजलखान वध, छत्रपती संभाजी महाराजांचे बलिदान मास, जनाबाईची ओवी, अंधार फार झाला एक दिवा पाहिजे, यांसह अनेक स्फूर्तीगीते, भेदीक व लोकगीते सादर केली. पोवाड्यातून शिवरायांच्या कार्याची माहिती देत आपल्या तडाखेबंद आवाजाने उपस्थित शिवप्रेमीना खिळवून ठेवले. कार्यक्रमाला परिसरातील महिला पुरुषांनी गर्दी केली होती. यावेळी आमदार अभिजीत पाटील, माजी सभापती भारत शिंदे, पंचायत समिती सदस्या प्रजक्ता पाटील, बाबुराव सुर्वे, ग्रामपंचायत सदस्य बालाजी पाटील, कुरण गिड्डे, शिवाजी सुर्वे यांच्यासह महिला व शिवशंभू भक्त उपस्थित होते. पोवाड्यातून तरुणांच्या मनात स्वातंत्र्याची जाज्वल्य भावना जागृत ठेवण्याचे काम केले.

> **सहकारी पथकाची प्रभावी साथ**
> शिवशाहीर चंद्रकांत माने यांच्या पथकातील सहकाऱ्यांनी कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. युवा शाहीरा ऋतुजा माने यांनी प्रभावी साथ दिली. ढोलकी वादक उदय पाटील, राहुल लांडगे, संकेत श्रीखंडे व संकेत चिपळूणकर यांनी साथ दिली. हार्मोनियम वादक स्वप्नील घाटवडे पाटील, कीबोर्ड वादक सचिन कांबळे तसेच संबळ वादक सचिन माने, जय पांचाळ, संतोष शिंदे, सागर खवळे आणि शाहीर जीवन हे सर्व शाहीर माने यांचे सहकारी असून त्यांनी सादरीकरणात मोलाची साथ दिली.



# हरित सांगोला बनवण्यासाठी वाढदिवसाला वृक्ष भेट द्या

**नगराध्यक्ष आनंद माने यांचे आवाहन**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१९ फेब्रुवारी -**

शहराचा विकास करताना हरित सांगोला घडवण्याचा माझा संकल्प आहे. नागरिकांनी वाढदिवसाला हार-तुरे किंवा महागड्या भेटवस्तू देण्याऐवजी वृक्ष भेट द्यावेत. हे रोपटे संबंधित व्यक्तीच्या नावाने लावून त्याचे संवर्धन केल्यास शहराचे पर्यावरण नक्कीच सुधारेल, असे प्रतिपादन सांगोला नगर परिषदेचे नगराध्यक्ष आनंद माने यांनी केले. ते जुना मेडशिंगी रोड येथील समर्थ नगर मित्र मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सत्कार सोहळ्यात बोलत होते. परिसरातील रस्ते, पाणी आणि महिलांसाठी स्वतंत्र महिला सभागृह या प्रश्नांवर प्राधान्याने तोडगा काढण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विलास पाटील, सूत्रसंचालन प्रा. राजेंद्र ठोंबरे यांनी केले.

या सोहळ्याला मेजर मनोहर राऊत, दत्तात्रय घाडगे, सुभाष दिघे, हरिबा घोडके, दत्तात्रय बनसोडे, पोपटराव घोंगडे, देवदत्त केदार, बंडोपंत लेंडवे, ड.विद्याधर भोसेकर यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्रीपूरमध्ये दुग्धाभिषेकाने शिवजयंती

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. १९ फेब्रुवारी-**



श्रीपूर (ता. माळशिरस) येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंतीनिमित्त राजे ग्रुपच्या वतीने पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी यांचे हस्ते प्रतिमेस दुग्धाभिषेक करण्यात आला.

पहाटेपासूनच शहर भगव्या पताकांनी सजले होते. जय भवानी, जय शिवरायच्या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. यावेळी उपनगराध्यक्ष भिमराव रेडे-पाटील, नगरपंचायत सदस्य राहूल रेडे-पाटील, रावसाहेब सावंत-पाटील, प्रा. प्रकाश नवगिरे, डॉ. हरिश्चंद्र सावंत-पाटील, लाटे, मौला मुलाणी, आरपीआयचे शामराव भोसले, भारत आठवले, राजरत्न ग्रुपचे अध्यक्ष राजरत्न नाईकनवरे उपस्थित होते. विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा, शिवचरित्र कथन, रक्तदान शिबिर तसेच मिरवणुकीचे आयोजन केले होते. बोरगाव, महाळुंग, जांभूड, उंबरे, नेवरे, मिरे, कोंढारपट्टा, खळवे येथेही शिवजयंती उत्साहात साजरी झाली. काही ठिकाणी महाप्रसाद व आरोग्य शिबिरांचे आयोजनही करण्यात आले होते.

श्रीपूर येथे सोमवार, २३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वाजता 'रायबा हेच का आपल स्वराज्य' महानाट्य सादर होणार आहे. मंगळवार, २४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ वाजता शाहीर पृथ्वीराज माळी व सहकाऱ्यांचा शाहिरी शिवगर्जना-शिवगीते मराठमोळा हा कार्यक्रम होणार आहे.

# कालव्याच्या पुलाचा कट्टा तुटल्याने धोका; प्रवाशांसाठी मृत्यूचा सापळा

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. १८ फेब्रुवारी-**

माळशिरस मोटेवाडी रस्त्यावर शहराच्या जवळच असलेल्या निरा उजवा कालव्यावरील ब्रिटिशकालीन पुलाचा संरक्षक भिंत तुटल्याने यावर प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी मृत्यूचा सापळा बनला आहे.

माळशिरस पिलीव हा मुख्य रस्त्यावरील पूल असून अनेक लहान मोठ्या खेड्यांना जोडणारा पूल आहे प्रामुख्याने मोटेवाडी तरंगफळ पिलीव आदी भागातील शेकडो विद्यार्थी दररोज या रस्त्याने ये जा करत असून ओंकार साखर कारखाना व राजेवाडी कारखान्याची ऊस वाहतुकीसह तीन मोठ्या शाळा या रस्त्यालगत असल्याने व इतर वाहतूकही या रस्त्यावरून मोठ्या प्रमाणात सुरू असते



> हा पूल गेल्या अनेक दिवसांपासून धोकेदायक होत चालला आहे त्यामुळे याबाबत पाटबंधारे विभाग व संबंधित बांधकाम विभागाने लक्ष घालून त्वरित पूल दुरुस्त करण्यात यावा अन्यथा याबाबत आंदोलन छेडले जाणार आहे.
> **- महादेव माने ग्रामपंचायत सदस्य मोटेवाडी**

.या रस्त्यावर ब्रिटिशकालीन कॅनाल वर पूल असून यासाठी असलेली संरक्षक भिंत गेल्या अनेक वर्षांपासून ढासळलेल्या स्थितीत आहे त्यामुळे प्रवास करताना अपघात होऊन मोठा धोका होण्याची शक्यता नाकारता येत नाही. संबंधित फुल अरुंद असून अरुंद असल्याबाबत कोणताही फलक अथवा गतिरोधक रस्त्याच्या दोन्ही बाजूला नसल्याने ये जा करणाऱ्या वाहनांना पूल अरुंद असल्याचे लक्षात येत नाही त्यातच फुलाचा कठडा तुटल्याने या ठिकाणी मोठा अनर्थ होण्याची शक्यता आहे.

# एकल पालक असलेल्या मुलींच्या नावे फिक्स डिपॉझिट

## ओन्ली समाजसेवा बहुउद्देशीय संस्थेच्यावतीने शिवजयंतीनिमित्त उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१९ फेब्रुवारी-**



येथील ओन्ली समाजसेवा बहुउद्देशीय संस्था यांच्यावतीने सामूहिक शिवविचारातून बार्शी डाकघर येथे एकत्व पालक हुशार व गरजू पाच शिवकन्यास प्रत्येकी ५०००/- रुपये एफडी करुन पोस्टाचे पासबुक त्यांच्या सहपाल्यास देऊन शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

१९ फेब्रुवारी रोजी सकाळी बार्शी येथील पोस्ट ऑफिसमध्ये शिवजयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बार्शी पोलीस उपनिरीक्षक धनाप्पा शेटे, सामाजिक कार्यकर्ते ॲड. नितीन सोडळ बार्शी पोस्ट मास्तर उल्हास सुतार, डाकघर जनसंपर्क निरीक्षक राहुल जाधव, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राहुल वाणी हे लाभले. दीप प्रज्वलन करुन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करुन छत्रपती शिवाजी महाराज की जय या जयघोशात अभिवादन करण्यात आले. या जयंतीनिमित्त संस्थेचे सहसचिव नागनाथ सोनवणे यांनी तुमच्या माझ्या जीवनामध्ये ज्या ज्या महापुरुषांनी विचारांची पेरणी केली अशा सर्व महापुरुषांना अभिवादन करुन संस्थेचे उद्दिष्ट व पुढील काळात होणाऱ्या उपक्रमाबद्दल माहिती दिली. याप्रसंगी राहुल जाधव यांनी छत्रपती शिवाजी व संस्थेबद्दल माहिती दिली.

राहुल वाणी यांनी ही संस्थेबद्दल माहिती देऊन या उपक्रमामध्ये ज्या ज्या लोकांनी अर्थसहाय्य केले अशा सर्वांचे आभार व्यक्त केले. बार्शी पोलीस उपनिरीक्षक धनाप्पा शेटे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनातील प्रसंग व सध्या बार्शी शहरात ओन्ली समाजसेवा वेगवेगळे उपक्रम राबवून समाजसेवा करतात. या शिवजयंतीनिमित्त पुढील काळात त्यांच्या संस्थेकडून सम ाजोपयोगी कार्य घडो असे उद्गार काढले. रयतेचे राजे,जाणता राजा बारा बोलोतेदार व अठरा पगड जातींना घेऊन स्वराज्य निम र्ण करणारे सर्व जाती-धर्माचे आदर करणारे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करुन मान्यवरांच्या हस्ते प्रत्येकी ५,०००/- रुपये एफडी केलेली डाक पासबुक खाते पाच शिवकन्यांना देण्यात आले १) कु. स्वरा शंकर शिंदे यशवंतराव चव्हाण नगरपरिषद शाळा क्रमांक १५ २) कु. कादंबरी सचिन माने, कन्या प्रशाला बार्शी ३) कु. सरस्वती दिलीप वाघमारे न्यू हायस्कूल कुसळंब तालुका बार्शी ४) कु निशा कैलास जानराव प्रॅक्टिसिंग स्कूल बार्शी ५) सोनाली दिलीप निंबाळकर छत्रपती शिवाजी महाराज नगरपरिषद शाळा क्रमांक एक.

याप्रसंगी अध्यक्ष राहुल वाणी, सचिव अजय तिवारी, उपाध्यक्ष संतोष शेळगावकर, सहसचिव नागनाथ सोनवणे, खजिनदार मानकोजी ताकभाते, सुनील फल्ले सुरेंद्र स्वामी, भरत जाधव, रतिकांत हमने, प्रतीक खंडागळे, दत्तात्रेय कांदे, अतुल वाणी, नगरसेविका सायरा मुल्ला, रेखा विधाते, रागिने झेंडे, सुजाता अंधारे, कोमल वाणी, अनुसया आगलावे, माधुरी वाणी, रेखा सरवदे, आशादेवी स्वामी, त्रिशाला मिसाळ, अरुणा शेळगावकर हे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सचिव अजय तिवारी यांनी शिवजयंतीनिमित्त पोस्ट खात्यातील सर्व स्टाफ, महिला वर्ग, शिवप्रेमी, संस्थेतील सर्व पदाधिकारी हजर राहिल्याबद्दल सर्वांचे आभार मानले.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# ‘डीजे’ला बगल... पारंपारिक वाद्यांसह लेझीम, झांज पथक







## ना.जयकुमार गोरे, ना.चंद्रकांत पाटील यांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी -**

अवघ्या महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त सोलापूर शहरातील विविध मंडळांकडून काढण्यात आलेल्या मिरवणुकांमध्ये ‘डीजे’ला बगल देत पारंपारिक वाद्यांसह लेझीम, झांज पथकाच्या तालावर तरुणाई थिरकली.

शिवजयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराज चौकातील शिवरायांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यासाठी शिवप्रेमींनी सकाळपासूनच गर्दी केली होती. सोलापुरातील या मिरवणूक सोहळ्याला राज्याचे ग्रामीण विकासमंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

श्रीशिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या नेतृत्वाखाली सुरु असलेल्या शिवजयंती सोहळ्याची सांगता करण्यात आली. छत्रपती शिवाजी चौक परिसरात करण्यात आलेली विद्युत रोषणाई, फुलांची रोषणाई व सर्वत्र फडकलेले भगवे ध्वज यामुळे वातावरण उजळून निघाल्याचे चित्र दिसत होते.

डाळिंबी आड मैदान येथे श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या सिंहासनाधिष्ठित छत्रपती शिवाजी महाराजांच्या मुर्तीची पूजा पोलिस आयुक्त एम.राजकुमार, पोलिस उपायुक्त विजय कबाडे, हसन गौर, श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाचे ट्रस्टी अध्यक्ष पद्माकर काळे, उत्सव अध्यक्ष जयवंत सलगर, श्रीकांत डोंगे यांच्या हस्ते करुन मिरवणुकीस प्रारंभ करण्यात आले.

शिवशासन प्रतिष्ठान, शिवमय समाज, सक्षम असलेले आरमार दल, तत्कालीन प्रेरणा, बारा बलुतेदारांच्या जगात स्वराज, सिंहाशी झालेली यशस्वी झुंज आदी देखावे सादर करण्यात आले होते. निष्ठावंत लोककल्याण तालीम, दहशत ग्रुप, जय हिंद तालीम, श्री ज्ञानेश्वर माऊली युवा प्रतिष्ठान या मंडळांनी सादर केलेले देखावे लक्षवेधी होते. ही मिरवणूक पाहण्यासाठी शिवप्रेमींनी दुतर्फा मोठी गर्दी केली होती.शिवजयंतीचे औचित्य साधून आरोग्य तपासणी, रक्तदान शिवीर, अन्नदान यांसारखे विविध उपक्रमही राबविण्यात आले.

✻ शिवभक्तांच्या भोजनाची परंपरा चालूच ठेवणार - छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त शहरातील विविध मंडळातर्फे मिरवणुका काढण्यात येतात. या मिरवणुकीत सहभागी होण्यासाठी सोलापूर शहरासह आपपासच्या गावातील हजारो शिवभक्त येतात आणि यावेळी बंदोबस्तास शेकडो पोलिस कर्मचारी असतात. शहरातील हॉटेल्स बंद असल्याने त्यांच्या जेवणाची सोय व्हावी, यासाठी थोरला मंगळवेढा तालीमच्या वतीने गेल्या ७ वर्षांपासून भोजनाची व्यवस्था केली जात आहे. सुमारे २५ हजार शिवभक्त याचा आस्वाद घेतात. ही परंपरा यापुढेही चालूच ठेवण्यात येईल, असे तालीमचे अध्यक्ष तथा नगरसेवक अमोल शिंदे यांनी सांगितले.

## शिवजयंती क्षणचित्रे...



पत्रा तालीम






श्री शिवज्ञा आम्ही सोलापूरकर ताशा पथक




सर्व छायाचित्रे : केवल तिवारी

## ‘लोकमंगल’च्यावतीने पालखी सोहळ्याचे स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ फेब्रुवारी-**



छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त संभाजी आरमारच्या वतीने काढण्यात आलेल्या पालखी सोहळ्याचे लोकमंगल बँकेच्या वतीने स्वागत करण्यात आले. ‘लोकमंगल’चे संस्थापक तथा आमदार सुभाष देशमुख यांच्या हस्ते शिवमुर्तीची महापूजा करण्यात आली.

आमदार सुभाष देशमुख याप्रसंगी बोलताना म्हणाले, प्रत्येकांनी छत्रपती शिवाजी यांचे किमान एक तरी गुण अंगीकारावे. समाजामध्ये शिवरायांचे विचार रुजवावे. दरम्यान, लोकमंगल बँकेच्या वतीने शिवभक्तांना सुगंधी दूध व पाणी वाटप करण्यात आले.

याप्रसंगी नगरसेवक शिवाजी वाघमोडे, शिवव्याख्याते डॉ.शिवरत्न शेटे, संभाजी आरमारचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे, देवानंद चिलवंत, सिध्दार्थ सर्जे, जितेंद्र लाड-नाईक, राजेशसिंह बायस यांची प्रमुख उपस्थिती होती.

## ‘एकत्व’ने केला गजर



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ फेब्रुवारी-**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीऔचित्य साधून बाळे येथील एकत्व सोशल फाउंडेशनच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. जय जिजाऊ, जय शिवराय...चा गजर करण्यात आला. यावेळी श्रीनाथ श्रीगंण, किरण सरवळे, दीपक करकी, राजेश केकडे, ऋषिकेश हरसुरे आदी उपस्थित होते.

## नूमवि शिशु शाळेत शिवजयंती जल्लोषात साजरी

**सोलापूर, दि.१९ फेब्रुवारी-**



येथील नूमवि अर्थात नूतन मराठी विद्यालय संचलित शिशु शाळेत शिवजयंजी जल्लोषात साजरी करण्यात आली. संभाजी आरमारचे संस्थापक श्रीकांत डांगे व नगरसेवक वाघमोडे यांच्या हस्ते शिवप्रतिमेचे पूजन व दीपप्रज्ज्वलन करण्यात आले. मुख्याध्यापिका अर्चना कुलकर्णी यांनी छत्रपती शिवाजी महाराज जन्म, शिवपराक्रम आदींविषयींची माहिती विशद केली. छोट्या गटातील विद्यार्थ्यांनी शिवकाळातील देखावा सादर केला. नर्सरीतील विद्यार्थ्यांनी झुलवा पाळणा या पाळणा गीतावर नृत्य सादर केले.



निवृत्त पोलीस कर्मचाऱ्यांची मानवंदना

# इलेक्ट्रो २०२६ ची थाटात सांगता; बाबर एजन्सीज, गोदरेज ठरले सर्वोत्कृष्ट स्टॉल पारितोषिकाचे मानकरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी -**



सोलापूर - होम मैदानावर १२ ते १८ फेब्रुवारी पर्यंत सुरू असलेल्या इलेक्ट्रो या भव्य प्रदर्शनाचा सांगता समारंभ महावितरणचे अधीक्षक अभियंता सुनील माने व एअरपोर्ट ऑथॉरिटी चे सहाय्यक सरव्यवस्थापक सौ. अंजनी शर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. याप्रसंगी इलेक्ट्रो २०२६ चे सर्वोत्कृष्ट स्टॉलचे बक्षिस बाबर एजेन्सीजच्या गोदरेज कंपनीच्या स्टॉल ला प्रदान करण्यात आले. त्याप्रसंगी मंचावर सेडाचे अध्यक्ष डॉ. सुरजरतन धुत, माजी अध्यक्ष आनंद येमुल , चेअरमन जितेंद्र राठी , उपाध्यक्ष भूषण भुतडा, सचिव हरीश कुकरेजा , खजिनदार श्री. सुयोग कालाणी, सह सचिव गिरीश मुंदडा उपस्थित होते .

प्रारंभी सोलापूर इलेकट्रोनिक्स डिलर्स असो. चे अध्यक्ष डॉ. सुरजरतन धुत यांनी स्वागतपर प्रास्ताविक करताना सर्व संचालक मंडळ व इलेकट्रो समितीचे सभासदांनी घेतलेल्या परिश्रमाबद्धल आभार व्यक्त करीत ऐतिहासिक आणि विक्रम प्रस्थापित झाल्यामुळे २०२६ यशस्वी झाले असे त्यांनी आवर्जून सांगितले. या यशामागे समस्त माजी अध्यक्ष, संचालक मंडळ व सभासद असल्याचे त्यांनी पुढे नमूद केले.

इलेक्ट्रो चे चेअरमन जितेंद्र राठी आपल्या भाषणात नागरिकांनी या प्रदर्शनास दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसाद तसेच मुख्य प्रायोजक व्ही प्लस तर सह प्रायोजक विझी टीव्ही , लक्ष्मी ऑटोमोबाइल्स, अपार केबल्स , हाईफा इलेक्ट्रिकल्स् , शैक्षणिक भागीदार एमआयटी विश्वप्रयाग युनिव्हर्सिटी , वित्तीय भागीदार बजाज फायनान्स व इव्हेंट प्रोडक्शन प्रायोजक सॅटिसफाईड मीडिया व उत्सव इव्हेंट यांचे विशेष आभार व्यक्त केले. समस्त स्टॉलधारक, सहभागी कॉलेज विद्यार्थी व सहभागी कंपन्यांचेही विशेष आभार मानले. सात दिवसांत सुमारे एक लाख तीस हजार ग्राहकांनी यंदा प्रदर्शनास भेट दिल्याचे त्यांनी आवूर्जन उल्लेख केला.

श्री सुनील माने यांनी हे प्रदर्शन अत्यंत नियोजनबद्ध असल्याचे सांगत सेडाचे सर्व पदाधिकार्यांच्या एकात्मतेचे कौतुक केले. स्मार्ट मीटर चे फायदे सांगत सर्वांनी स्मार्ट मीटर बसवून घ्यावे असे आवाहन केले.

सौ. अंजनी शर्मा यांनी सुद्धा या उपक्रमाबद्दल संपूर्ण सेडा टीमचे अभिनंदन केले .मुंबई दिल्ली सारख्या मोठ्या शहरातील प्रदर्शना बरोबरीचे हे प्रदर्शन होते . असल्याचे त्यांनी विशेष कौतुक केले. तिकीट विक्री केंद्राचे व्यवस्थापन सांभाळणाऱ्या व्ही. गु. शिवदारे कॉलेजच्या विद्यार्थी विद्यार्थिनींचे विशेष कौतुक करण्यात आले.त्यानंतर विविध गटातील पारितोषिक माजी अध्यक्ष आनंद येमुल , खजिनदार सुयोग कालाणी चेअरमन जितेंद्र राठी यांनी जाहीर केले.

या कार्यक्रमास संचालक बसवराज नवले, चंद्रकांत शहापुरे ,सुनिल भांजे, सचिन करवा, विजय टेके, रविंद्र पाचलग,तसेच संस्थेचे माजी अध्यक्ष केतन शाह, सतीश मालू, शिवप्रकाश चव्हाण, समीर गांधी, विपीन कुलकर्णी , कौशिक शाह, खुशाल देढिया, ईश्वर मालू, दीपक मुनोत सह संदेश कोठारी, यल्लप्पा भोसले ,राजेश जाजू, विश्वजीत कुलकर्णी, सतिश मुंदडा, दत्तात्रय अंबुरे, जॉय छाब्रिया, घनश्याम चव्हाण , संतोष बुरबुरे, राजेंद्र बिराजदार ,ईरफान शेख, संजय नाईक , बसवराज कडगंची , अंगद चव्हाण आदी उपस्थित होते.या स्टॉलचे परिक्षण स्टॉलचे परीक्षण इंजिनीयर व आर्किटेक्ट ओमप्रकाश दरक, रघुनंदन भुतडा, सौ. नयना राठी, सीए नंदा भट्टड , योगिन गुर्जर यांनी केले. विजेत्यांनी सेडा कार्यालय, सुराणा मार्केट येथे स.१० ते १२ यावेळेत १५ दिवसांत संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे. सचिव हरीश कुकरेजा यांनी आभार प्रदर्शन केले तर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कुमारी पायल जाजु यांनी केले.

### ✻ लकी ड्रॉ चे भाग्यवंत

सात दिवसाचा एकत्रित्त बंपर लकी ड्रॉ ५९८७४. आयएफबीची ५१,९९० किमतीची किचन चिमणी भेट.

**✻ शेवटच्या दिवशीचे भाग्यवंत** : प्रथम - ७६८६३, द्वितीय - ७५८७५, तृतीय - ७६८६४

### पारितोषिक विजेते असे (प्रथम, द्वितीय)

✻ **इलेक्ट्रॉनिकस व होम अप्लायन्सेस (कंपनी फीटेड विभाग)** : सॅमसंग (कस्तुरे असोसिएट्स), विभागून - हायर (बदामीकर अँन्ड सन्स) व एलजी (विजय इलेक्ट्रॉनिक्स आणि आनंद इलेक्ट्रॉनिक्स) ✻ **इलेक्ट्रॉनिकस व होम अप्लायन्सेस (सेल्फ फिटेड विभाग):** एस.एन. इलेक्ट्रॉनिक्स, महेंद्र इलेक्ट्रॉनिक्स ✻ **इलेक्ट्रॉनिकस व होम अप्लायन्सेस (कंपनी टाईप सेल्फ फिटेड विभाग):** चव्हाण ट्रेडिंग (अकाई) ✻ **होम अप्लायन्सेस (कंपनी फिटेड विभाग)** : सुयोग् डिजिटल (व्हॉल्टास), राठी डिस्ट्रीब्युटर्स (बॉस) ✻ **होम अप्लायन्सेस (सेल्फ फिटेड विभाग):** संदीप ट्रेडर्स (सुजाता), श्री स्वामी समर्थ एजन्सी (उनोवा आटा चक्की) ✻ **होम अप्लायन्सेस (कंपनी टाईप सेल्फ फिटेड विभाग):** मोनिका इलेक्ट्रॅनिक्स (सिम्फनी), सर्वोदय ट्रेडर्स ✻ **इलेक्ट्रॉनिकस विभाग (कंपनी फिटेड विभाग)** : श्री ओम इलेकट्रोनिक्स (टीसीएल). ✻ **इलेक्ट्रॉनिक्स विभाग (सेल्फ फिटेड विभाग)** : अचिंत्य ऑटो मोबाईल्स ✻ **इलेक्ट्रोनिक्स् विभाग (कंपनी टाईप सेल्फ फिटेड विभाग)** : ओपल कॉम्प्युटर्स (कॅरियर) ✻ **आय. टी. व कॉम्पुटर्स विभाग : (कंपनी फिटेड विभाग)** : बोट - श्रीजीत सेल्स ✻ **आय. टी. व कॉम्पुटर्स विभाग : (सेल्फ फिटेड विभाग)** : दर्शन इलेक्ट्रॉनिक्स (असुस) ✻ **सोलर सिस्टम्स (कंपनी विभाग)** : वेदांत इंटरप्रायेस (टाटा) ✻ **सोलर सिस्टम्स (सेल्फ फिटेड)** : चैतन्य आदित्य सोलर शॉपी ✻ **फिटनेस (सेल्फ फिटेड)** : गौरव एजन्सीज ✻ **वॉटर प्युरिफायर : (सेल्फ फिटेड विभाग):** दोशीबा वॉटर प्युरिफायर, ✻**अक्काक्युर वॉटर प्युरिफायर फूड स्टॉल** : साई फूड स्टॉल,विठाई पाव रगडा पॅटीस

## महापालिकेच्यावतीने श्री छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी -**

सोलापूर : सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती दिनानिमित्त श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास तसेच कौन्सिल हॉल येथील महापौर यांच्या कार्यालयात श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, डॉ. शिवरत्न शेटे , सभागृह नेते नरेंद्र काळे, गटनेते अमोल शिंदे,आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, अतिरिक्त आयुक्त वीणा पवार,अतिरिक्त संदीप कारंजे, उपायुक्त आशिष लोकरे,नगरसेबक विनोद भोसले नगरसेवक बिज्जू प्रधाने, नगरसेवक गौतम कसबे, नगरसेविका रंजीता चाकोते, नगरसेवक अजय पोंनम, सत्यनारायण गुर्रम, व्यकटेश कोंडी, रवि कय्यावाले यांच्यासह नगरसेवक, नगरसेविका उपस्थित होते.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 | **RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## छत्रपती शिवाजीनगर येथे बालगोपाळांची शिवजयंती साजरी

**तुळजापूर, दि.१९ फेब्रुवारी -**

शहरातील हेलिपॅड परिसरातील छत्रपती शिवाजी नगर कॉलणीमध्ये शिवजयंतीनिमित्त बाल मंडळांनी मोठ्या उत्साहात शिवजयंती साजरी केली. कॉलनी मध्ये बांबू वेळू आणि कपड्याच्या साह्याने मुलांनी परिश्रमातून मंडप उभा केला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करून मूर्तीला पुष्पहार घालून आरती व पूजा केली.



लहान मुलांनी सायकलीला भगवे झेंडे लावून कॉलनीतून सायकल रॅली काढण्यात आली. जय भवानी जय शिवाजीच्या जय घोषणा देत बालगोपाळांमध्ये शिवजयंतीचा उत्साह दिसून आला.

यावेळी शिवबाल मंडळाचे सार्थक ताकमोघे, कौस्तुभ भारती, सर्वेश ताकमोघे, शिरीष पुरी, जय साळुंके, वीरू साळुंके, पृथ्वीराज कोळी, अथर्व साळुंके, शंभू काळे, अर्जुन लबडे यांच्यासह शिवजयंती बाल मंडळाचे सर्व सदस्य उपस्थित होते.



# धाराशिवात शिवविचारांचा जागर; विविध उपक्रमांनी शिवजयंती साजरी



▶▶ आ. राणाजगजितसिंह पाटील, डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्याकडून शिवाजी महाराजांना अभिवादन...






**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ फेब्रुवारी -**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त धाराशिव जिल्ह्यात आठवडाभर विविध सांस्कृतिक, सामाजिक व बौद्धिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

'शिवविचारांचा जागर' या संकल्पनेतून साजऱ्या करण्यात आलेल्या शिवसप्ताहात महिलांची बाईक रॅली, रिक्षा रॅली, शिवव्याख्यान, तसेच शाहीरीचा शिवजागर अशा कार्यक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

शिवजयंतीनिमित्त शहरात पहाटेपासूनच उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. शहरातील नागरिकांनी पहाटेच्या वेळीच छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात एकत्र येत पारंपरिक वेषभूषेत सहकुटुंब उपस्थिती लावली. फेटे, भगवे दुपट्टे, पारंपरिक नऊवारी साड्या आणि ढोल-ताशांच्या गजरात संपूर्ण परिसर शिवमय झाला होता.

शहरातील चौकातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी मोठ्या श्रद्धेने नतमस्तक होत शिवरायांना मानवंदना दिली.

जय शिवराय, छत्रपती शिवाजी महाराज की जय अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. दिवसभरात हजारो शिवप्रेमी तरुणाईचा जल्लोष पाहायला मिळाला. युवकांनी पारंपरिक पोशाखात आणि भगवे ध्वज हातात घेऊन सहभाग नोंदवला.

काही ठिकाणी लेझीम, तलवारबाजीचे प्रात्यक्षिक आणि पोवाड्यांच्या सादरीकरणातून शिवचरित्र जागवण्यात आले.

सेल्फी पॉइंट्स आणि सजावटीमुळे चौक परिसर आकर्षक बनला होता. शिस्तबद्ध नियोजन आणि पोलीस बंदोबस्तामुळे कार्यक्रम सुरळीत पार पडला. नागरिकांनी स्वच्छता राखत आणि शांततेत उत्सव साजरा करून सामाजिक ऐक्याचा संदेश दिला.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आदर्शांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. उत्साह, शिस्त आणि प्रेरणादायी वातावरणात शिवसप्ताहाची सांगता झाली.

शिवविचारांची प्रेरणा आणि स्वराज्याचा अभिमान यांचा संगम असलेला हा सोहळा धाराशिवकरांसाठी अविस्मरणीय ठरला.

### महिलांची बाईक रॅली ठरली आकर्षणाचा केंद्रबिंदू

शहरातील विविध महिला संघटना, महाविद्यालयीन युवती व स्वयंसेवी संस्थांच्या सहभागातून भव्य बाईक रॅली काढण्यात आली. भगवे झेंडे, फेटे आणि 'जय शिवराय'च्या घोषणांनी वातावरण भारावून गेले. स्त्रीशक्तीचा सन्मान आणि स्वराज्याच्या विचारांची प्रेरणा यांचा संदेश या रॅलीतून देण्यात आला. अनेक महिलांनी पारंपरिक पोशाख परिधान करून सहभाग नोंदवला.

### रिक्षा रॅलीने शहर दुमदुमले

रिक्षाचालक संघटनेच्या वतीने सजवलेल्या रिक्षांची रॅली काढण्यात आली. रिक्षांवर छत्रपती शिवाजी महाराजांचे छायाचित्र, प्रेरणादायी घोषवाक्ये आणि भगवे ध्वज लावण्यात आले होते. शहरातील प्रमुख मार्गांवरून ही रॅली फिरली. फुलांची उधळण करून स्वागत केले.

### शाहीरीच्या शिवजागराने रंगला सांस्कृतिक सोहळा

संध्याकाळी आयोजित शाहीरी कार्यक्रमात पोवाडे, देशभक्तीपर गीते आणि पारंपरिक वेशभूषेतून सादरीकरण करण्यात आले. दमदार आवाजात सादर झालेल्या शिवचरित्राच्या गाथांनी उपस्थितांना भारावून टाकले. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी कार्यक्रमाचा आनंद घेतला.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी घेतले तुळजाभवानीचे दर्शन

**तुळजापूर, दि.१९ फेब्रुवारी -**

राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज श्री तुळजाभवानी देवींचे मनोभावे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी देवींची आरती करून राज्याच्या प्रगतीसाठी तसेच जनतेच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली. याप्रसंगी भाजपचे तालुकाध्यक्ष आनंद कंदले, भाजप किसान मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष संदीप गंगणे, शहराध्यक्ष शांताराम पेंदे, तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) माया माने, सहायक पोलिस निरीक्षक अर्जुन चौधर, जनसंपर्क अधिकारी अभिजीत तेरखेडकर, सुरक्षा निरीक्षक ऋषिकेश पाटील, सहायक सुरक्षा निरीक्षक श्रीकांत पवार, सुपरवायझर योगेश फडके तसेच मंदिर संस्थानचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



### सिंदफळ येथे महाशिवरात्रीनिमित्त भव्य कुस्त्यांचा आखाडा रंगला

**तुळजापूर, दि.१९ फेब्रुवारी -**

तालुक्यातील सिंदफळ येथे मुदगलेश्वर मंदिर परिसरात महाशिवरात्रीनिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही भव्य जंगी कुस्त्यांचा आखाडा रंगला. दुपारी तीन वाजता मैदानास उत्साहात सुरुवात झाली. प्रारंभी बाळ-गोपाळांच्या कुस्त्यांनी रंगत आणली, तर त्यानंतर मोठ्या पैलवानांच्या थरारक लढतींनी मैदान दणाणून गेले. कुस्तीप्रेमींनी आखाडा खचाखच भरला होता. प्रत्येक डावावर टाळ्यांचा कडकडाट आणि जल्लोष होत होता. दुपारी तीनपासून सुरू झालेला हा थरार रात्री साडेआठपर्यंत रंगला. शेवटची २१ हजार रुपयांची मानाची कुस्ती विशेष आकर्षण ठरली. पैलवानांनी ताकद, जिद्द आणि खेळाडूवृत्तीचे उत्कृष्ट दर्शन घडवले. उपस्थित पैलवान व प्रेक्षकांसाठी जेवणाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. परंपरा, खेळ आणि गावकऱ्यांचा एकोप्याचा सुंदर संगम या निमित्ताने पाहायला मिळाला.

### तानाजी क्षिरसागर यांना 'वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्य रत्न' पुरस्कार

**तुळजापूर, दि.१९ फेब्रुवारी -**



जिल्हा आरोग्य विभागाचे सुपरवायझर तानाजी क्षिरसागर यांना सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या वतीने सन २०२४-२५ चा राज्यस्तरीय 'वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्य रत्न' पुरस्कार जाहीर झाला आहे. संपूर्ण महाराष्ट्रातून हा सन्मान मिळवणारे ते एकमेव आरोग्य सुपरवायझर ठरले आहेत. या पुरस्काराचे स्वरूप प्रशस्तीपत्र व एक लाख रुपये असे असून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रदान केला जातो. त्यांच्या या राज्यस्तरीय यशाबद्दल जिल्हा व तालुक्यातील मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



### तुंबलेल्या गटारींची स्वच्छता

**परंडा, दि.१९ फेब्रुवारी -**

शहरातील प्रभाग क्रमांक १ मधील अनेक महिन्यांपासून तुंबलेल्या गटारींची अखेर स्वच्छता करण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा माजी नगरसेवक राहुल बनसोडे यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून स्वच्छता काम करून घेत निवडणुकीत दिलेल्या आश्वासनाप्रमाणे आपला प्रभाग, आपली जबाबदारी ही भूमिका पार पाडली. जनशक्ती नगर विकास आघाडीच्या नगरसेविका तथा सार्वजनिक बांधकाम सभापती रत्नमाला राहुल बनसोडे यांच्याकडे नागरिकांनी विविध समस्या मांडल्या होत्या. मंडई भीमनगर, मदारी वस्ती, हंसराज स्वामी मठ परिसर, राम मंदिर परिसर, अमानुल्ला गल्ली, कुऱ्हाड गल्ली, कोष्टी गल्ली, महात्मा फुले चौक परिसर आदी भागांत गटारी तुंबलेल्या अवस्थेत होत्या. याबाबत संबंधित विभागाला तात्काळ सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार १८ तारखेला मंडई भीमनगर येथून स्वच्छता मोहिमेला सुरुवात करण्यात आली.

### भागिरथीबाई देशमुख यांचे निधन

**तुळजापूर, दि.१९ फेब्रुवारी -**

तालुक्यातील काटी येथील भागिरथीबाई कल्याणराव देशमुख वय ८२ वर्षे यांचे बुधवार दि.१८ रोजी सोलापूर येथील त्यांच्या राहत्या घरी वृद्धापकाळाने निधन झाले. त्या सहशिक्षक रविंद्र देशमुख यांच्या मातोश्री होत्या. त्यांच्या पार्थिवावर काटी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, सुन, नातवंडे असा परिवार आहे.

## परंडा शहरात शिवजयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१९ फेब्रुवारी -**



हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६ वी जयंती परंडा शहरात विविध ठिकाणी उत्साहात साजरी करण्यात आली. मराठा सेवा संघ व संभाजी ब्रिगेड परंडा तालुक्याच्या वतीने १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे शिवजन्मोत्सवाचा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

सकाळी ११ वाजता भाजपाचे नेते माजी आमदार सुजितसिंह ठाकूर व परंडा नगर परिषदेचे नगराध्यक्ष जाकिर भाई सौदागर यांच्या हस्ते शिवरायांच्या प्रतिमेस दीप, धूप व पुष्पहार अर्पण करण्यात आला.

जय जिजाऊ, जय शिवरायच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. यावेळी अनेक मान्यवर व नागरिक उपस्थित होते. परंडा पोलिसांकडूनही शिवरायांना अभिवादन करण्यात आले.

शहरातील शाळा-महाविद्यालयांतही शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. रा.गे. शिंदे महाविद्यालय येथे प्राचार्य डॉ. सुनील जाधव यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्रम झाला.

तसेच बावची विद्यालय, महात्मा गांधी विद्यालय व गार भवानी मित्र मंडळ यांच्या वतीनेही शिवरायांना अभिवादन करण्यात आले.

## आई श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानमध्ये शिवजयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१९ फेब्रुवारी -**

श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने साजरी करण्यात आली.

आज सकाळी मंदिर परिसरातील गणेश विहार येथे तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) माया माने यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले. शिवजयंतीच्या निमित्ताने आज श्री तुळजाभवानी देवींची भवानी तलवार अलंकार महापूजा विशेष श्रद्धेने मांडण्यात आली होती. आज



शिवजयंतीच्या निमित्ताने भाविकांनी पहाटेपासूनच मंदिर परिसरात गर्दी केली होती.

संपूर्ण मंदिर परिसर जय भवानी, जय भवानी च्या जयघोषाने दुमदुमून गेला होता.

## बेलवाडीत शिवजयंती उत्साहात साजरी; शाळेला साहित्य भेट



**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१९ फेब्रुवारी -**

लोहारा तालुक्यातील बेलवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक राजेंद्र माळवदकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून माजी सैनिक किसनराव कदम यांच्यासह शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

गावाचा शाळेला आधार, शाळेचा गावाला अभिमान या भूमिकेतून माजी सैनिक किसनराव कदम यांनी शाळेला १२ नीलकमल खुर्च्या भेट दिल्या व पुढेही सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. उमेद अभियानांतर्गत संस्कृती महिला ग्रामसंघ, बेलवाडी यांच्या वतीने शाळेला ३० लेझीम भेट देण्यात आल्या. दात्यांचा सत्कार करून आभार मानण्यात आले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी गाणी, नृत्य, पोवाडे, शिवगर्जना सादर केली. 'दैवत छत्रपती' लेझीम नृत्याने कार्यक्रमाची सांगता झाली. ग्रामस्थ, पालक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक व सांस्कृतिक विभाग प्रमुखांनी परिश्रम घेतले.

## तेरखेड्यात शिवजयंती उत्साहात; ७१ फुटी केशरी ध्वजाचे आकर्षण

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१९ फेब्रुवारी -**

धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यातील तेरखेडा येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सार्वजनिक शिवजन्मोत्सव मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने साजरा करण्यात आला.

सकाळी गावातील मुख्य चौकात महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर पालखीतून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. ढोल-ताशांच्या गजरात व जयघोषात गावातील प्रमुख चौकांत पूजन करण्यात आले. यावेळी मुख्य चौकात ७१ फुटी केशरी ध्वज उभारण्यात आला. भगव्या ध्वजाच्या फडकण्याने परिसर देशभक्तीच्या रंगात न्हाऊन निघाला.

दुपारनंतर प्राथमिक शाळेच्या मैदानावर भव्य कुस्ती स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. जिल्हाभरातील नामांकित पैलवानांनी दमदार लढती सादर केल्या. रोमांचक सामन्यांना प्रेक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली. कुस्तीप्रेमी व नागरिकांच्या मोठ्या उपस्थितीत तेरखेडा गावात उत्साह, परंपरा आणि शौर्याचा संगम अनुभवायला मिळाला.

### मोटार केबल चोरी

**धाराशिव, दि.१९ फेब्रुवारी -**

तालुक्यातील पाथरुड शिवारातील दुधोडी पाझर तलावात टाकलेल्या पाण्याच्या मोटारीची सुमारे २५० फुट केबल सुमारे ८ हजार रुपये किंमतीची अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे.

याप्रकरणी राजपाल वैजनाथ बोराडे, रा. पाथरूड यांनी भूम पोलिसात तक्रार दिली आहे.

## तुळजापूर पुजारी नगरमध्ये प्रथमच शिवमूर्तीची प्रतिष्ठापना

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१९ फेब्रुवारी -**

शहरातील पुजारी नगर सोसायटीमध्ये पुजारी नगर फाऊंडेशनच्या वतीने यंदा मोठ्या उत्साहात शिवजयंती साजरी करण्यात आली.



यावर्षी प्रथमच हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवमूर्तीची विधिवत प्रतिष्ठापना करण्यात आली. या उपक्रमामुळे परिसरात आनंद, उत्साह आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले.

सकाळी विश्वनाथ पुजारी, हरिदास नाईकवाडी, मेजर हणमंत कदम, मेजर बाळासाहेब पवार, उद्योजक बापू घोंगते, ॲड. रत्नदिप जाधव, ॲड. रामचंद्र ढवळे यांच्या हस्ते विधीवत पूजाअर्चा करून शिवमूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. त्यानंतर आरती, पुष्पहार अर्पण व शिवगर्जना देत उपस्थितांनी महाराजांना अभिवादन केले.

या कार्यक्रमाचे आयोजन पुजारी नगर फाऊंडेशनचे अध्यक्ष गणेश पुजारी, कार्याध्यक्ष श्रावण पवार, सहसचिव तानाजी म्हेत्रे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. उत्सव समिती अध्यक्ष उमाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण नियोजन करण्यात आले होते. याप्रसंगी राहुल जाधव, ॲड. राज राठोड, बाबुराव पुजारी, बापू जगदे, गणेश जांभळे, प्रतिक कांबळे, अप्पा वडणे आदिंसह शिवप्रेमी नागरिक उपस्थिती होती.

## संक्षिप्त...

### माजी चेअरमन विरभद्र अंकुलगे यांचे निधन

**वलांडी :** देवणी तालुक्यातील जवळगा गावचे रहिवासी तथा माजी चेअरमन विरभद्र गुंडाप्पा अंकुलगे दि.१७ फेब्रुवारी सायंकाळी हृदयविकाराच्या धक्क्याने दुःखद निधन झाले. तर त्यांच्यावर बुधवारी सकाळी ११ वा.स्वतच्या शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्याच्या पश्र्चात पत्नी,दोन मुलगे,मुली,बहिण,पुतणे,असा परिवार आहे.पत्रकार आनंद अंकुलगे,सचिन अंकुलगे यांचे काका तर सामाजिक कार्यकर्ते दत्तात्रय अंकुलगे वडील होत.



........................................



दिनांक १९ फेब्रुवारी रोजी, स्वराज्य संस्थापक, राजाधिराज, राजे श्री श्री श्री शिवाजी राजे शहाजीराजे भोसले यांचा जन्मोत्सव, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सत्तरधरवाडी येथे साजरा करण्यात आला. श्री प्रशांत शिंदे सर यांनी विद्यार्थ्यांना शिवचरित्र याबद्दल माहिती सांगितली, राजे छत्रपती यांच्या काळातील काही प्रसंग जिवंतपणे उभे केले. तसेच श्री लोहारे सर व श्री खामकर सर यांनीही मोलाचे मार्गदर्शन केले, विद्यार्थ्यांची भाषणे झाली, कार्यक्रमाची सांगता श्री आनंद पुंड यांच्या गीताने व पोवाड्याने झाली.

........................................

### अनोळखी मयताचे प्रेत सापडले

**रेणापूर :** निवाडा कारखानाच्या उत्तर बाजूस कडील मैदानात एक अनोळखी इसमाचे प्रेत वय५० सापडले आहे मयताच्या अंगात पांढऱ्या कलरचा शर्ट भर त्यावर लाल पटट्या असून त्यावर स्वेटर. पायात काळ्या कलरची नाईट पॅट आहे. उंची साडे पाच फूट असून रंग सावळा असून चेहरा लांब ट गोल आहे.

वरील वर्णनाच्या मयत विषयी माहिती असल्यास पोलीस स्टेशन मध्ये कळवावे पोलीस निरीक्षक सुधाकर देडे यांच्या मार्गदर्शाना खाली पोना व्ही एस. गिरी पुढील तपास करीत आहेत.

### वीरशैव तेली समाजाच्यावतीने श्री सिद्धेश्वरास गंगाजल अभिषेक



**लातूर :** लातूरचे ग्रामदैवत असलेल्या श्री सिद्धेश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या महाशिवरात्री यात्रेस उत्साहात प्रारंभ झाला. १६ दिवस चालणारी ही यात्रा संपूर्ण मराठवाड्यासह सीमावर्ती भागात प्रसिद्ध आहे. गेल्या अनेक वर्षापासून वीरशैव तेली समाजाच्यावतीने श्री सिद्धेश्वरास गंगाजल अभिषेक व मानाची काठी परंपरा जपली असून याहीवर्षी प्रतिवर्षाप्रमाणे समाजाचे अध्यक्ष किशोर भुजबळ यांच्या हस्ते मानाच्या काठीचे पूजन करून प्रथेनुसार गंगेच्या पाण्याच्या कळशा समाजातील महिला भगिनी यांनी डोक्यावर घेऊन वाजत गाजत मंदिरात येऊन श्री सिद्धेश्वरास गंगाजल अभिषेक श्री हनुमंत (मुन्ना )भुजबळ, श्री.गुंडेराव चिंदे, श्री.विलास ब्याकुडे, श्री.अनिल क्षीरसागर, श्री.श्रीकांत म्हेत्रे यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच माहेश्वरी समाज महिला भजनी मंडळाच्या वतीने वाजंत्री सहित मिरवणूक काढून मानाची काठी मंदिरात लावून अमावस्येचा दिवस साजरा करण्यात आला. मंदिर कमिटीचे विश्वस्त श्री बाबासाहेब कोरे यांनी मानाच्या काठीची पूजन करून स्वागत करण्यात आले. याप्रसंगी वीरशैव तेली समाजाचे अध्यक्ष श्री किशोर भुजबळ, जेष्ठ संचालक श्री भिमाशंकर देशमाने, श्री.नागनाथ भुजबळ, समाजातील ज्येष्ठ नागरिक, माता-भगिनी, समाज बांधव व वीरशैव तेली समाज सर्व संचालक मंडळ पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### माऊली शैक्षणिक संकुलचे स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**लातूर :** येथील आंबेजोगाई रोडवरील माऊली शिक्षण प्रसारक मंडळ लातूर द्वारा संचलित माऊली बालक मंदिर माऊली विद्यार्थी विकास केंद्र व माऊली इंटरनॅशनल मॉडेल स्कूल, लातूरचे स्नेहसंमेलन विश्व पॅलेस या ठिकाणी उत्साहात संपन्न झाले. या स्नेहसंमेलनाचे उद्घाटन मा. श्री चंद्रकांतजी साळुंके -'संचालक सरस्वती विद्यालय,लातूर' यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे विश्व पॅलेसचे संचालक विश्वनाथ जी म्हेत्रे हे होते. मान्यवरांचे स्वागत कोषाध्यक्ष श्री. तानाजी बेवनाळे पाटील व प्रा. उमेश जी गिरवलकर यांच्या हस्ते संपन्न झाले. स्नेहसंमेलनाचे प्रास्ताविक संस्था सचिव गंगाधर आरडले यांनी केले.

# प्रशासन काळात विविध विभागाचे २० कोटी थकले

## औशाचे उपनगराध्यक्ष अफसर शेख यांचा पत्रकार परिषदेत आरोप

**तभा वृत्तसेवा**

**औसा, दि. १९ फेब्रुवारी :** प्रशासन काळातील थकित वीज बील, पाणीपुरवठाची दुरुस्ती,कंत्राटी कामागारांचे पगार, घनकचरा,कंत्राटदारांना देण्यात येर्णाय़ा दहा टक्के स्वनिधीच्या रकमेसह विविध योजनांचे जवळपास २० कोटी रुपयांची देयके औसा नगरपालिकेला द्यावयाची असल्याचा आरोप उपाध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ. अफसर शेख यांनी औसा येथे पत्रकार परिषदेत केला आहे.



औसा येथे पत्रकार परिषद झाली. त्यावेळी डा. अफसर शेख बोलत होते. जावेद शेख, गोविंद जाधव, अविनाश टिके, कृष्णा सावळकर, किर्ती कांबळे, शांताबाई बनसोडे, आनंद बनसोडे खुनमीर मुल्ला, मोलाना कलिमुल्ला सय्यद उपस्थित होते.

डा. अफसर शेख म्हणाले, प्रशासकांच्या कार्यकाळातील विविध योजनांचे शासकीय देणे असलेले जवळपास वीस कोटी रुपये प्रशासनाने दिले नाहीत. ही सर्व देयके देण्यासाठी नवीन पदाधिकाऱ्यांना तारेवरची कसरत करावी लागणार आहे. शहरातील रस्ते,नाल्यासह सर्वांगीण विकासासाठी आणि नागरिकांच्या हितासाठी ठोस निर्णय घेण्याचा निर्धार नगर परिषदेच्या १७फेब्रुवारी रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत घेण्यात आला असल्याची माहिती यावेळी डॉ. अफसर शेख यांनी दिली.

तसेच सर्वसाधारण सभेत औसा शहरातील बोकाळलेला मटका, अवैध दारू विक्री, बेकायदेशीर लॉजिंग व इतर नियमबाह्य व्यवसायांवर कठोर कारवाई करण्याचा ठराव सर्वसाधारण सभेत एकमताने घेण्यात येणार असल्याची माहिती उपनगराध्यक्ष डॉ. अफसर शेख यांनी दिली. शहरातील कायदा व सुव्यवस्था आणि सामाजिक वातावरण बिघडविणाऱ्या सर्व अवैध धंद्यांवर बंदी आणलीच पाहिजे, अशी भूमिका नगर परिषदेतील सदस्यांनी घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सभेतील विविध विषयांवर चर्चा करून निर्णय घेतले जाणार आहेत. सभेच्या अजेंड्यानुसार, प्रारंभी मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात येणार आहे. त्यानंतर शहरातील सामाजिक प्रश्नांबाबत शासन धोरणानुसार कार्यवाही करण्यासाठी संबंधित विभागांना निर्देश देणे, तसेच संपूर्ण दारूबंदी, अवैध दारू विक्री, अवैध लॉज व क्लब हाऊस, मटका व्यवसाय, गुटखा विक्री, मुलींची छेडछाड, राशन दुकानांवरील बोगस कारभार आणि प्लास्टिक बंदी यांसारख्या गंभीर विषयांवर ठोस निर्णय घेण्यात येणार असल्याचे उपनगराध्यक्ष शेख यांनी सांगितले.

नगर परिषद क्षेत्रात 'नमो उद्यान' विकसित करण्याच्या प्रस्तावावरही सभेत चर्चा होणार असून नागरिकांसाठी सुशोभित व सुसज्ज हरित क्षेत्र उभारण्याचा मानस व्यक्त करण्यात आला आहे. यासोबतच तीर्थक्षेत्र गोपाळपूर, बौद्ध विहार आणि ईदगाह परिसर विकास आराखड्यावर अंतिम निर्णय घेण्यात येणार आहे.

नगर विकास विभागाच्या दि. ४ फेब्रुवारी २०२६ रोजीच्या शुद्धीपत्रकानुसार कळविण्यात आलेल्या शासन निर्णयांतील कार्यान्वयन यंत्रणा व कामे पूर्ववत ठेवावीत का, यावरही विचारविनिमय होणार आहे. पाणीपुरवठा, स्वच्छता आणि विद्युत विभागाच्या वार्षिक निविदा मागविणे, विविधा विकासकामांचे ठेके निश्र्चीत करणे आदी प्रशासकीय विषय सभेत मांडलो जाणार आहेत.केंद्र शासन पुरस्कृत अमृत २ योजनेअंतर्गत मे. प्रगती कन्स्ट्रक्शन, लातूर यांनी सादर केलेल्या मुदतवाढ अर्जावरही चर्चा करून निर्णया घेतला जाणार आहे. आठवडी बाजारातील दुकाने व गाळ्यांच्या अधिमूल्य निश्र्चीती प्रस्तावासह ई-लिलाव प्रक्रियेवरही सभेत निर्णय घेण्यात येणार असल्याचे यावेळी डॉ. अफसर शेख यांनी सांगितले.

**आमदार साहेबांनी शहराच्या विकासासाठी मन मोठं कराव**

औसा शहरातील अंतर्गत सुरक्षेतेसाठी सीसीटीव्ही बसविण्यासाठी सहा कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. हा निधी इतर कामासाठी वळवू नये. यासाठी आमदार आभिमन्यू पवार यांनी राजकारण बाजूला ठेवून मन मोठ करुन सहकार्य करावे. अशी अपेक्षा उपनगराध्यक्ष तथा राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष डॉ. आफासर शेख यांनी व्यक्त केली.

## छत्रपती शिवरायांच्या विचारावर विद्यार्थ्यांनी यशस्वीपणे वाटचाल करावी : अरूणाताई कांदे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १९ फेब्रुवारी :** छत्रपती शिवाजी महाराजांची ३९६ वी जयंती देशभरात मोठ्या उत्साहात साजरी होत आहे. छत्रपती शिवरायांनी वयाच्या १६ व्या वर्षी स्वराज्य स्थापनेची शपथ घेऊन मोजक्या मावळ्यांच्या मदतीने अत्यंत कमी कालावधीत स्वराज्याची निर्मिती केली. त्यांच्या या कार्यातून छत्रपती शिवरायांचे शौर्य, धैर्य आणि स्वराज्य स्थापनेसाठी त्यांनी गणिमीकावा पध्दतीने केलेला संघर्ष आपल्यासमोर उभा राहतो. त्यामुळे शालेय विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवरायांचे विचार आत्मसात करून त्या विचारावर यशस्वीपणे वाटचाल करावी, असे आवाहन स्वामी दयानंद विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अरूणाताई कांदे यांनी केले. यावेळी त्या जेएसपीएम संचालित स्वामी दयानंद विद्यालय, कव्हा येथे छत्रपती शिवरायांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होत्या. यावेळी या कार्यक्रमाला बाबा कदम, दिपमाला मस्के, शिवशरण थंबा, श्रीकांत भिसे, आक्कलदिवे, तुरेवाले आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना अरूणाताई कांदे म्हणाल्या की, छत्रपती शिवरायांचे जीवन हे केवळ पराक्रमाचे प्रतीक नसून ते धैर्य, न्याय, कर्तव्यनिष्ठा आणि स्वाभिमानाचे जिवंत विद्यापीठ आहे. विद्यार्थ्यांनी त्यांच्या कार्यातून राष्ट्रप्रेम, संघटनशक्ती आणि स्त्री-सन्मान यांसारख्या मूल्यांचा आदर्श घ्यावा. संकटे कितीही मोठी असली तरी चिकाटी, दूरदृष्टी आणि प्रामाणिकपणा यांच्या बळावर यश मिळविता येते, हे शिवरायांनी दाखवून दिले. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या आयुष्यात किमान एक तरी गुण शिवरायांकडून आत्मसात करून तो कृतीत उतरवावा, तेव्हाच जयंती साजरी करण्याचा खरा अर्थ पूर्ण होईल, असा विश्वासही त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला.

## छत्रपती शिवाजी महाराज महाराज यांची जयंती तालुका कॉंग्रेस व शहर कॉंग्रेसच्या वतीने साजरी



**तभा वृत्तसेवा**

**रेणापूर, दि. १९ फेब्रुवारी :** हिंदवी स्वराज्य संस्थापक, अखंड हिंदुस्थानचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त रेणापूर तालुका व शहर कॉंग्रेस च्या वतीने जयंती रेणापूर येथील कृषी उत्पन्न बाजार समिती येथे साजरी करण्यात आली .

वेळी लातूर जिल्हा मध्यवर्ती बॅंकेचे उपाध्यक्ष प्रमोद आबा जाधव,रेणापूर तालुका अध्यक्ष प्रमोद कापसे,शहरध्यक्ष पद्मसिंह पाटील,नगरसेवक गजेंद्र चव्हाण,सचिन मोटेगावकर,भूषण पनुरे,कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती.उमाकांत खलंग्रे,बाजार समितीचे संचालक.प्रकाश सूर्यवंशी, ॲड.तानाजी कणसे, बिबीशन कदम,ॲड.महेश राजे, बाजार समिती सचिव उत्तम चक्रे,केशव माने,प्रदीप काळे,शहाजी पवार,रघुनाथ मदने,दयानंद सुरवसे, चेतन एकुरके,पंडित माने रहीम पठाण,महेश सावंत,सतीश चव्हाण, गोविंद पवार, विनोद खंदाडे, उध्दव जाधव, शिवराज स्वामी, अमोल गोडभरले,दिलीप उरगुडे,डि के शिंदे, गोविंद जाधव यांच्या सह कॉंग्रेस कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

## विद्यार्थ्याने जिद्द आणि परिश्रमाच्या जोरावर शिक्षण क्षेत्रात यश प्राप्त करा : प्रा. डॉ. मोटेगावकर



**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि. १९ फेब्रुवारी :** जीवनामध्ये दहावी आणि बारावीची वर्षी अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगून शालेय आणि महाविद्यालयीन जीवनामध्ये नेत्रदीपक यश प्राप्तीसाठी देहभान विसरून विद्यार्थ्यांने जिद्द, चिकाटी, कठोर मेहनत आणि परिश्रमाच्या जोरावर शिक्षण क्षेत्रात नेत्र दीपक यश प्राप्त करावे असे आग्रही प्रतिपादन लातूरच्या आर सी सी चे संचालक प्रा. डॉ. शिवराज मोटेगावकर यांनी केले.

ते दि. १८ रोजी यशवंत विद्यालयात आयोजित दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ सोहळ्यात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य गजानन शिंदे, व्यासपीठावर उपप्राचार्य प्रा. दिनेश तोंडारे, उप मुख्याध्यापक माधव वाघमारे, पर्यवेक्षक राम तत्तापुरे, शिवाजी सूर्यवंशी ,प्रा. रवी ईरफळे, खय्युम शेख यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना प्रा. डॉ. शिवराज मोटेगावकर म्हणाले की, जीवनात यशाची पहिली पायरी म्हणजे स्वतः ची ओळख असून प्रामाणिक आत्मविश्र्वासाने अभ्यासामुळे जीवनात गती मिळून सन्मान मिळतो. आई-वडील गुरुजी यांचा कायमस्वरूपी सन्मान करा असे जाहीर आवाहन केले.

यावेळी दहावीचे विद्यार्थी प्रणव चोचंडे,माधुरी मुंडे, वैष्णवी फड, दिपाली अंभोरे, श्रेया तत्तापुरे यांचे मनोगत पर भाषणे झाली.

## सहा महिन्यापूर्वी केलेल्या रस्ता कामाची दयनीय अवस्था

### - कोपरा गावाअर्तंगत रस्ता वर्षाच्या आतच गेला उखडून - भरमसाठ पैसे खाऊन गुत्तेदार करतोय मज्जा ; शासनाचे लाखो रुपये पाण्यात

**तभा वृत्तसेवा**

**किनगाव, दि. १९ फेब्रुवारी :** अहमदपूर तालुक्यातील कोपरा येथील सहा महिन्यापूर्वी केलेला सिमेंट रस्ता उखडून गेल्याने रस्त्याची अवस्था दयनीय झाली आहे. या कामासाठी आमदार फंडातील स्थानिक निधी व पंधराव्या वित्त आयोगातील निधी वापरण्यात आला आहे. शासनाने गाव पातळीवरील अंतर्गत रस्त्यासाठी दलित वस्ती सुधार योजना, वित्त आयोग निधी असो किंवा जन सुविधा विकास निधी अंतर्गत उपक्रम असो ग्रामीण नागरिकांच्या विकासासाठी मजबूत रस्ता तयार व्हावा व नागरिकांच्या रस्त्याच्या अडचणी दूर करण्यासाठी शासकीय तिजोरीमधून लाखों रुपये खर्च केले जातात.परंतु सुविधे साठी वापरण्यात आलेला निधी नागरिकांच्या अडचणी ठरू लागल्या आहेत. कोपरा गाव अर्तंगत रस्त्याचे बांधकाम सहा महिन्यापूर्वी करण्यात आले होते.वर्षाच्या आतच रस्ता उखडून गेला असून येथील नागरिकांमध्ये शासकीय कामाबाबत संताप व्यक्त केला जात आहे.



त्यामुळे लाखों रुपये शासकीय निधीची केवळ धुळ बनल्याने नागरिकांच्या अडचणीत पुन्हा वाढ झाली आहे.

ठेकेदाराने या रस्त्याच्या कामासाठी निकृष्ट दर्जाचे मटेरियल वापरल्याने रस्त्यावरील विअरिंग चा थर उखडून गेला आहे असे मत येथील गावकऱ्यांनी व्यक्त केले. त्यामुळे उडालेल्या धुराळ्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

असे अनेक कामे या ठेकेदाराने केले आहेत व त्यांच्या रस्त्याच्या बांधकामांचा स्तर घसरला असल्याची चर्चा होत असून अशा ठेकेदारांना शासनाने काम देणे बंद करावे अशी चर्चा नागरिकांमधून जोर धरू लागली आहे.

# सभ्य आणि सुसंस्कृत समाज निर्माण झाला पाहिजे : डॉ. नागोराव कुंभार

## कर्मयोगी डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर व्याख्यानमाला

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. १९ फेब्रुवारी :** माणूस घडविण्याची प्रक्रिया म्हणजे शिक्षण परंतु आज याकडे मात्र उद्योग म्हणून पाहिले जाते, हे थांबले पाहिजे. निष्ठा व कर्मभावानेने प्रत्येक व्यक्तीने काम केले तर ही परिस्थिती बदलू शकते. विद्यार्थ्यांना वैचारिक आधार व दिशा देण्याचे काम शिक्षकच करू शकतात. आपल्या अवतीभवती काय आहे ते समजून घ्यावे, तज्ञ लोकांशी संवाद साधावा, भरपूर वाचन करावे, वाचून/ ऐकून जे ज्ञान मिळवले त्याचे चिंतन करावे ही ज्ञानाची साधने तरुण पिढीला समजून सांगितली पाहिजे. विद्यार्थ्यांची क्षमता लक्षात घेऊन त्यानुसार त्यांना ज्ञान दिले पाहिजे, तरच सभ्य आणि सुसंस्कृत समाज निर्माण होईल असे परखड मत थोर विचारवंत,



शिक्षणतज्ञ डॉ. नागोराव कुंभार यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र महाविद्यालयात दरवर्षीप्रमाणे यावर्षीही कर्मयोगी डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर साहेबांच्या जयंतीनिमित्त व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते, या व्याख्यानमालेचे पहिले पुष्प गुंपताना डॉ.नागोराव कुंभार यांनी हे मत व्यक्त केले. ते पुढे म्हणाले की, तरुण पिढीशी संवाद झाला तरच त्यांच्यावर चांगले संस्कार होऊ शकतात. ज्ञान, शहाणपणा, आत्मविश्र्वास, संयम हे सद्गुण प्रत्येकात आवश्यक आहेत हे तरुण पिढीला सांगावे लागतील.

कर्मयोगी डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर साहेबांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात झाली यासाठी संस्थेचे अध्यक्ष श्री. विजय शिवाजीराव पाटील निलंगेकर यांनी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.कर्मवीर कदम यांची उपस्थिती होती. आपल्या अध्यक्षीय समारोपात त्यांनी, विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती विकसित झाली पाहिजे असे मत व्यक्त केले. शिक्षण म्हणजे फक्त पुस्तकी ज्ञान नाही तर व्यक्तिमत्व विकासाची प्रणाली आहे असेही ते म्हणाले. याप्रसंगी विचार मंचावर महाराष्ट्र शिक्षण समितीचे समन्वयक श्री. दिलीपराव धुमाळ, महाराष्ट्र औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भागवत पौळ, महाराष्ट्र पॉलिटेक्निक डी फार्मसीचे प्राचार्य डॉ. सिद्धेश्र्वर पाटील, महाराष्ट्र विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. मोहन नटवे, महाराष्ट्र प्राथमिक विद्यामंदिरचे मुख्याध्यापक श्री. लिंबराज मलिले, महाराष्ट्र कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. प्रशांत गायकवाड यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. भास्कर गायकवाड यांनी केले, सूत्रसंचालन डॉ. नरेश पिनमकर, डॉ. गोविंद शिवशेट्टे यांनी तर आभार डॉ. हंसराज भोसले यांनी मानले. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र शिक्षण समिती संकुलातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

CMYK

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर तरुण भारत

## शिवजयंतीनिमित्त विविध मान्यवरांकडून अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१९ फेब्रुवारी -**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त तुळजापूर येथील शिवरायांच्या पुतळ्यास तुळजाभवानी रेल्वे संघर्ष समितीच्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते व महाराष्ट्र प्रदेश सचिव गोकुळ शिंदे, तुळजाभवानी रेल्वे संघर्ष समितीचे अध्यक्ष बबनराव गावडे, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माधव कुतवळ, तुळजाभवानी पुजारी मंडळाचे माजी अध्यक्ष किशोर गंगणे, अध्यक्ष विपिन शिंदे, खंडेराव जाधव, युवा स्पंदन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष महेंद्र कावरे आदी मान्यवरांनी शिवरायांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला.

तसेच छत्रपती संभाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांनाही पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमास तुळजाभवानी रेल्वे संघर्ष समितीचे उपाध्यक्ष विकास तांबे, सदस्य व सल्लागार तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा पदाधिकारी व कार्यकर्ते, तुळजापूरातील नागरिक, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### संक्षिप्त वृत्त...



### तुळजाभवानी महाविद्यालयात शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी

**तुळजापूर, दि.१९ फेब्रुवारी -**

तुळजाभवानी महाविद्यालयामध्ये दि.१९ फेब्रुवारी गुरुवार रोजी शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सुरुवातीला महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. जीवन पवार यांनी प्रतिमा पूजन करून उपस्थितांना मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाबर व्ही.के. आणि तर आभार सतीश वागदकर यांनी मानले. या कार्यक्रमाला वरिष्ठ व कनिष्ठ विभागातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.




### वाल्हा अंगणवाडीत शिवजयंती साजरी

**धाराशिव, दि.१९ फेब्रुवारी -**

भूम तालुक्यातील वाल्हा येथील अंगणवाडीत लहानग्या बालचिमुकल्यांनी उत्साहात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी केली. छत्रपती शिवाजी महाराज की जयच्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. बालचिमुकल्यांनी शिवप्रतिमेचे आरती करत पूजन करून अभिवादन केले. अंगणवाडी सेविका अनिता चोरगे शेळवणे यांनी मुलांना राजमाता जिजाऊ आणि बाल शिवबा यांच्या स्वराज्य स्थापनेच्या प्रेरणादायी गोष्टी कथारूपात सांगितल्या. या गोष्टींमधून मुलांना स्वराज्य, शौर्य, प्रामाणिकपणा आणि देशप्रेम यांचे संस्कार देण्यात आले. या कार्यक्रमामुळे बालकांमध्ये इतिहासाबद्दल आदर व अभिमानाची भावना निर्माण झाली. जयघोष, फुलांची सजावट आणि आनंदी वातावरणात शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली.



### जि.प.प्राथमिक शाळा इटकळ येथे विविध उपक्रमांनी शिवजयंती साजरी

**इटकळ, दि.१९ फेब्रुवारी -**

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा इटकळ (ता. तुळजापूर) येथे शिवजयंती निमित्त विविध उपक्रम घेऊन साजरी करण्यात आली. शिवजयंतीनिमित्त सामान्यज्ञान स्पर्धा परीक्षा, भाषणे, शिवगर्जना, पाळणा, नाटिका घेण्यात आली. तसेच सामान्यज्ञान स्पर्धा परीक्षेत विजयी स्पर्धकांना शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मा प्रविण माशाळकर व ग्रामस्थांच्या हस्ते बक्षिस वितरण करण्यात आले. जाणताराजा तरुण मंडळाच्या वतीने विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला. याप्रसंगी सतिश ढोणे, सतिश साखरे, माने, पुदाले, इंगळे व भोसले यांची उपस्थिती होती.



### वंदे मातरम् तरुण मंडळाच्या वतीने शिवजयंती उत्साहात साजरी

**तुळजापूर, दि.१९ फेब्रुवारी -**

वंदे मातरम् तरुण मंडळाच्या वतीने शिव जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी औदुंबर कदम, दिनेश क्षीरसागर, जयकुमार पांढरे, बालाजी पानढवळे, चेतन पांडागळे, तसेच सागर इंगळे, रूतेश कवडे, अनुप गवळी, अनिल पवार, अमित मोरे, अनुप लोखंडे, विकी गुंड, गोविंद गायकवाड, कुलदीप ढाले, जावेद शेख, राहुल काकडे, यश धाकतोडे, पायाळे, माजीद शेख, यांच्यासह वंदे मातरम् नगर मधील सर्व नागरिक उपस्थित होते.

# २४ व २५ फेब्रुवारीला तुळजापुरात
# ‘श्री. तुळजाभवानी जिल्हा कृषी महोत्सव’

### ६० दालनांसह उस्मानाबादी शेळी विशेष आकर्षण...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ फेब्रुवारी -**

शेतकऱ्यांची शाश्वत प्रगती व्हावी, शेतमालाला चांगला बाजारभाव मिळावा तसेच शेतमाल उद्योग प्रक्रियेला चालना मिळावी आणि शेतकरी व वरिष्ठ कृषी शास्त्रज्ञ यांच्यात थेट संवाद घडावा या उद्देशाने महाराष्ट्र शासन कृषी विभाग, आत्मा विभाग, कृषी विज्ञान केंद्र व महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय ‘श्री. तुळजाभवानी कृषी महोत्सव २०२६’ चे आयोजन करण्यात आले आहे.

हा महोत्सव दि. २४ व २५ फेब्रुवारी २०२६ रोजी सैनिक विद्यालय मैदान, नळदुर्ग रोड, तुळजापूर येथे होणार आहे. कृषी महोत्सवाचे उद्घाटन प्रताप सरनाईक, मंत्री (परिवहन) तथा पालकमंत्री यांच्या हस्ते होणार असून सर्व लोकप्रतिनिधींची उपस्थिती राहणार आहे. या कृषी महोत्सवात एकूण ६० दालने उभारण्यात येणार असून त्यापैकी ३५ दालने शासकीय योजना व प्रकल्पांसाठी तर उर्वरित दालने खाजगी संस्थांसाठी असतील. महोत्सवात कृषी प्रदर्शन, परिसंवाद-चर्चासत्र, उत्पादक ते थेट ग्राहक विक्री दालन तसेच शेतकरी सन्मान समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. कृषी विद्यापीठांची दालने, विविध संशोधन केंद्रे, कृषी विज्ञान केंद्र व प्रक्रिया उद्योगांचे विशेष सादरीकरण आणि परिसंवाद यांचे आयोजन करण्यात येणार आहे. महोत्सवाचे प्रमुख आकर्षण म्हणून उस्मानाबादी शेळी असणार आहे. कृषी संलग्न विभागांचा सक्रीय सहभाग राहणार असून कृषी विद्यापीठे, महसूल विभाग, जिल्हा परिषद, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सामाजिक वनीकरण, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवसाय, रेशीम उद्योग, जलसंधारण, वन विभाग, महाबीज, सहकार, महिला व बाल कल्याण विकास, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, आदिवासी विकास, आरोग्य व समाजकल्याण विभाग आदींच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मार्गदर्शनाचा लाभ घेता येणार आहे. कृषी विद्यापीठ व कृषी विज्ञान केंद्राच्या समन्वयाने सोयाबीन, हरभरा, फळबाग लागवड आदी पिकांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. निर्यातक्षम केळी लागवड तंत्रज्ञान, निर्यातक्षम द्राक्ष उत्पादन, रेशीम लागवड व्यवस्थापन, आंबा लागवड तंत्रज्ञान व मोहोर व्यवस्थापन तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे ऊस शेती उत्पादन व व्यवस्थापन यांसारख्या विषयांवर चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले आहे.

कृषी विभागांतर्गत राष्ट्रीय फलोत्पादन अभियान, बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प, पंजाबराव देशमुख जैविक मिशन, पीएमएफएमई, कृषी यांत्रिकीकरण, ड्रोन तंत्रज्ञान, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा-२ आदी योजनांसाठी स्वतंत्र दालने उपलब्ध असतील.

धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी या कृषी महोत्सवास अवश्य भेट द्यावी, असे आवाहन राजकुमार मोरे यांनी केले आहे.

## वर्गणीमुक्त शिवजन्मोत्सव ; तुळजाई नगरीत शिवमय वातावरण



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१९ फेब्रुवारी -**

गोलाई ग्रुप शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या वर्गणीमुक्त शिवजन्मोत्सवाची आज मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात सुरुवात झाली. परिसरात भगवे ध्वज, आकर्षक फलक आणि रोषणाईमुळे शिवमय वातावरण निर्माण झाले होते.

या सोहळ्याचे उद्घाटन आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीची विधीवत पूजा करून करण्यात आले. यावेळी शिवगर्जना उपस्थितांनी जय शिवरायच्या घोषणा दिल्या.

कार्यक्रमाला प्र. नगराध्यक्ष रामचंद्र रोचकरी, निलेश रोचकरी गोलाई ग्रुपचे अध्यक्ष, सर्व पदाधिकारी, सन्मानीय नगरसेवक तसेच शहरातील विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिवजन्मोत्सवानिमित्त पुढील काही दिवस विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. यामध्ये रक्तदान शिबीर, व्याख्यानमाला, विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा तसेच पारंपरिक कला सादरीकरणाचा समावेश असणार आहे. विशेष म्हणजे हा उत्सव वर्गणीमुक्त पद्धतीने साजरा केला जात आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज जयंती अणदूर येथे साजरी



**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.१९ फेब्रुवारी -**

धर्मवीर छत्रपती संभाजी राजे तरुण मंडळ, अणदूर यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे पूजन माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास अणदूरचे सरपंच रामचंद्र आलुरे, ग्रामपंचायत सदस्य डॉ. विवेक बिराजदार, माजी सभापती बालाजी मोकाशे, माजी पंचायत समिती सदस्य साहेबराव घुगे व गजानन मोकाशे आदी मान्यवर उपस्थित होते.

या प्रसंगी मंडळाचे अध्यक्ष संकेत चव्हाण, उपाध्यक्ष योगेश जाधव तसेच बाबई लक्ष्मण चव्हाण, शोभा कार्ले, सुषमा मातोळे, अंजली जाधव, साधना बोर्डे, अंजली चव्हाण, मनीषा चव्हाण, श्रद्धा मोटे, राधिका चव्हाण, पद्मिनी जाधव, अलका जाधव, संतोषी जाधव, वैशाली जाधव, पूजा चव्हाण तसेच पांडुरंग चव्हाण उपस्थित होते.

## छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त धाराशिवमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ फेब्रुवारी -**

सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र शासन यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने येथील छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृह येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात प्रसिद्ध इतिहास शिवशाहीर बिहारीलाल राजपूत यांच्या दमदार पोवाड्याने झाली.

यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीस पुष्पहार अर्पण करून उपस्थितांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.

दीपप्रज्वलनानंतर जय जय महाराष्ट्र माझा हे महाराष्ट्र गीत तसेच जिजाऊ वंदना सर्व उपस्थितांनी एकत्रितपणे गायिली. यानंतर शिवशाहीर राणा जोगदंड व त्यांच्या संघाकडून शाहीरी जलसा कार्यक्रम उत्साहात सादर करण्यात आला. या कार्यक्रमात शिवचरित्रातील पराक्रम, स्वराज्याची प्रेरणा आणि जाज्वल्य राष्ट्राभिमान यांचे प्रभावी सादरीकरण करण्यात आले.

तसेच शुभम खोत व सहकलाकारांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. श्रीपतराव भोसले हायस्कूल चे संगीत शिक्षक महेश पाटील यांनी शूर आम्ही सरदार आम्हाला काय कुणाची भीती, मल्हार वारी मोतीयांनी द्यावी भरून- नाहीतर देवा जातो मी दुरुन, आम्ही अंबेचे गोंधळी, या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे ही स्फूर्तीदायक गीते सादर करून वातावरण भारावून टाकले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्य, आदर्श, स्वराज्य संकल्पना आणि राष्ट्रनिर्मितीतील योगदानाचे प्रभावशाली वर्णन शिवशाहीरांनी पोवाड्यांच्या माध्यमातून उपस्थितांना ऐकविले.

या कार्यक्रमास अधिकारी-कर्मचारी, नागरिक, मान्यवर तसेच विद्यार्थी व युवक-युवती यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

## मलकापूर येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.१९ फेब्रुवारी -**

कळंब तालुक्यातील मलकापूर येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

दि.१९ रोजी सकाळी कार्यक्रमाच्या प्रारंभी शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करून उपस्थित ग्रामस्थ, शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांनी अभिवादन केले. कार्यक्रमाला पारंपरिक आणि सांस्कृतिक रंगत लाभली होती.

यावेळी विद्यार्थिनींनी राजमाता जिजाऊ यांचा पोशाख परिधान केला, तर विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराज व मावळ्यांच्या वेशभूषेत शिवगीतांचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. तसेच विद्यार्थ्यांकडून शिवजन्माचा पाळणा सादर करण्यात आला. या सादरीकरणास उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली.

कार्यक्रमास मुख्याध्यापक बळीराम भंडारे, शिक्षिका नंदा गाडे , शालेय व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## छत्रपती शिवाजी महाराजांचे कौशल्य व आदर्श आत्मसात करणे आजच्या पिढीची गरज : कोळगे



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ फेब्रुवारी -**

छत्रपती शिवाजी महाराज यांचे कौशल्य, नीती व आदर्श आत्मसात करणे ही आजच्या पिढीची गरज असल्याचे प्रतिपादन रामदास कोळगे यांनी केले. ते जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथे आयोजित शिवजयंती कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

महाराष्ट्र गुलामगिरीत असताना जिजाऊ यांनी बाल शिवाजींना स्वराज्याची प्रेरणा दिली. शक्तीपेक्षा युक्ती महान हा विचार कृतीतून दाखवत महाराजांनी गनिमी काव्याच्या जोरावर स्वराज्य उभे केले, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. आंबेडकर बाल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुभाष दादा कोळगे होते. मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. प्रा. गणेश शेटे यांनी सूत्रसंचालन तर सचिन कांबळे यांनी आभार मानले.

कार्यक्रमास शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## शिवरायांची कार्यप्रणाली अंगीकारल्याशिवाय शिवजयंती पूर्ण नाही : डॉ. दादासाहेब जाधव



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१९ फेब्रुवारी -**

शिवरायांची कार्यप्रणाली अंगीकारून प्रत्येकाने आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडले तरच खऱ्या अर्थाने शिवजयंती साजरी होईल, असे प्रतिपादन डॉ. दादासाहेब जाधव यांनी येथे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात आयोजित शिवजयंती कार्यक्रमात केले.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अर्धाकृती पुतळ्याच्या पूजनाने करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष राठोड, कार्यालय अधीक्षक धनंजय पाटील, उपप्राचार्य डॉ. अशोक कदम व गणित विभाग प्रमुख डॉ. एन. बी. जाधव यांच्या हस्ते पूजन झाले.

डॉ. जाधव पुढे म्हणाले की, आजची पिढी वाचनापासून दूर जात असून मोबाईल व व्यसनांच्या आहारी गेली आहे. तरुणांना वाचनाकडे वळविण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. सक्षम व सुजाण पिढी घडल्यास देशाच्या जडणघडणीत मोलाचा हातभार लागेल, असे त्यांनी सांगितले.

यावेळी डॉ. लक्ष्मण दबडे, डॉ. जयश्री घोडके व प्रा. पांडुरंग पोळे यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संतोष पवार यांनी केले तर आभार धनंजय पाटील यांनी मानले. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## व्ही.पी. एज्युकेशनल कॅम्पसमध्ये छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त साजरी



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ फेब्रुवारी -**

व्ही.पी. एज्युकेशनल कॅम्पस, धाराशिव येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त भव्य व प्रेरणादायी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. स्वराज्याचे स्वप्न साकार करणाऱ्या आणि आदर्श शासनव्यवस्था उभारणाऱ्या शिवरायांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी विद्यार्थी, प्राध्यापक व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे अध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्या हस्ते शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी शिवरायांच्या शौर्य, धैर्य, दूरदृष्टी, न्यायनिष्ठा आणि संघटन कौशल्याचा गौरव करत त्यांच्या जीवनचरित्रातील प्रेरणादायी प्रसंग विद्यार्थ्यांसमोर मांडले.

याप्रसंगी एसबीएनएम फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरज ननवरे, एस.पी. पॉलिटेक्निकचे प्राचार्य अमरसिंह कवडे, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील, वेलनेस फिजिओथेरपी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. पूजा आचार्य, बी.एड. महाविद्यालयाचे प्राचार्य ऋषिकेश लोमटे, कृषी महाविद्यालयाचे व्यवस्थापक प्रा. हरी घाडगे, आयटीआयचे व्यवस्थापक प्रा.डी.एम. घावटे तसेच सर्व महाविद्यालयांचे प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## सरस्वती महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १९ फेब्रुवारी :** येथील सरस्वती संगीत कला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ रोजी अखंड हिंदुस्तानचे आराध्य दैवत , स्फूर्तीस्थान , महापराक्रमी राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष तालमणी डॉ राम बोरगावकर यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.याप्रसंगी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य,सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.






## विविध वृत्त...

### सिध्देश्वर कोलेज ऑफ फार्मसीत छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी



**लातूर :** सिध्देश्वर कोलेज ऑफ फार्मसीत हिंदवी स्वराज्याचे संस्थापक रयतेचे राजे शौर्य धैर्य आणि न्यायाचे प्रतीक छत्रपती शिवाजी महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. स्वराज्य हा माझा जन्मसिध्द हक्क आहे आणि ती मी मिळवणारच त्यांच्या पराक्रम, दूरदृष्टी आणि आदर्श राज्यकारभारातून आपण प्रेरणा घेऊ या. धर्मनिसेक्षता स्त्रीसन्मान शौर्य याणि स्वाभिमान यांची शिकवण देणारे' शिवरायांचे विचार जीवणात रुजवूया. जय शिवराय. जय शिवाजी. अशी माहिती आयुष गुंजरगे यांनी सांगितली. तसेच नवीन चव्हाण याने शिवाजी महाराजांचा पोवाडा गायिका. अशा प्रकारे महाविद्यालयात शिव जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली. या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ शामलीला बावगे मॅडम, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

### छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण



**लातूर :** शिवजयंतीनिमित्त जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे झालेल्या या कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, लातूर शहर महानगरपालिकेच्या आयुक्त श्रीमती मानसी, लातूरच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे विरोळे, तहसीलदार सौदागर तांदळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी सर्व उपस्थितांना शिवजयंतीच्या शुभेच्छा दिल्या.

### इयत्ता दहावीच्या परीक्षांना आजपासून सुरुवात; कॉपीमुक्त परीक्षेसाठी प्रशासनाकडून उपाययोजना

**लातूर :**जिल्ह्यात आजपासून इयत्ता दहावीच्या परीक्षेस प्रारंभ होत असून कॉपीमुक्त परीक्षेसाठी जिल्हा प्रशासनाने आवश्यक उपाययोजना केल्या आहेत. परीक्षा केंद्रावर अचानकपणे भेट देण्यासाठी भरारी पथकाची व कायमस्वरूपी बैठे पथकाची व्यवस्था करण्यात आली असून, कॉपी मुक्त वातावरणात परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी प्रशासनाने आवश्यक दक्षता घेतली आहे. जिल्ह्यातील १५२ परीक्षा केंद्रावर २० फेब्रुवारी २०२६ ते १८ मार्च २०२६ या काळात इयत्ता दहावीची परीक्षा होणार आहे. लातूर जिल्ह्यातून ३९ हजार २४२ विद्यार्थी ही परीक्षा देणार आहेत. प्रत्येक विषयाच्या पेपरसाठी १५२ केंद्रासाठी महसूल विभाग, ग्रामविकास विभाग आणि इतर विभागांच्या समन्वयातून १५२ त्रिसदस्यीय बैठी पथके गठीत करण्यात आली आहेत, ती रोटेशन पद्धतीने कार्यान्वित ठेवण्यात येणार आहेत. ही पथके पूर्ण वेळ कार्यरत राहणार आहेत. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना यांच्या मागर्दर्शनाखाली तयार करण्यात आलेली महसूल अधिकारी, जिल्ह्यातील सर्व खातेप्रमुख यांची ७० भरारी पथके परीक्षा कालावधीत विविध परीक्षा केंद्रांना अचानक भेट देवून पाहणी करतील. परीक्षा कालावधीत सर्व परीक्षा केंद्रावर प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आलेले आहेत.

### बाभळगाव महाविद्यालयात शिवजयंती उत्साहात साजरी

**लातूर :** दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती अत्यंत उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात प्रा. संदिपान चेवले यांच्या हस्ते प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व अभिवादन करून करण्यात आली. कार्यक्रमाच्या निमित्ताने प्रा.शिल्पा हलसीकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दुष्यंत कटारे होते. प्रा. हलसीकर यांनी मार्गदर्शन करताना असे म्हटले की, छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ पराक्रमी योद्धे नव्हते, तर ते उत्कृष्ट प्रशासक, लोककल्याणाचा ध्यास घेतलेले दूरदृष्टीचे नेतृत्व होते. त्यांनी स्वराज्य उभारताना न्याय, समानता आणि शिस्त या मूल्यांना सर्वोच्च स्थान दिले. आजच्या विद्यार्थ्यांनी महाराजांच्या जीवनातून आत्मविश्वास, प्रामाणिकपणा, कठोर परिश्रम आणि समाजासाठी काहीतरी करण्याची प्रेरणा घ्यावी. शिक्षणाच्या बळावर स्वतःचा आणि देशाचा विकास साधणे, हाच शिवविचार खऱ्या अर्थाने जपण्याचा मार्ग आहे. अध्यक्ष समारोपामध्ये प्राचार्यांनी आपल्या मनोगतात छत्रपती शिवाजी महाराजांचे नेतृत्वगुण, प्रशासनकौशल्य आणि आदर्श मूल्ये आजच्या तरुणाईसाठी मार्गदर्शक असल्याचे नमूद केले.

# हजारोंच्या साक्षीने झुलला बाळ शिवबांचा पाळणा

## शाहीरांनी जागवले चैतन्य, शिवभक्तीला उधाण, मनपा आयुक्तांसह अनेकांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १९ फेब्रुवारी :** भगव्या पताका, विद्यूत रोषणाईचा झगमगाट, फटाक्यांचा कडकडाट, मराठमोळ्या पेहरावात भगवे फेटे बांधून आलेल्या माता- भगिणी अन शिवरायांचा अखंड जयकार अशा उत्साही वातावरणात लातुरकरांनी बुधवारी (दि.१८) शिवजन्माचे स्वागत केले.







मध्यरात्री लातूर शहर महापालिका आयुक्त मानसी, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, एसडीएम रोहिणी नर्हे विरोळे व अन्य महिलांनी बाळ शिवबांचा पाळणा झुलवला अन सारा परिसर पुन्हा शिवरायांच्या गगनभेदी जयकाराने निनादून गेला. पोलीस अधीक्षक अमोल तांबे, मनपा उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे, उपविभागीय पोलिस अधिकारी समिरसिंह साळवे, पोलिस निरीक्षक सुधाकर बावकर, अभिषेक शिंदे, सावर्जनिक शिवजन्मोत्सव समितीचे अध्यक्ष डॉ. हर्षवर्धन राऊत, हंसराज जाधव, विशाल जाधव, डी.एस. पाटील, वैजनाथ जाधव, धनंजय शेळके,नेहरू देशमुख, अविनाश पाटील, डॉ.रमेश भराटे, डॉ. अभय कदम, डॉ. अमित पाटील, हॉस्टेल असोचे विजय जाधव, दत्तात्रय जाधव, विजय गवळी, नितीन पवार, ॲड. शिवकुमार जाधव, ॲड. विजय जाधव,सुंदर पाटील, अभिमन्यू जगदाळे आदींसह अनेकांची उपस्थिती होती. पाळणा उत्सवाचे व्यापक नियोजन करण्यात आले होते. भव्य मंच उभारण्यात आला होता. रात्री ८ वाजेपासूनच महिला, विद्यार्थीनी तसेच नागरीकांनी कार्यक्रमस्थळी येण्यास रांगा लावल्या होत्या. सारा चौक शिवप्रेमींनी गजबजला होता. महिला व मुलींची संख्या लक्षणीय होती.जीजाऊंच्या वेशभूपेत अनेक महिला आल्या होत्या. समितीच्या वतीने सर्वांचेच भगवे फेटे बांधून स्वागत करण्यात येत होते. दरम्यान रात्री ९ वाजता मान्यवरांच्या हस्ते शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करुन दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना श्रध्दासुमने वाहण्यात आली. त्यानंतर जीजाऊ वंदना व महाराष्ट्र गितीने डॉ. निशीगंधा व त्यांच्या संचाने कार्यक्रमास सुरुवात केली.

वीर मावळ्यांची शिवभक्ती, शक्ती व युक्तीचे गुणगाण करणारी गीते अन पोवाडे सुरू झाले. शाहीर साबळेंच्या महाराष्ट्र गिताने, डफावरील थापेने, तुतार्यांच्या निनाद-ने, उपस्थितांना शिवभक्तीचे भरते आले होते अवघे वाता-वरण शिवमय झाले होते. रात्री पावनेबाराच्या सुमारास मनपा आयुक्त मानसी, एसपी अमोल तांबे, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ व अन्य मान्यवर आले. सर्वांचे स्वागत करण्यात आले अन त्यानंतर पाळणा झाला. फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. साखर वाटून या उत्सवाचा समारोप करण्यात आला. कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचालन डॉ. रोहीणी सुर्यवंशी यांनी केले. आभार डी.एस. पाटील यांनी मानले.

## शिवरायांच्या विचारांना कृतीतून सलाम आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशन ची मागील सहा वर्षांची हरित परंपरा कायम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १९ फेब्रुवारी :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत 'आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशन' तर्फे सलग सातव्या वर्षी वृक्षारोपण आणि जनजागृतीचा आ-गळावेगळा उपक्रम उत्साहात पार पडला. वृक्ष दिंडी, जनप्रबोधन आणि वृक्षसंवर्धनाच्या माध्यमातून साजरी करण्यात आलेली ही शिवजयंती सामाजिक बांधिलकीचा आदर्श ठरली. या उपक्रमाद्वारे संस्थेच्या कार्याचा अखंड २४५६ वा दिवस शिवरायांच्या चरणी अर्पण करण्यात आला.

छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ स्वराज्याचे संस्थापक नव्हते, तर दूरदृष्टी असलेले पर्यावरण रक्षक राजे होते. स्वराज्य उभारताना त्यांनी वृक्षसंवर्धनाला विशेष महत्त्व दिले होते. आज्ञापत्राद्वारे झाडे लावणे, त्यांचे संगोपन करणे आणि वृक्षतोड करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश त्यांनी दिले होते. निसर्ग समतोल आणि शाश्र्वत विकासाचा हा विचार आजही प्रेरणादायी ठरत असून त्याच विचारांची अंमलबजावणी करण्याचा संकल्प आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशन सातत्याने करत आहे.

शिवजयंतीनिमित्त मागील आठवड्याभरात संस्थेच्या सदस्यांनी शहरात ६५० नागचाफा वृक्षांची ला-गवड केली. तसेच आज दयानंद गेट टॅक्सी पॉईंट परिसर आणि स्मृती वृक्षांना टँकरद्वारे मुबलक पाणी देत वृक्षसंवर्धनाची जबाबदारीही पार पाडली. यानंतर केशरी फेटे, भगवे झेंडे, जनप्रबोधनाची पत्रके आणि रोपे हातात घेऊन शिस्तबद्ध वृक्ष दिंडी काढण्यात आली. छत्रपती शिव-ाजी महाराज चौक येथे शिवरायांना अभिवादन करून उपस्थित नागरिकांना फुलझाडांचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाच्या शेवटी आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशनचे डॉ. पवन लड्डा यांनी या उपक्रमासाठी तन-मन-धनाने सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत समाजात सकारात्मक बदल घडविण्याचा संकल्प यापुढेही अधिक जोमाने सुरू ठेवण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

## JADE Global Inc. आंतरराष्ट्रीय सॉफ्टवेअर कंपनी च्या कॅम्पस ड्राईव्ह मध्ये दयानंद शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांची निवड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १९ फेब्रुवारी :** लातूर येथील दयानंद एज्युकेशन सोसायटीतर्फे दयानंद वाणिज्य महाविद्यालयात JADE Global या सॉफ्टवेअर कंपनीचा कॅम्पस ड्राईव्ह कार्यक्रम मंगळवार, १० फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आला होता. या निवड प्रक्रियेत महाविद्यालयाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागातील कु. ऋतुजा असलकर आणि कु. शिवानी हंचाटे या विद्यार्थिनींची निवड करण्यात आली आहे.

या निवडी अंतर्गत विद्यार्थ्यांना गरवश ऋष्ठेलरश्र खपल. या आंतरराष्ट्रीय कंपनी मध्ये नोकरी सोबतच इखढड झळश्ररपळ या नामांकित अश्या शिक्षण संस्थेमधून त्यांचे पुढील शिक्षण (M.Tech व M.Sc) पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण करू शकतात. अश्या एकात्मिक कार्यक्रम च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन करत भविष्यातील योजनांसाठी तयार करण्यात येईल या साठी Jade Global Inc. कंपनीने पुढाकार घेतला आहे. या निवड संदर्भात शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव रमेश बियाणी, सहसचिव विशाल लाहोटी, सहाय्यक सचिव अजींक्य सोनवणे, कोषाध्यक्ष संजय बोरा, डॉ. जे. एस. दरगड (ADO), प्राचार्य डॉ.माण्णिकर, शिक्षण संस्थेचे टीपीओ श्री.अनिल बिरादार, बीसीए विभागप्रमुख डॉ. स्वामी व सहाय्यक प्राध्यापक डी. जे. शेख तसेच सर्व विभागप्रमुख व प्राध्यापकवृंद यांनी अभिनंदन केले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. जे. ए. महावरकर, सुहाना शेख, एस. चिकटे, एन. एस. कुरे व के. डी. औसेकर यांनी विशेष योगदान दिले.

## जेईई मेन्स परीक्षेत राजमाता जिजामाता महाविद्यालयाचे यश



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १९ फेब्रुवारी :** राष्ट्रीय पातळीवरील आयआयटी व एनआयटी अशा प्रतिष्ठित अभियांत्रिकी कॉलेजमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी घेण्यात आलेल्या जेईई मेन्स या पहिल्या फेजच्या परीक्षेचा निकाल सोमवारी जाहीर झाला आहे. या परीक्षेत राजमाता जिजामाता कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यशाची परंपरा कायम ठेवली आहे.

सोनाली शरद पंचगल्ले ही विद्यार्थिनी ९४.०८ पर्सेंटाइल मार्क मिळवून महाविद्यालयात प्रथम, अनिकेत अशोक मस्के ९१.८७ पर्सेंटाइल मार्क मिळवून द्वितीय, तर विवेक मुकुंद भोसले हा विद्यार्थी ९१.४७ पर्सेंटाइल मार्क मिळवत तृतीय आला आहे. या परीक्षेत प्रथमेश कैलास नागरगोजे याने ९१.०७, सौम्या सौदागर काटे ८७, व्यंकटेश विजयकुमार लड्डा ८४.१८, साईप्रसाद मन्मथ हिंगमिरे ८१.३५, केदार सोमनाथ समशेट्टे ८० तर कृष्णा विजयकुमार किसवे याने ७० पर्सेंटाइल मार्क मिळवत यश संपादन केले आहे. या यशाबद्दल आमदार विक्रम काळे, शिक्षण उपसंचालक दत्तात्रय मठपती, सहसंचालक संजय पंचगल्ले, शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे, मुख्याध्यापक संघटनेचे माजी राज्य अध्यक्ष वसंतराव पाटील, मुख्याध्यापक संघटनेचे अध्यक्ष प्रकाश देशमुख, संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्य कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, समन्वयक अश्विनी केंद्रे, प्रा. वैशाली केंद्रे, प्रा. बी. बी. खटके, प्रा. ए. एस. खोत, प्रा. ए. व्ही. क्षीरसागर, प्रा. डी. ए. फंड, प्रा. वैशाली पाटील, विष्णू कराड, परमेश्वर गित्ते, शिवकांत वाडीकर, बालाजी चाटे यांनी कौतुक केले आहे.

# गनचुंबी रहाटपाळण्यांसह जलपरी शो जिंकणार लातूरकरांची मने

## देश-विदेशातील आकर्षक अमेझॉन पार्क करणार सिद्धेश्वर-रत्नेश्वर यात्रा महोत्सवाचा आनंद द्विगुणित

**तभा वृत्तसेवा/प्रमोद सुरवसे**

**लातूर, दि. १९ फेब्रुवारी :** लातूरचे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर-रत्नेश्वर महाशिवरात्री यात्रा महोत्सवात देश - विदेशातील आकर्षक अमेझॉन पार्क यात्रा महोत्सवाचा आनंद द्विगुणित करणार असून गगनचुंबी रहाटपाळण्यांसह जलपरी शो सर्वच वयोगटातील नागरिकांची मने जिंकून घेणार असल्याचा विश्र्वास अमेझॉन पार्कच्या मुख्य आयोजकांनी पत्रकार परिषदेत बोलताना व्यक्त केला.





विविध यात्रा महोत्सवात नागरिकांसाठी आकर्षक रहाट पाळणे आणि अन्य सुविधा उपलब्ध करुन देणारे ओरिसाचे अच्युत आनंद कुणी साहू, लातूरचे महेबूबभाई तांबोळी, मधू ठाकूर, नालासोपारा, मुंबईचे सुभाषभाई चौधरी यांनी यावर्षीच्या महाशिवरात्री यात्रा महोत्सवाच्या माध्यमातून लातूरकरांना उपलब्ध करुन दिल्या जाणाऱ्या सुविधांची माहिती यात्रा महोत्सव परिसरात आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

यावर्षीच्या यात्रा महोत्सवात आकर्षक झुला, आकाश पाळणा, व्हील जॉईंट, ब्रेक डान्स, टोरा टोरा, सलंबो, नावडी कोलंबस, ड्रॅगन ट्रेन, क्रॉस व्हील, रेंजर झुला, टावर, भूत बंगला, फिलिपिनहून आलेल्या जल-परी शो सगळ्यासाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरणार आहे. त्याचबरोबर नवीन टम चायना विंड व्हील, स्विंग स्विमिंग चेअर, सुनामी झुला, स्विमिंग टॉवर तसेच आकर्षक ऑक्टोपस शो लातूरकरांचे लक्ष वेधून घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

त्याचप्रमाणे लहान मुलांसाठीही आकर्षक चिल्ड्रन पार्क उभारण्यात आले आहे.

यात्रेचा आनंद घेण्यासाठी येणाऱ्या नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास, गैरसोय होणार नाही याची विशेष काळजी यात्रा महोत्सव समितीकडून घेतली जात आहे. रस्त्यावर धूळ उडू नये याकरिता मॅट अंथरण्यात आली आहे. तसेच धूळ उडू नये म्हणून दररोज पाणीही मारण्यात येत आहे. धूळ मुक्त यात्रा महोत्सव करण्याचा प्रयत्न असून यात्रा परिसरात कायदा सुव्यवस्था बिघडू नये व नागरिकांना संपूर्ण अमेझॉन पार्क चा आनंद घेता यावा यासाठी यात्रा संयोजक कमिटीच्या वतीने टॉवरची निर्मिती करण्यात आली आहे. संपूर्ण यात्रा परिसर सीसीटीव्हीच्या नियंत्रणाखाली खाली आहे.देवस्थ-ानचे प्रशासक सचिन जांबुतकर, सुरेश गोजमगुंडे, ओमप्रकाश गोपे,व्यंकटेश हालिंगे,सिध्देश्वर उकरडे, महादेव खंडागळे, महादेव बन, अच्युतानंद कुणी साहू, ओरिसा, महेबूबभाई तांबोळी, सुभाषभाई चौधरी, नाल-ासोपारा मुंबई. मधु ठाकूर लातूर व महाशिवरात्री यात्रा संयोजन समिती, लातूर. लातूरकरांनी या आकर्षक सुविधाचा लाभ घ्यावा, असे आव-ाहनही त्यांनी केले आहे.